मार्च २०१९/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य

## उंच माझा झोका





# मुशाफिरी

जंगल सफारी करताना वन्यजीव छायाचित्रकार ऋता कळमणकर यांनी रणथंबोर राष्ट्रीय उद्यानातील वाघोबाचे व आफ्रिकेतील सांबरू राष्ट्रीय उद्यानातील स्वच्छंदी हत्तीचे टिपलेले मनमोहक छायाचित्र.



# अंतरंग




**स्त्रीजीवनाची 'अर्थ'पूर्णता! ६**

महिलांची शैक्षणिक, व्यावसायिक योग्यता वाढवून त्यांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. त्यांना आर्थिक संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यांचा आर्थिक सहयोग वाढवला पाहिजे, त्यांचे आरोग्य वृद्धिंगत केले पाहिजे. त्यांना सुरक्षितता दिली पाहिजे. त्यांचा राजकीय सहभाग आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढवली पाहिजे. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळ्यांवर स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित केली पाहिजे. त्यासाठी जेंडर बजेटिंग अर्थात लिंगाधिष्ठित अर्थसंकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

**'अस्मिते'चे रक्षण आणि रक्षणाची 'अस्मिता' १०**

लैंगिक छळापासून संरक्षण मिळवण्याच्या आणि सन्मानाने काम करण्याचा महिलांचा अधिकार महत्त्वाचा मानला जातो. महिलांबाबत होणाऱ्या सर्व प्रकारचे भेदभाव, आंतरराष्ट्रीय सनदेद्वारा मान्य असलेल्या मानवी हक्कांचे उल्लंघन समजले जाते. ही सनद भारताने मान्य केली आहे.



**समर्थ वारसदार १७**

सरकारी शाळांमध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी राज्य सरकार विविध उपाययोजना करत असते. या शाळांच्या संवर्धनाचे काम आणि शाळा अधिकाधिक समृद्ध करून, वाडीवस्तीवरच्या सरकारी शाळांमध्ये पटसंख्या वाढवण्याबरोबरच शिक्षणाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम शिक्षिका व महिला शिक्षण अधिकारी अतिशय सक्षमपणे करत आहेत. सावित्रीबाई फुले यांचा वारसा या शिक्षिका व महिला शिक्षणाधिकारी समर्थपणे पुढे चालवत आहेत.



**माझी 'क्लिक' कविता २२**



मूळच्या लातूरच्या आणि सध्या ठाणे येथे वास्तव्यास असलेल्या ऋता कळमणकर या व्यावसायिक वन्यजीव छायाचित्रकार आहेत. पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या क्षेत्रात त्यांनी आपले स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

**बियाणांच्या 'बँकर' ४६**

सह्याद्री पर्वतरांगेच्या कुशीतील कोंभाळणे गावातील राहीबाई पोपेरे या देशी बियाणे संवर्धनाचे आगळेवेगळे काम करीत आहेत. पारंपरिक, दुर्मीळ, कसदार गावरान बियाण्यांची निर्मिती व संवर्धन त्यांनी केले आहे.




| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| स्त्रीजीवनाची 'अर्थ'पूर्णता! | ६ | अनाथांची आक्का... | ३० | एव्हरेस्ट माझा सोबती... | ४२ |
| 'अस्मिते'चे रक्षण आणि | | कृष्णाईचे भारूड | ३१ | आम्ही तिघी | |
| रक्षणाची 'अस्मिता' | १० | तिची गोष्टच वेगळी... | ३२ | 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' | ४४ |
| व्रतस्थ | १६ | किमयागार | ३३ | बियाणांच्या 'बँकर' | ४६ |
| समर्थ वारसदार | १७ | मार्शल धूनचा मराठी शंखनाद | ३५ | स्वबळाच्या दिशेने... | ४८ |
| सुवर्णकन्या | २१ | रणरागिणी | ३६ | महिलांनो सावधान | ४९ |
| माझी 'क्लिक' कविता | २२ | नवा तारा, नवा जोश | ३७ | गहाणखताची प्रक्रिया झाली सुलभ | ५२ |
| डाव्या हाताचा खेळ... | २८ | लय भारी | ३९ | यशाला गवसणी | ५४ |
| एमबीबीएसचा 'चौकार' | २९ | झिप..झॅप..झूम... | ४० | पुस्तकात न मावणारे कर्मवीर | ५६ |

वर्ष ७० वे | अंक ९ | मार्च २०१९

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# स्मार्ट सुरक्षा

मोबाइलमधील महिला सुरक्षा संदर्भातील ॲप्लिकेशनमुळे आपत्कालीन परिस्थितीमध्ये महिलांना स्वतःचा बचाव करता येऊ शकतो. सुरक्षेचा उपाय म्हणून महिलांकरिता असे अनेक ॲप्लिकेशन गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध असून ते डाऊनलोड करता येऊ शकतात. त्यामुळे आता महिलांना सुरक्षेचे स्मार्ट उपाय उपलब्ध झाले आहेत.

## कोशीश

हे ॲप नागपूर ग्रामीण पोलिसांनी तयार केले आहे. या ॲपचे नागरिकांना त्वरित मदत मिळवून देण्यासोबतच इतरही फायदे आहेत. ऑटोरिक्षा सुरक्षा म्हणूनही हे ॲप काम करते. प्रत्येक रिक्षाचालकास क्यूआर कोड दिला जातो. या कोडच्या माध्यमातून त्या रिक्षाचालकाची, त्याच्या वाहनाची संपूर्ण माहिती क्यूआर कोड स्कॅन करून मिळते. शिवाय या ॲपमध्ये समाविष्ट केलेले अनेक नियम, मार्गदर्शक तत्त्वे, धोरणे आणि गुन्ह्यांची माहिती नागरिकांसाठी उपयुक्त ठरते.

कोशीश
(जीवन रक्षणार्थ एक पाऊल)
नागपूर ग्रामीण पोलीस




## तेजस्विनी

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या वतीने महिला सक्षमीकरण करण्यासाठी तेजस्विनी ॲप्लिकेशन तयार करण्यात आले. या ॲप्लिकेशनमध्ये महिलांसाठीचे कायदे व नियम, विविध उपक्रम यांचा समावेश आहे. याद्वारे महिलांना तक्रार करण्यासाठी पर्याय देण्यात आला आहे. त्यामुळे एखादी घटना किंवा गुन्हा घडल्यास महिला या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून तक्रार दाखल करू शकतात. त्यानुसार त्यांना मदत पुरवण्यात येते. महत्त्वपूर्ण संपर्क क्रमांक, विविध अर्ज ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महिलांसंदर्भातील विविध कायदे, त्यांचे हक्क याबाबतच्या लिंक्स या ॲपमध्ये देण्यात आल्या आहेत.

## ऑनलाइन तक्रारीसाठी सिटीझन पोर्टल ॲप

महाराष्ट्र पोलिसांच्या सिटीझन पोर्टल ॲपच्या माध्यमातून ई-तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे महिलांना पोलीस ठाण्यात जाण्याची आवश्यकता नाही. या ॲपच्या माध्यमातून पोलीस ठाण्याला माहिती देणे, प्रकाशित प्रथम खबर पाहणे, तक्रारीची सद्य:स्थिती पाहणे, अटक झालेल्या आरोपीची माहिती पाहणे, अनोळखी मृतदेहाची माहिती पाहणे, हरवलेल्या इसमाची माहिती पाहणे व इतर ऑनलाइन सुविधांचा लाभ घेता येतो.

ई-तक्रार केल्यानंतर तक्रारदारास त्याचा एसएमएस व ई-मेल प्राप्त होतो. त्यामध्ये तक्रारीचा क्रमांक व तक्रार कोणत्या पोलीस ठाण्यात देण्यात आली, याची माहिती देण्यात येते. तक्रारीच्या चौकशीसाठी चौकशी अधिकारी नेमल्यानंतर, तक्रारीवर काय कार्यवाही झाली. याची माहिती एसएमएसद्वारे तक्रारदारास देण्यात येते.

**हेल्पलाइन (नियंत्रण कक्ष) :** महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक : १०९१, संकटातील महिला, ज्येष्ठ नागरिक व बालकामगारांसाठी : १०३, नागरिकांसाठी हेल्पलाइन क्रमांक : १००, रुग्णवाहिका : १०८

# प्रेरणादायी

भारताच्या लोकसंख्येत निम्या महिला आहेत. गेल्या काही वर्षांपासून त्यांना प्रगती आणि विकासाच्या उत्तमोत्तम संधी मिळायला लागल्या आहेत. या संधीचे सोने करण्याची क्षमता भारतीय महिलांनी खणखणीतपणे सिद्ध केली आहे.

महिला या दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वतीच्या प्रतीक आहेत. शक्ती, संपत्ती आणि बौद्धिक क्षमता हे त्यांचे मूर्तरूप आहे. कोणत्याही आव्हानांना समर्थपणे सामोरे जाण्याची अंगभूत क्षमता पुरुषांपेक्षा महिलांमध्ये काकणभर अधिक असते.

कोणत्याही कारणाने निराश आणि हताश झालेला पुरुष आत्महत्येसारखा सोपा आणि नकारात्मक मार्ग स्वीकारतो. पण महिला सहसा या मार्गाचा अवलंब करत नाहीत. डोळ्यात दु:खाची आसवं असली तरी त्यांचे मन खंबीर असते. पुरुष गेल्यावरही स्त्री न डगमगता संसाराची खडतर वाट हिमतीने चालू लागते. अशी शेकडो उदाहरणे आपल्या अवतीभोवती आहेत. ही उदाहरणे पुरुषांच्या दुर्बलतेवर शिक्कामोर्तब करणारी आहेत. असे असूनही पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा असलेल्या समाजात स्त्रीला दौर्बल्याचे प्रतीक समजले जाते. जमेल तसा छळ करणे, अन्याय करणे, असुरक्षितता निर्माण करणे, संधी नाकारणे अशा घटना सध्याच्या काळात कमी होण्याऐवजी वाढतानाच दिसतात.




घटनेने महिलांना न्याय्य हक्क दिले असले तरी ते मिळवण्यासाठी तिला संघर्ष करावा लागतो. स्त्रिया या शोभेची बाहुली किंवा कठपुतळी असल्याची भावना बहुतांश पुरुषांच्या मनात कायम घर करून असते. त्यामुळे तिच्याकडे आश्रिताच्याच नजरेने बघितले जाते.

कोणत्याच बाबतीत स्त्रिया पुरुषांपेक्षा मागे नसल्या तरी वंशाला दिवा मुलगाच हवा, हा अट्टाहास सुशिक्षित, सधन कुटुंबातूनही जात नाही. त्यामुळे स्त्री भ्रूणहत्येच्या घटना काही कमी होत नाहीत. दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांची संख्या कमी होत चालली आहे. ही बाब 'सामाजिक पर्यावरणाचे' संतुलन बिघडवणारी ठरू शकते व कालांतराने नैसर्गिक संतुलन बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरवर्षी महिला दिन उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी स्त्रीशक्तीचा जयघोष आणि जयजयकार केला जातो. हे करण्यात पुरुष मंडळीही हिरिरीने सामील होतात. पण ९ मार्च येताच या उत्साहाला ग्रहण लागते. महिलांच्या समस्या, आव्हाने तशीच राहतात. किंबहुना दरवर्षी त्यात वाढच होताना दिसत आहे. यामध्ये बदल होण्याची नितांत गरज आणि आवश्यकता आहे.

महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील महिलाशक्तीचे महत्त्व ओळखले होते. स्त्रियांच्या वाट्याला येणारे भोग आणि उपेक्षा त्यांना व्यथित करत होती. त्यामुळे त्यांनी आपली सर्व बुद्धिमत्ता आणि शक्ती पणाला लावून स्त्रियांच्या उद्धारासाठी जीवनभर प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळे स्त्रियांना मोकळा श्वास घेता येणे शक्य झाले. तिला आभाळात झेप घेण्यासाठी पंखही मिळाले. स्त्रीला तिच्या स्वत्वाची जाणीव झाली. पण पुढच्या काळात तिच्या वाटेवर काट्यांचीच पेरणी करण्यात पुरुषप्रधान संस्कृतीने धन्यता मानली.

समाजात विविध प्रकारच्या नव्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक, सांस्कृतिक समस्या आणि प्रश्न उभे राहत आहेत. या समस्यांचा सामना समर्थपणे करण्यासाठी पुरुषांना महिलांचीही गरज भासणार आहे. किंबहुना यापुढील काळात महिलांना बरोबर न घेतल्यास नवी आव्हाने आणि संकटे निर्माण होऊ शकतात हे पुरुषांनी ओळखायला हवे. महिलांना बरोबरीचे स्थान, आदर आणि महत्त्व देणे ही काळाची गरज आहे. त्याची वाटचाल महिला दिनापासून होणे स्वाभाविक ठरते.

महिलांच्या शिक्षणाला आपण सर्वाधिक महत्त्व दिले पाहिजे, तरच त्या स्वाभिमानाने जगू शकतील. लग्न झालेल्या महिलांनी सासरच्या जबाबदाऱ्या पार पाडताना, आपल्या अधिकार आणि हक्कांची जाणीव ठेवून त्याचा सुयोग्य वापर दृढतेने करायला हवा. नवविवाहित तरुणी आणि आई होण्याच्या मार्गावर असणाऱ्या महिलांनी होणाऱ्या बाळाला ते मूल, मुलगा असो की मुलगी, त्यांना महिलांचा आदर आणि सन्मान करण्याची शिकवण दिली पाहिजे.

परिश्रम आणि बुद्धिमत्ता यामध्ये महिला पुरुषांइतक्याच समर्थ व सक्षम असतात. त्यामुळे आजच्या काळात महिला श्रेष्ठ की पुरुष श्रेष्ठ असा वाद करण्यात हशील नाही. दोघांनीही परस्परांचा सन्मान व आदर करून वाटचाल केली तर आपल्या सर्वसमावेशक संस्कृतीचे वैभव आणखी वाढेल, अशी मला खात्री वाटते.

लोकराज्यच्या या अंकात आम्ही विविध क्षेत्रात धाडसाने प्रवेश करून, त्यात आपला ठसा उमटवणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाच्या 'कथा' सामील केल्या आहेत. सर्वसमावेशक अशी स्त्री–पुरुष समानता आणण्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करणे गरजेचे आहे. त्यासाठी 'जेंडर बजेट' संकल्पना राबवणे गरजेचे आहे. त्याविषयी विस्तृत माहिती या अंकात समाविष्ट केली आहे. प्रेरणादायी अशा कथांचा हा विशेषांक आपणास आवडेल अशी आशा आहे.

**विनिता वेद सिंगल**

अतिथी संपादक (सचिव, महिला व बालविकास विभाग)



**महिलांची शैक्षणिक, व्यावसायिक योग्यता वाढवून त्यांचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. त्यांना आर्थिक संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यांचा आर्थिक सहयोग वाढवला पाहिजे, त्यांचे आरोग्य वृद्धिंगत केले पाहिजे. त्यांना सुरक्षितता दिली पाहिजे. त्यांचा राजकीय सहभाग आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढवली पाहिजे. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळ्यांवर स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित केली पाहिजे. त्यासाठी जेंडर बजेटिंग अर्थात लिंगाधिष्ठित अर्थसंकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.**

# स्त्रीजीवनाची 'अर्थ'पूर्णता!

**मीनल जोगळेकर**

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांची 'दिनूचे बिल' ही कथा शालेय अभ्यासक्रमात अनेकांनी अभ्यासली असेल. छोटा दिनू, त्याच्या डॉक्टर वडिलांकडे येणाऱ्या रुग्णांना केलेल्या निदान व औषधाचे बिल देताना बघतो. त्यातून आईने त्याला सांगितलेल्या कामांचे बिल देण्याची कल्पना सुचते. बागेतून फुले आणणे, बाळाला सांभाळणे, शेजारच्या काकूंना निरोप देणे यासारख्या आईने सांगितलेल्या छोट्या–छोट्या कामांचे बिल रात्री झोपताना दिनू आईला देतो. बिल वाचून त्याची आई हसते.

स्वतःच्या शिलकीच्या डब्यातून बिलाची

रक्कम आणि एक चिठ्ठी ती त्याच्या उशीखाली रात्री ठेवते. सकाळी उठल्यावर दिनू ती चिठ्ठी वाचतो. लहानपणापासून प्रेमाने वाढवणे, गोष्टी सांगून करमणूक करणे, आजारपणात दिवसरात्र जागून काळजी घेणे, बागेत फिरायला नेणे, आवडते पदार्थ करणे अशा आईने दिनूसाठी केलेल्या अनेक गोष्टींचा उल्लेख त्यात असतो. प्रत्येकापुढे रक्कम शून्य रुपये असे लिहून एकूण बिल शून्य रुपये असे लिहिले असते. हे वाचून दिनूला स्वतःची लाज वाटते. त्याचे डोळे पाणावतात. पैसे घेऊन तो तसाच आईकडे धावत जातो, पैसे परत करून आईला मिठी मारतो आणि रडू लागतो. आई प्रेमाने कुरवाळून त्याला म्हणते, तुझ्या बिलाचे पैसे पावले बरं, दिनू!

## स्त्रीच्या कष्टाचे मोल

गोष्ट छोटीशीच, पण आशय मोठा. जीवनाच्या इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे आर्थिक क्षेत्रात मागे राहण्याची स्त्रियांची व त्यांना मागे ठेवण्याची एकूण समाजाची मानसिकताच या गोष्टीतून दिसून येते. आजही स्त्रीने घरासाठी घेतलेल्या कष्टांचे मोल शून्यच समजले जाते. गरोदरपण, अपत्य जन्माबरोबरच मुलांना वाढवणे, मुलांसह ज्येष्ठांची शुश्रूषा करणे, स्वयंपाक, घरकाम यापासून समाज घडवण्याच्या कामापर्यंत आर्थिक मोबदला न मिळणारी, ज्या कामाचे रूपांतर पैशात होत नाही अशी कुटुंबातील अनेक कामे स्त्रिया करत असतात. या प्रकारे, पुरुषाचे काम उत्पादक आणि स्त्रीचं काम अनुत्पादक अशी सरळ विभागणी होते.

## स्त्रिया आणि आर्थिक नियोजन

अर्थार्जनासाठी घराबाहेर पडण्यापूर्वीपासून परसदारी भाजीपाला लावणे, घरच्यांसाठी गाय–म्हैस बाळगणे व जास्तीचे दूध विकून पैसे कमावणे, शिवणातून पैसे वाचवणे आणि कमावणे, गृहोद्योग, कुटीरोद्योग अशी घरात राहून मिळकतीची कामे कुटुंबाला हातभार लावण्यासाठी स्त्रिया करीत असत. तांदुळाच्या डब्यातल्या पिग्मी बँकेतून अडीनडीची वेळ, छोट्या–मोठ्या आर्थिक गरजासुद्धा ती भागवते. घरातल्या मिळकतीवर स्त्रीचा शंभर टक्के अधिकार नसला, तरी अनेक घरांमध्ये नवरा किंवा कुटुंबातील मिळवत्या पुरुषाकडून घरखर्चासाठी तिच्या हाती देण्यात आलेल्या रकमेतून घराचे आर्थिक व्यवस्थापन ती उत्तम प्रकारे करते.

पूर्वी ती नोकरी करत नव्हती, म्हणून तिला बजेट, कर, करबचत, गुंतवणूक असे शब्द माहीत नव्हते. संपूर्ण अर्थव्यवहाराच्या नाड्या तिच्या हातात नव्हत्या किंवा ती संपत्तीची भागीदारही नव्हती. ती फक्त कष्टाची व अंमलबजावणीचीच धनी असायची. पतीचे आर्थिक व्यवहार माहीत नसलेल्या स्त्रीची, पतिनिधनानंतर आर्थिक व्यवहार सक्तीने अंगावर पडत तेव्हा अनेकदा तारांबळ उडायची, एकत्र कुटुंबात असेल तर सासरच्या मंडळींकडून पतीच्या मागे तिला संपत्तीतूनच काय पण लहान पोराबाळांसह घरातूनही बेदखल व्हावे लागे. आजही केवळ भारतात नव्हे, तर जगभरात ७० टक्के कुटुंबाचे आर्थिक व्यवस्थापन स्त्री बघते, जास्त श्रम ती करते, तरी तिच्या नावावर उत्पन्न नसते आणि संपत्ती एक टक्काही नसते.

बचतगट चळवळीने सामान्य बाईच्या हातात थोडीशी आर्थिक ताकद दिल्यावर तिने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात भरारी घेतली आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली आहे. मोठ्या उद्योगांमध्ये स्त्रिया कमीच आहेत. जी औद्योगिक घराणी आहेत, तिथल्या स्त्रियांना–मुलींना घरच्या उद्योगात संधी मिळते, पण जर मुलगा आणि मुलगी दोघंही असेल तर मुलाला अग्रक्रम दिला जातो. मुलीच्या हाती आर्थिक अधिकार देणे, हे आजही सुरक्षित मानले जात नाही. त्यामुळे औद्योगिक घराण्यांमधील उच्चशिक्षित मुलीसुद्धा उद्योगाशी संबंधित आर्थिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतून वगळलेल्या तरी असतात किंवा शेवटच्या क्रमावर असतात. म्हणूनच स्त्रियांचे आर्थिक समावेशन पुढच्या टप्प्यांवर बाजूला पडत जातं.

## लिंगाधारित अर्थसंकल्पाची आवश्यकता

भारतातील स्त्रियांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ४८ टक्के आहे आणि या महत्त्वाच्या घटकासाठीची अंदाजपत्रकातील तरतूद केवळ ४.५ ते ५ टक्के असते. ताज्या अंदाजपत्रकात ती वाढवून ६ ते ७ टक्के एवढी करण्यात आली आहे. ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे.



अर्थसंकल्प म्हणजे आकडेवारी, जमाखर्चाचा ताळेबंद. त्यात स्त्रियांचा किंवा पुरुषांचा थेट उल्लेख नसतोच. त्यात जेंडर किंवा लिंगभावाची संकल्पना कुठे बसू शकते, असे काहींना वाटेल. समाजात ज्या स्त्री–पुरुषविषयक धारणा असतात त्यांचं प्रतिबिंब वर्षानुवर्षं बजेटमध्ये आणि विशेषतः त्याच्या अंमलबजावणीत पडत असते. नोकरीसारख्या संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या उत्पादक श्रमाची नोंद, मोजणी देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात होते. पण घरच्या शेतीत, पारंपरिक व्यवसायात तिने केलेल्या कष्टांची नोंद नसते, तिच्या नावावर संपत्ती – घर, जमीन नसते. घराच्या पाटीवर, सातबारावर पत्नीच्या आणि वारस मुलींच्या नावाची नोंद नसते. बजेटमधील तरतुदींचा लाभ स्त्रियांना अनेकदा मिळत नाही. त्यामुळे अर्थसंकल्पासारख्या आकडेवारीच्या माध्यमातूनही लिंगभावाचा म्हणजेच जेंडरचा विचार जाणीवपूर्वक सहानुभूतीने व्हायला हवा, हा विचार पुढे आला.

समाजातील सर्व घटकांना समान न्याय व संधी देण्यासाठी आर्थिक तरतूद अर्थसंकल्पात करणे अपेक्षित असते. त्यातही वंचित, उपेक्षित घटकांना समाजहिताच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष तरतूद करणे नैसर्गिक न्यायाला धरून आहे. 'महिला' या आजही समाजातील सर्वात उपेक्षित घटकासाठीची तरतूद व तिचा सुयोग्य वापर सुनिश्चित करणे हे आपले प्राथमिक कर्तव्य ठरते.

मुली व महिला यांची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन धोरणे आखणे व तपासून पाहणे गरजेचे असते. उदाहरणार्थ, शालेय शिक्षणावर खर्च करताना तरतूद एकूण विद्यार्थ्यांसाठी असली तरी मुलींचे शाळांमधील गळतीचे प्रमाण जास्त असल्याने हा खर्च आपोआपच मुलांवर अधिक होतो. मग मुलींची गळती रोखणाऱ्या उपायांकरिता विशेष तरतूद करणे आवश्यक ठरते. अशा प्रकारे सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या विषमतेचा सामना करण्यासाठी त्यांना अधिकची आर्थिक संधी मिळावी म्हणून ज्या उपाययोजना करण्याची गरज असते, त्यासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करणे जगभरात स्वीकारले जाते. देशाच्या एकूण अर्थसंकल्पाच्या किती टक्के रक्कम यासाठी राखून ठेवावी हे प्रत्येक देशाची आर्थिक प्राथमिकता, आर्थिक वास्तव आणि सामाजिक स्तरावरील स्त्रियांच्या स्थानाशी संबंधित आहे.

## लिंगाधारित अर्थसंकल्प म्हणजे काय?

अर्थशास्त्रात फेमिनिस्ट इकॉनॉमिक्स म्हणजेच स्त्रीवादी अर्थशास्त्र ही संकल्पना रुजू लागली आहे. संयुक्त राष्ट्रसंघानेही दखल घेतल्यामुळे स्त्री–पुरुष समानतेच्या सामाजिक–सांस्कृतिक परिणामांबरोबरच त्याच्या आर्थिक परिणामांचे महत्त्व जाणवू लागले आहे.

जेंडर बजेट अर्थात लिंगाधारित अर्थसंकल्प नामक संकल्पनेचा उदय ९० च्या दशकात झाला. १९९५च्या बीजिंगच्या



महिला परिषदेनंतर, संयुक्त राष्ट्र संघटनेचा महिलांसाठीचा फंड 'युनिफेम'तर्फे १९९६ मध्ये दक्षिण आफ्रिका व क्रमाक्रमाने पूर्व आफ्रिका, दक्षिण पूर्व आशिया, मध्य अमेरिका अशा भागात लिंगाधारित अर्थसंकल्पावर काम सुरू झाले.

स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास, त्यात सकारात्मक बदल करण्यासाठी पैशाची तरतूद, अर्थसंकल्पात त्याची योजना, देशाच्या उत्पन्न व खर्चाचे स्त्री–पुरुष या घटकावर आधारित विश्लेषण, स्त्रिया व पुरुषांवर बजेटचा होणारा परिणाम मोजणे, धोरण–योजना–आर्थिक तरतूद यातील त्रुटी शोधणे, त्यावर उपाययोजना करणे, केलेल्या तरतुदींची अंमलबजावणी झाली की नाही यावर लक्ष ठेवणे, खर्च झाला की नाही हे पाहणे आणि झालेल्या खर्चाचे लेखापरीक्षण करणे आणि त्याचा अंतिम परिणाम मोजणे म्हणजे लिंगाधारित अर्थसंकल्प!

जेंडर बजेट म्हणजे महिलांसाठीचा स्वतंत्र अर्थसंकल्प नव्हे, तर अर्थसंकल्पातील विविध प्रस्तावांचे महिलाकेंद्रित विश्लेषण होय. प्रशासकीय आणि आर्थिक धोरणांच्या साहाय्याने स्त्री–पुरुष समानता प्रस्थापित करण्याचा हा एक मार्ग आहे. पुरुष आणि स्त्रियांवर होणाऱ्या बजेटच्या परिमाणातील फरक समजून घेणे आणि नंतर असमानता दूर करण्यासाठी धोरणे तयार करणे अंतर्भूत आहे. ही संकल्पना सर्वप्रथम ऑस्ट्रेलियात स्वीकारण्यात आली.

## भारतात सुरुवात

भारतातही २००१पासून जेंडर बजेटचा विचार केला जाऊ लागला. २०००–२००१ च्या अर्थसंकल्पीय भाषणात पहिल्यांदा जेंडर अर्थसंकल्पाचा उल्लेख झाला. केंद्राने २००४ मध्ये 'जेंडर बजेट' संकल्पना स्वीकारली. २००५ पासून त्यावरचे परिशिष्ट हा बजेटचा भाग बनले. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्राने विविध विभागांसाठी सूचना जारी केल्या. अर्थसंकल्पाची रचना, त्यातील तपशील व सांख्यिकी माहितीमध्ये काही सुधारणा व अनुकूल असे बदल केले. या धोरणाला अनुसरून ओडिशा, उत्तरप्रदेश, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, जम्मू काश्मीर, अरुणाचल प्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, बिहार, केरळ, नागालँड, राजस्थान, इत्यादी राज्यांनी 'जेंडर बजेट'च्या अंमलबजावणीबाबत उल्लेखनीय कार्य केले आहे.

## महाराष्ट्रात सुरुवात

महाराष्ट्राने २०१३ मध्ये 'जेंडर बजेट' स्वीकारले. तत्पूर्वी १९९४ मध्ये महिला धोरण तयार केले. त्यानंतर बदललेल्या परिस्थितीशी सुसंगत असे सर्वंकष सुधारित धोरण २००१ व २०१४ मध्ये तयार केले गेले. १९९२ मध्ये महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायतीमध्ये 'महिला व बाल कल्याण समिती' स्थापन

करण्याची तरतूद आणि त्या समितीने करावयाची कामे प्रस्तुत करण्यात आली. त्यात २००६ मध्ये सुधारणा करून सर्व महानगरपालिका, नगरपरिषदांनी त्यांचा बांधील खर्च (कमिटेड एक्सपेंडिचर) भागवल्यानंतर राहिलेल्या रक्कमेतील ५ टक्के रक्कम महिला व बालकल्याण समितीच्या कार्यक्रमासाठी / कामासाठी वर्ग करावी आणि खर्च न करता राहिलेली रक्कम व्यपगत न करता पुढील वर्षात वर्ग करून महिला व बालकल्याण समितीच्या कामासाठी उपलब्ध करावी असे निर्देश देण्यात आले.

## अर्थसंकल्पाची उद्दिष्टे

अर्थसंकल्पातील विविध प्रस्तावांचे महिलाकेंद्रित विश्लेषण केल्याने एखाद्या योजनेचा लाभ किती मुलींना, महिलांना झाला ते जाणून घेता येते. समाजात रुजलेल्या स्त्री-पुरुष विषमतेचा शोध घेणे, सार्वजनिक पैसा खर्च करताना लिंग समभावाचा विचार करणे व तशी सुयोग्य धोरणे आखणे, धोरणात्मक बांधिलकी व अर्थसंकल्पाद्वारे केले जाणारे निधीचे वाटप व तरतूद यातील सुसंवाद वा विसंवाद शोधणे, स्त्रियांचे सक्षमीकरण व्हावे, यासाठी धोरणे आखणे अशा अनेक बाबींसाठी अर्थसंकल्पाचे विश्लेषण गरजेचे ठरते.

जेंडर बजेटच्या प्रमुख उद्दिष्टांत महिलांच्या सामाजिक समानतेसाठीच्या प्रमुख गरजा ओळखून त्यांची क्रमवारी लावून, त्यासाठी सुयोग्य आर्थिक तरतूद करणे हे जसे येते, तसेच सामाजिक योजना आणि आर्थिक तरतुदी यांची सांगड घालणे व विशेष सामाजिक योजनांवरील खर्चावर नियंत्रण ठेवणे हेदेखील अंतर्भूत आहे. मानव विकास निर्देशांकात स्त्रियांचा विकास समान पातळीवर दिसणे हे जेंडर बजेटच्या यशाचे एक माप असू शकते.

## अर्थसंकल्पाची कार्यपद्धती

लिंगाधारित अर्थसंकल्पासाठी स्वतंत्र आदेश जारी करणे, 'जेंडर बजेट' सेल स्थापन करणे आणि 'जेंडर बजेट' अहवाल प्रसिद्ध करणे या तीन बाबी कराव्या लागतात. जेंडर बजेटिंग सेलचे प्राथमिक कार्य म्हणजे विविध विभागांमध्ये धोरणे आखण्याच्या टप्प्यापासून हा लिंग समभाव या विषयाबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अर्थसंकल्प

महापालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निधी महिला आणि बालकल्याण समितीकडे वर्ग केला जातो. या निधीतून बालक सक्षमीकरणासाठी योजना राबवल्या जात असल्याने हा संपूर्ण निधीही स्त्रियांच्या वाटेला येत नाही. यावर उपाय म्हणून काही वर्षांपूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना 'जेंडर बजेट' तयार करण्याचे सांगण्यात आले. मुख्य अर्थसंकल्पात अशी तरतूद केल्याने स्त्रियांसाठी आखण्यात आलेल्या योजनांना अधिक वाव मिळेल आणि जास्तीत जास्त निधी त्यांच्या वाट्याला येईल, असे अपेक्षित धरण्यात आले होते. एकूण अर्थसंकल्पाच्या पाच टक्के रक्कम 'जेंडर बजेट'साठी राखून ठेवण्याचे बंधन महापालिकांवर आले. स्त्रियांचे सक्षमीकरण, स्त्रियांचे आरोग्य आणि स्त्रियांचे संरक्षण हे तीन मुख्य विषय समोर ठेवून स्त्रीकेंद्री अर्थसंकल्पाची कल्पना पुढे आली. स्त्रियांसाठी मध्यवर्ती भागात सहज नजरेस पडतील अशी प्रसाधनगृहे, पाण्याची उपलब्धता, महिला सुरक्षारक्षकाची नेमणूक, स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक, महिला बचतगटांचे सक्षमीकरण, बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी, यासाठी कायमस्वरूपी जागा, स्त्रियांना स्वसंरक्षणाचे धडे, अद्ययावत व्यायामशाळा, खुल्या जागेवर योग सभागृहाची बांधणी, अभ्यासिका इतकेच नव्हे, तर स्त्रियांसाठी स्वतंत्र जॉगिंग ट्रॅक, दारिद्र्य रेषेखालील महिलांना विविध प्रकारचे व्यवसाय शिक्षण, पाळणाघरे, आरोग्य शिबिरे, महिला व बालकांसाठी स्वतंत्र वाचनालय, ग्रंथालय, सांस्कृतिक सभागृह अशी अनेक स्त्रीकेंद्रित कामे या बजेटच्या माध्यमातून प्राधान्याने करणे शक्य होणार आहे.

## प्रशिक्षण

लिंगाधिष्ठित अर्थसंकल्पाबाबत जनजागृती व प्रशिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. शासकीय तसेच खासगी स्वयंसेवी संस्थांकडून याबाबत सातत्याने जनजागृती केली जात आहे. वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (वामनिकॉम), पुणे या संस्थेंतर्गत सेंटर फॉर जेंडर स्टडीज (सीजीएस) मार्फत गेल्या सात वर्षांपासून जेंडर बजेटिंगबाबत जागरूकता व क्षमता निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

**(लेखिका 'महाराष्ट्र अहेड'च्या संपादक आहेत.)**

## स्त्रियांची जबाबदारी

स्त्रियाही आपल्याला आर्थिक बाबतीत काहीच कसे कळत नाही, हे सहजपणं कबूल करून मोकळ्या होतात. शहरांमध्ये, बँका किंवा कंपन्यांमधून बऱ्यापैकी वरच्या पदावर काम करणाऱ्या महिलाही अनेकदा स्वतःचे आर्थिक व्यवहार स्वतः हाताळत नाहीत असं आढळतं. अनेक ठिकाणी नवऱ्यासोबत बायकोचे बँकेत जॉइंट खाते असते, पण ती या खात्याचे व्यवहार बहुतेकदा हाताळतच नाही. स्त्रियांनीही बजेट, आर्थिक घडामोडी, कर व बचत योजना, अगदी शस्त्रखरेदी धोरण यापासून बी-बियाणे, खतावरील सबसिडी व त्याची बजेटमधली आर्थिक तरतूद अशा विषयांबद्दलची अनास्था सोडून अधिक जागरूक व्हायला हवे. महापालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आजही पुरुष नगरसेवक महिला नगरसेवकांना पालिकेची वाहने आणि निधी या दोन्ही सत्तेच्या महत्त्वाच्या चिन्हांना हात लावू देत नाहीत. निधी वापरता न आल्याने नगरसेविकांना आपापल्या विभागात विकासाची कामे करता येत नाहीत. त्यामुळे अर्थसंकल्प म्हणजे काय, पैसा कसा येतो, तो कसा वापरायचा, महिलांच्या दृष्टिकोनातून बजेटकडे कसे पाहायचे, हे महिलांनी माहीत करून घेणे अत्यावश्यक आहे.

# ‘अस्मिते’चे रक्षण आणि रक्षणाची ‘अस्मिता’

**लैंगिक छळापासून संरक्षण मिळवण्याचा आणि सन्मानाने काम करण्याचा महिलांचा अधिकार महत्त्वाचा मानला जातो. महिलांबाबत होणारे सर्व प्रकारचे भेदभाव, आंतरराष्ट्रीय सनदेद्वारा मान्य असलेल्या मानवी हक्कांचे उल्लंघन समजले जाते. ही सनद भारताने मान्य केली आहे.**

**कपालिनी सिनकर**

कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्ध त्यांना संरक्षण देण्यासाठी, अशा छळाचा प्रतिबंध करण्यासाठी आणि लैंगिक छळाविरुद्धच्या किंवा त्याच्याशी संबंधित किंवा त्या अनुषंगाने केल्या जाणाऱ्या तक्रारींचे निवारण करण्यासाठीचा हा कायदा आहे. महिलांचा लैंगिक छळ हा त्यांना राज्य घटनेच्या कलम १४ व १५ नुसार मिळालेला ‘समानतेचा अधिकार’ व कलम २१ नुसार मिळालेला ‘सन्मानाने जगण्याचा अधिकार’ तसेच त्यांच्या स्वतःच्या मर्जीनुसार काम वा व्यवसाय करण्याचा व त्यासाठी लैंगिक छळापासून मुक्त वातावरण मिळवण्याचा अधिकार या मूलभूत अधिकारांचा भंग आहे. त्यामुळे कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरुद्ध महिलांचे संरक्षण करणारी उपाययोजना केंद्र सरकारवर बंधनकारक आहे.

## कायद्याचे प्रमुख मुद्दे

■ महिलांचा कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी आणि निवारण) कायदा, २०१३’ नावाचा हा कायदा संपूर्ण भारतात केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून लागू होईल.

## काही व्याख्या

■ **बाधित महिला :** कामाच्या ठिकाणी संपर्कातील कोणत्याही वयाची, त्या ठिकाणी कामाला असलेली किंवा नसलेली, किंवा एखाद्या राहत्या घरात वा वास्तूत कामाला असलेली, कोणत्याही प्रकारच्या लैंगिक छळापासून बाधित महिला.

■ **सक्षम शासन :** केंद्र सरकार, केंद्रशासित प्रदेश यांच्या मालकीचे वा नियंत्रणात असलेले किंवा त्यांचा थेट किंवा अन्य माध्यमातून निधी मिळत असल्यास केंद्र सरकार; राज्य सरकारच्या मालकीचे वा नियंत्रणात असलेले किंवा त्यांच्याकडून निधी मिळत असल्यास राज्य सरकार; असा निधी मिळत नसल्यास ज्या राज्यात हे कामाचे ठिकाण आहे ते राज्य सरकार.

■ **घर कामगार :** घरकाम करण्यासाठी रोख किंवा वस्तुरूपात मोबदला देऊन थेट किंवा एखाद्या संस्थेमार्फत तात्पुरत्या वा कायमस्वरूपी, अर्धवेळ अथवा पूर्ण वेळासाठी नेमलेली; परंतु त्या घरमालकाच्या कुटुंबाची सदस्य नसलेली महिला.

■ **कर्मचारी :** एखाद्या कामाच्या ठिकाणी नियमित, तात्पुरती, नैमित्तिक किंवा रोजंदारीने, थेट अथवा ठेकेदारासहित एखाद्या माध्यमांमार्फत मुख्य मालकाला माहिती असताना किंवा नसताना, पगारी अथवा बिनपगारी किंवा स्वयंसेवी पद्धतीने, कामाचे नियम स्पष्ट असताना किंवा अस्पष्ट, सहायक कर्मचारी, कंत्राटी कामगार, कच्ची वा शिकाऊ अथवा कोणत्याही अन्य नावाने नियुक्त केली गेलेली महिला.

■ **मालक अथवा नियोक्ता :** कोणत्याही खाते, संस्था,



नियंत्रणातील उद्योग, कार्यालय, शाखा अथवा युनिट यांच्याशी संबंधित कोणतेही सक्षम सरकार किंवा स्थानिक प्रकाशन, वर उल्लेख न केलेल्या कोणत्याही कामाच्या ठिकाणी व्यवस्थापन, निरीक्षण किंवा

नियंत्रण करण्याची जबाबदारी असलेली कोणतीही व्यक्ती, मंडळ अथवा कमिटी जी त्या संस्थेसंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्यास व अमलात आणण्यास जबाबदार असेल. किंवा ती जबाबदारी त्याला ठेक्याने मिळाली असेल. राहत्या घराच्या बाबतीत जी व्यक्ती घर कामगाराला कामाला लावत असेल किंवा तिच्या कामाचा लाभ घेत असेल, मग घर कामगार कितीही संख्येत असोत, कितीही वेळासाठी नियुक्त केलेले असोत किंवा त्यांच्या नियुक्तीचे वा कामाचे स्वरूप कोणतेही असो.

■ **लैंगिक छळ :** पुढे नमूद केलेली थेट अथवा गर्भितार्थ कृती किंवा वागणूक : शारीरिक संपर्क किंवा त्याबाबत पुढाकार; लैंगिक स्वरूपाची मागणी किंवा विनंती; लैंगिक अर्थाच्या टिप्पणी; अश्लील चित्र किंवा तत्सम गोष्टी दाखवणे; अन्य कोणतीही नको असताना केलेली शारीरिक, तोंडी किंवा शब्दात व्यक्त न केलेली लैंगिक स्वरूपाची कृती.

## लैगिंक छळाला प्रतिबंध

■ कोणत्याही महिलेचा लैंगिक छळ होता कामा नये. ■ पुढील परिस्थितीत लैंगिक स्वरूपाचे वर्तन केले गेल्यास तो लैंगिक छळ समजला जावा:–

महिलेला कामाबाबत खास प्राधान्य देण्याचे गर्भित वा स्पष्ट वचन देऊन; तिच्या कामाबाबत नुकसान करण्याची धमकी देऊन; तिच्या कामाच्या सध्याच्या किंवा भविष्यातील पदाबाबत धमकी देऊन; तिच्या कामात हस्तक्षेप करून किंवा तिच्यासाठी असुरक्षित, विरोधी व आक्रमक असे कामाचे वातावरण निर्माण करून; तिला अपमानास्पद वागणूक देऊन; तिचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आणणे.

**अंतर्गत तक्रार कमिटीची स्थापना :** प्रत्येक मालक वा एम्प्लॉयरने लिखित आदेशानुसार 'अंतर्गत तक्रार कमिटी' चे गठन करावे. अनेक ठिकाणी कामकाज असलेल्या




एम्प्लॉयरने आपल्या प्रत्येक विभागाच्या आणि प्रशासकीय शाखा किंवा कार्यालयांमध्ये त्या स्तरावरील अंतर्गत कमिटी बनविली पाहिजे.

**अंतर्गत कमिटीचे सदस्य :** अध्यक्षपदी त्या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून वरिष्ठ पातळीवर काम करणाऱ्या महिला अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. त्या ठिकाणी अशी वरिष्ठ महिला उपलब्ध नसल्यास त्याच मालकाच्या अन्य शाखांमधील वरिष्ठ महिलेला अध्यक्षपद देण्यात यावे.

■ कर्मचाऱ्यांमधून कमीत कमी दोन सदस्य असे नेमण्यात यावेत ज्यांची महिलांच्या प्रश्नांवर बांधिलकी असेल व ज्यांना समाजकार्याचा अनुभव असेल किंवा कायद्याची माहिती असेल.

■ स्वयंसेवी संस्था किंवा संघटनांमधून एक सदस्य असा घेण्यात यावा, ज्यांची महिलांच्या प्रश्नांशी बांधिलकी असेल; तसेच लैंगिक छळाच्या सर्व मुद्द्यांबाबत जाण असेल. कमिटीमधील किमान ५० टक्के सदस्य महिला असल्या पाहिजेत; अध्यक्ष व कमिटीचे अन्य सदस्य त्यांची नेमणूक झाल्यापासून जास्तीत जास्त तीन वर्षे त्या कमिटीवर काम करतील; स्वयंसेवी संस्थेमधून घेण्यात आलेल्या सदस्याला सुचवण्यात आलेली फी किंवा भत्ता एम्प्लॉयर देईल; अध्यक्ष किंवा एखाद्या सदस्यावर एखादी गुन्हेगारी स्वरूपाची किंवा शिस्तभंगाची कारवाई सुरू असल्यास त्या सदस्याला कमिटीवरून काढण्यात येईल व रिक्त जागा नियमाप्रमाणे भरण्यात येईल.

**स्थानिक तक्रार कमिटीची स्थापना :** सक्षम जिल्हाधिकारी किंवा अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांपैकी एकाची नेमणूक या कायद्यातील कामकाजाची पूर्तता करण्यासाठी जिल्हा अधिकारी म्हणून करतील.

प्रत्येक जिल्हा अधिकारी आपल्या जिल्ह्यासाठीच्या 'स्थानिक तक्रार कमिटी' ची स्थापना करतील. दहापेक्षा कमी कामगार असल्यामुळे अंतर्गत तक्रार कमिटीची स्थापना होऊ न शकलेल्या सर्व कामाच्या ठिकाणांमधील लैंगिक छळाच्या तक्रारींची नोंद ही स्थानिक तक्रार कमिटी करून घेईल आणि त्यांची सुनावणी घेतील. जिल्हाधिकारी ग्रामीण व आदिवासी भागात प्रत्येक तालुक्यासाठी एक व शहरी भागात प्रभाग किंवा महापालिका स्तरावर एका नोडल अधिकाऱ्याची नेमणूक करतील, जे त्यांच्याकडे दाखल झालेल्या तक्रारी सात दिवसांच्या आत स्थानिक तक्रार कमिटीकडे पाठवतील. स्थानिक तक्रार कमिटीचे अधिकारक्षेत्र संबंधित जिल्हा असेल.

**स्थानिक तक्रार कमिटीचे स्वरूप :** समाजकार्याच्या क्षेत्रामधील व महिलांच्या प्रश्नांशी बांधिलकी असलेल्या प्रथितयश महिला कार्यकर्त्यांमधून अध्यक्षांची नेमणूक करण्यात यावी, एक सदस्य तालुका, महानगरपालिका इत्यादीत काम करणाऱ्या महिलांमधून घ्यावा; दोन सदस्य ज्यातील किमान एक महिला असेल, महिला प्रश्नांशी बांधिलकी असलेल्या स्वयंसेवी संस्थेमधून किंवा लैंगिक छळाच्या प्रश्नांची जाण असलेल्यांमधून घेण्यात यावेत. त्यातील एका सदस्याची पार्श्वभूमी कायदे क्षेत्रातील असावी किंवा त्याला कायद्यांची चांगली जाण असावी. किमान एक सदस्य अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास जाती, अल्पसंख्याक समाजातील महिला असावी; जिल्हा समाज कल्याण किंवा महिला बाल विकास अधिकारी या कमिटीचे पदसिद्ध सदस्य असतील; स्थानिक तक्रार कमिटीचे अध्यक्ष व सदस्यांचा कार्यकाळ नेमणूक केल्यापासून तीन वर्षांपेक्षा जास्त असणार नाही; बाकी सर्व नियम अंतर्गत कमिटी प्रमाणेच असतील.

केंद्र सरकार फी व भत्ते देण्यासाठी राज्य सरकारकडे लोकसभेने मंजूर केलेला निधी वर्ग करील आणि तो निधी आवश्यकतेनुसार जिल्हा प्रशासनाकडे वर्ग करण्यात येईल.

## बालविवाह प्रतिबंधक कायदा

भारतात मोठ्या प्रमाणात बालविवाह



केले जातात. याबाबत जगात भारताचा १३ वा क्रमांक लागतो. त्यासाठी २००६ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा करण्यात आला. हा कायदा २००७ मध्ये अमलात आला. या कायद्यानुसार, मुलीचे वय १८ आणि मुलाचे वय २१ पूर्ण नसेल, तर तो कायद्याने गुन्हा मानला गेला आहे. अशा विवाहास बालविवाह मानले जाते आणि तो बेकायदेशीर ठरतो. मुलीचे वय १८ आणि मुलाचे वय २१ पूर्ण नसताना त्याचा विवाह केल्यास त्यांचे कायदेशीर पालक शिक्षेला पात्र ठरतात.

भारतात बालविवाह प्रतिबंधक कायदा १ नोव्हेंबर २००७ रोजी अस्तित्वात आला. सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर २००७ मध्ये एक ऐतिहासिक निवाडा दिला. त्यानुसार अल्पवयीन पत्नीशी शरीरसंबंध हा गुन्हा ठरविण्यात आला. तोपर्यंत पुरुषांना लग्नबंधनामुळे अल्पवयीन वधुशीही शरीरसंबंध ठेवता येणे हा गुन्हा नव्हता.

## कायद्याचे स्वरूप

या कायद्याचे २१ विभाग आहेत. जम्मू–काश्मीर वगळता आणि केंद्रशासित प्रदेश पाँडिचेरीतील फ्रेंच नागरिकत्व असलेले लोक वगळता तो सर्वत्र लागू आहे.

**शिक्षेची तरतूद :** ■ **सज्ञान पुरुष :** बालविवाह करणारा पुरुष १८ वर्षाहून अधिक वयाचा असेल, तर त्याला दोन वर्ष सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते किंवा एक लाख रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. ■ **लग्न लावल्याबद्दल शिक्षा :** बालविवाह लावणारा, ठरवणार, पार पडणारा, सूचना देणारा माणूस शिक्षेस पात्र आहे. अशा व्यक्तीला दोन वर्षे सक्तमजुरीची किंवा एक लाख रुपये दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. ■ **बालविवाहास प्रोत्साहन, परवानगी दिल्याबद्दल शिक्षा:** विवाहास परवानगी देणारे माता – पिता, अन्य पालक किंवा अशी एखादी संस्था, कळत–नकळतपणे या विवाहाला मान्यता देणारे, या विवाहास उपस्थित राहणारे अशा कुणालाही, दोषी आढळल्यास २ वर्षे सक्तमजुरी किंवा एक लाखापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

## हुंडा प्रतिबंधक कायदा

भारतात १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा करण्यात आला आहे. स्त्रीचे पुरुषांवरील अवलंबित्व कमी व्हावे आणि तिला स्वतंत्रपणे, मानाने जगता यावे यासाठी हा कायदा करण्यात आला आहे.

हा कायदा २० मे १९६१ रोजी भारतात अस्तित्वात आला. जम्मू–काश्मीर राज्य वगळता तो सर्व देशात लागू आहे.

## हुंडा या शब्दाची व्याख्या

लग्न करताना दोन्ही बाजूंपैकी कोणत्याही बाजूने दुसऱ्या बाजूला देऊ केलेले पैसे, संपत्ती किंवा अन्य कुठल्याही प्रकारची स्थावर व जंगम मालमत्ता.

**शिक्षेची तरतूद :** हुंडा प्रकरणी दोषी ठरल्यास पाच वर्षे कारावासाची शिक्षा देण्याची तरतूद आहे. याशिवाय १५ हजार रुपये दंड आणि/किंवा हुंडा म्हणून दिलेली रक्कम यापैकी जी जास्त असेल ती.

## वैद्यकीय गर्भपात कायदा

हा कायदा प्रथम १९७२ मध्ये भारतात अमलात आला. त्यात १९७५ व २००२ मध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या. देशामध्ये सुरक्षित व कायदेशीर गर्भपात सेवा पुरविण्यासाठी आराखडा बनविण्यात आला.

**पुढील कारणामुळे वैद्यकीय गर्भपात करता येतो.**

■ गर्भवती मातेच्या जिवाला धोका असल्यास किंवा गर्भवती मातेला मानसिक किंवा शारीरिक आरोग्यास गंभीर इजा, दुखापत होत असल्यास. ■ नवजात बालकास जन्मानंतर मानसिक किंवा शारीरिक व्यंग असल्यास त्यामुळे बालकास अपंगत्व येणार असेल तर. ■ महिलेला / कुमारिकेला बलात्कारामुळे गर्भधारणा झाली असेल, तर गर्भपात करता येतो. ■ विवाहित महिलेकडून किंवा तिच्या पतीकडून गर्भनिरोधक साहित्याच्या / औषधाच्या निष्क्रियतेमुळे गर्भधारणा झाल्यास.

## कायद्यांचे उल्लंघन : शिक्षेची तरतूद

■ वैद्यकीय गर्भपात करणारी कोणतीही व्यक्ती, ज्याची नोंदणी वैद्यकीय व्यावसायिक म्हणून नाही त्यास कमीत कमी २ वर्षे आणि जास्तीत जास्त सात वर्षांपर्यंत सक्तमजुरी होऊ शकते.

■ गर्भपात करणारी कोणतीही व्यक्ती जिच्या जागेस मान्यता नाही, अशा व्यक्तीला कमीत कमी २ वर्षे आणि जास्तीत जास्त सात वर्षांपर्यंत सक्तमजुरी होऊ शकते.

■ मान्यता नसलेल्या जागेचा मालक. जेथे गर्भपात केला जातो, अशा व्यक्तीस कमीत कमी २ वर्षे आणि जास्तीत जास्त सात वर्षांपर्यंत सक्तमजुरी होऊ शकते.

## गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा

■ गर्भधारणेपूर्वी आणि नंतर लिंगचाचणीवर बंदी आहे. ■ भ्रूण लिंगपरीक्षणासाठी (गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व चाचणी) तंत्रज्ञानाच्या दुरुपयोगावर बंदी आहे. ■ भ्रूणलिंग माहितीसाठी किंवा परीक्षणासाठी तंत्रज्ञान वापराच्या जाहिरातीवरही बंदी आहे. यामध्ये इंटरनेट माध्यमाचा समावेश आहे. ■ भ्रूणलिंग चाचणी (गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व चाचणी) करणाऱ्या केंद्रासाठी नोंदणी बंधनकारक आहे. ■ 'फॉर्म – एफ' सह विहित नमुन्यात संबंधित माहिती

संकलन आणि माहितीच्या रेकॉर्डचे संवर्धन बंधनकारक आहे.

**कायद्यांतर्गत शिक्षेची तरतूद :** ■ डॉक्टर्स / रुग्णालयाच्या मालकांसाठी ■ प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांसाठी कारावास आणि १० हजार रुपयांपर्यंत दंड ■ दुसऱ्या वेळी केलेल्या गुन्ह्यासाठी पाच वर्षांपर्यंत कारावास आणि ५० हजार रुपयांपर्यंत दंड. ■ आरोपी निश्चित झाल्यानंतर डॉक्टरांच्या वैद्यकीय परवान्यांचे निलंबन. ■ प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी राज्य वैद्यकीय परिषदेद्वारा पाच वर्षासाठी वैद्यकीय परवाना रद्द करणे. ■ त्यानंतर केलेल्या गुन्ह्यासाठी वैद्यकीय परवाना कायमचा रद्द करणे. ■ गर्भवती महिलेचा पती / कुटुंबातील इतर सदस्य किंवा इतर व्यक्तींद्वारे लिंगचाचणी करण्यासाठी प्रेरित केल्यास ■ प्रथम केलेल्या गुन्ह्यासाठी तीन वर्षापर्यंत कारावास आणि ५० हजार रुपयांपर्यंत दंड ■ त्यानंतर केलेल्या गुन्ह्याला पाच वर्षांपर्यंतचा कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड. ■ जोपर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत गर्भवती महिला ही निर्दोष असल्याचे मानले जाईल.



### कायद्याच्या अंमलबजावणीची पद्धत

■ विविध स्तरांवर समुचित प्राधिकाऱ्यांची नियुक्ती. ■ राज्यस्तरीय पर्यवेक्षकीय मंडळाची स्थापना. ■ राज्य सल्लागार समितीची स्थापना. ■ तपासणी व सनियंत्रण समितीची स्थापना. ■ विशेष कक्षाची स्थापना. ■ जिल्हास्तरावर दक्षता पथकाची स्थापना. ■ समुचित प्राधिकाऱ्यांद्वारे सोनोग्राफी केंद्रांची नियमित तपासणी. ■ बनावट केसेस शोधणे. ■ कायद्यातील तरतुदींचा भंग केल्याचे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही. ■ राज्यस्तरीय पथकामार्फत अचानक भेटी. ■ सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्र यांची धडक तपासणी मोहीम. ■ जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये जन्माच्या वेळेचे लिंग गुणोत्तर प्रमाणाचा आढावा.

### असभ्य प्रदर्शन (प्रतिबंधक) कायदा

या कायद्यान्वये महिलांचे असभ्य प्रदर्शन – जाहिरात, प्रकाशने, लिखाण, चित्रे, शिल्प किंवा अन्य कुठल्याही माध्यमातून – करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा कायदा २३ डिसेंबर १९८६ रोजी अस्तित्वात आला. जम्मू – काश्मीर वगळता, तो संपूर्ण भारतात लागू आहे.

या कायद्यांतर्गत दोषी आढळल्यास दोन हजार रुपये दंड आणि / किंवा दोन वर्षांपर्यंत कारावास अशी शिक्षा होऊ शकते.

### कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण

हा कायदा २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू झाला. हिंसामुक्त जीवन हा स्त्रीचा मानवी हक्क आहे. म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार हा निःसंशयपणे तिच्या मानवी अधिकाराचा विषय आहे; तसेच तिच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करणारा गंभीर दखलपात्र विषय आहे.

### ठळक तरतुदी

■ या कायद्याच्या प्रकरण २ कलम ३ नुसार कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या विस्ताराने दिली गेली आहे. जसे कुठल्याही स्त्रीचा प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिविगाळ तसेच लैंगिक शोषण, तोंडी किंवा शाब्दिक छळ, भावनात्मक छळ, मानसिक छळ, आर्थिक छळ या सर्वांचा समावेश या व्याख्येत होतो. शिवाय बेकायदेशीररीत्या हुंड्याची मागणी करून बायकोचा व तिच्या नातेवाइकांचा छळ या व अशा अनेक गोष्टींचा या व्याख्येत समावेश होतो.

■ या कायद्यांतर्गत जी पीडित स्त्री आहे, त्या स्त्रीची व्याख्या खूप विस्तारित स्वरूपात मांडली आहे. उदा. ४९८ अ भारतीय दंड विधान या कलमाखालील पीडित स्त्री म्हणजेच लग्न झालेली स्त्री एवढाच होतो. येथे लग्न झालेली स्त्री येतेच; शिवाय अशा सर्व स्त्रिया ज्या कौटुंबिक संबंधात राहत आहेत किंवा कुणावर अवलंबून राहत आहेत. याशिवाय पीडितांमध्ये कुठलाही मनुष्य, स्त्री असो वा पुरुष, लहान मुले, आई – वडील, नोकर मंडळी किंवा कौटुंबिक संबंधात राहणारे कुणीही या कायद्याचा आश्रय घेऊ शकतात.

■ अत्याचारग्रस्त स्त्रीला लवकरात लवकर न्याय मिळावा या हेतूने तशा प्रकारची विशेष तरतूद या कायद्यांतर्गत कलम १२(५) नुसार करण्यात आली आहे.

■ या कायद्याच्या प्रकरण चारमध्ये पीडित स्त्रीला साहाय्याचे आदेश मिळविण्यासाठीची कार्यप्रणाली दिली गेली आहे. कलम १२ नुसार पीडित व्यक्ती किंवा तिच्या वतीने संरक्षण अधिकारी याने न्यायदंडाधिकारी यांच्याकडे विविध साहाय्य मिळविण्यासाठीचा आदेश काढण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज करावा.

■ फक्त पीडित व्यक्तीच्या जबानीच्या आधारावरच गुन्हा नोंदविला जाऊ शकतो व न्यायालय गुन्हा घडल्याचा निष्कर्ष काढून शिक्षा ठोठावू शकते.

## हिंदू वारसा कायदा सुधारणा

हिंदू स्त्रीला संपूर्ण वारसा हक्क मिळावेत म्हणून हा कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये मुलींना मुलांप्रमाणेच वारसाधिकारात को – पार्सनरी म्हणून स्थान मिळाले आहे. या कायद्याने हिंदू वारसा कायदा कलम २३ व २४ पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे.

■ जन्माद्वारे पुत्र ज्या रीतीने हक्क जन्माने कुटुंबामध्ये म्हणजेच को – पार्सनरी असतो, त्याचप्रमाणे कोणताही भेद न करता कन्या को–पार्सनरी राहील. ■ ती जर पुत्र राहिली असती, तर तिला जे हक्क मिळाले असते, तेच हक्क कन्येला जन्माने मिळतील. ■ पुत्र म्हणून उक्त सहदायता मालमत्तेच्या बाबतीत ज्या जबाबदाऱ्या असतील, त्या जबाबदाऱ्यांसह ती अधीन असेल. मात्र, २० डिसेंबर २००४ पूर्वी वाटणी घडून आलेली असल्यास त्या वाटणीस किंवा मृत्युपत्र विनियोगासह झालेल्या हस्तांतरास या कायद्याद्वारे बाधा येणार नाही.



## हिंदू वारसा कायदा, १९५६

■ हा कायदा जम्मू – काश्मीर वगळता भारताच्या इतर सर्व राज्यांना लागू आहे. ■ हा कायदा हिंदू, जैन, बुद्ध, शीख या धर्मांच्या सर्व व्यक्तींना लागू होतो. ■ खालीलपैकी कुठलीही व्यक्ती हिंदू, जैन, बुद्ध, शीख या समाजाची आहे, असे समजण्यात येते. ■ ज्याचे आई – वडील (दोघेही) हिंदू, जैन, बुद्ध, शीख या धर्माचे आहेत. ■ ज्याचे आई – वडील (दोघांपैकी एक) हिंदू, जैन, बुद्ध, शीख या धर्माचे आहेत आणि त्यांनी पालनपोषण केले आहे. ■ अशी व्यक्ती जिने धर्मांतर करून हिंदू, जैन, बुद्ध, शीख या धर्मांचा स्वीकार केला आहे. ■ 'वारस' म्हणजे अशी व्यक्ती (स्त्री, पुरुष कोणीही) जी या कायद्यानुसार मृत व्यक्तीच्या संपत्तीमध्ये वाटेकरी होऊ शकते.

## विशेष विवाह कायदा, १९५४

या कायद्याच्या नावाप्रमाणेच हा विशेष कायदा खासकरून, आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाहांना लागू होतो. भारतात कुठल्याही दोन सज्ञान व्यक्तींना परस्परसंमतीने विवाह करता येतो. अनेकदा दोन भिन्न धर्मातील व्यक्ती किंवा दोन भिन्न जातींमधील, पंथांमधील, समुदायातील व्यक्ती लग्न करण्याचा निर्णय घेतात. त्यांना त्यांच्या विवाहाची नोंदणी 'विशेष विवाह कायद्या' अंतर्गत करावी लागते. भारतात हा कायदा एक जानेवारी १९५५ पासून अमलात आला. हा कायदा लागू करताना तीन उद्दिष्टे ठेवण्यात आली होती.

■ काही विशेष बाबींमध्ये विशेष लग्न म्हणून परवानगी देणे. ■ काही विशेष विवाहांची नोंदणी करणे शक्य व्हावे. ■ घटस्फोट देण्याची व्यवस्था असणे.

**पात्रता :** ■ कोणत्याही धर्माची व्यक्ती ■ हिंदू, मुस्लिम, बुद्ध, जैन, शीख, ख्रिश्चन, पारसी, ज्यू यापैकी कुणीही या कायद्यान्वये विवाह करू शकतो. ■ आंतरजातीय विवाहही या कायद्यांतर्गत होऊ शकतो. ■ हा कायदा संपूर्ण भारतात (अपवाद जम्मू–काश्मीर) लागू होतो. दोघेही भारतीय नागरिक असतील, तर परदेशात राहणाऱ्या भारतीयांनाही हा कायदा लागू होतो. ■ परदेशात राहणार भारतीय नागरिक. ■ तीस दिवसांच्या नोटिशीनंतर विवाह नोंदणी कार्यालयात लग्न करता येते. ■ विवाह नोंदणी अधिकारी व तीन साक्षीदारांच्या उपस्थितीत दोन्ही बाजूंनी 'मी त्याचा/तिचा कायदेशीर पती/पत्नी म्हणून स्वीकार करीत आहे.' असे म्हणेपर्यंत हा विवाह दोन्ही बाजूंवर बंधनकारक नसेल.

**संपत्तीचे वारस :** या कायद्यान्वये लग्न केलेल्या व्यक्तींच्या संपत्तीचा वारसा हक्क भारतीय वारसा हक्क कायद्याने प्रस्थापित होईल. विवाह केलेल्या दोन्ही बाजू हिंदू, बुद्ध, शीख किंवा जैन असतील, तर त्यांना हिंदू कायदा लागू होईल.

# राज्य महिला आयोग

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना महिलांना न्याय मिळवून देणे, त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे यासाठी २५ वर्षांपूर्वी झाली आहे. स्थापनेपासूनच आयोगाकडे मोठ्या प्रमाणावर महिला कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारी घेऊन येतात. बदलत्या काळानुसार महिलांच्या तक्रारींच्या स्वरूपात बदल होतो आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा छळ, लैंगिक छळ, सामाजिक समस्या, मालमत्ताविषयक तक्रारी, तिहेरी तलाक, एनआरआय विवाहविषयक तक्रारी ते सोशल मीडियाच्या माध्यमातून होणारा त्रास असे तक्रारींचे स्वरूप बदलत आहे. या महिलांना आयोगातील समुपदेशक, विधी सल्लागार यांच्या सहकार्याने, वेळप्रसंगी पोलिसांची मदत मिळवून देत न्याय मिळवून देण्यासाठी आयोग प्रयत्नशील आहे.

वेगवेगळ्या वयोगटातील महिलांच्या तक्रारी सोडवण्याबरोबरच महिलांविषयक विविध कायद्यांविषयी जनजागृतीचे कार्यक्रम आयोग घेत असतो. बदलत्या सामाजिक परिस्थितीत महिलांच्या बदलत्या प्रश्नांसाठी संशोधन करणे, त्याबाबतचे सर्वंकष अहवाल तयार करून

समस्या सोडवणे आणि समाजात महिलांची स्थिती उंचावणे याकरिता शासनाला शिफारसी करणे, धोरण निश्चितीत सहकार्य करण्याचे, कायद्यांमधील त्रुटींचा अभ्यास करणे व त्याअनुषंगाने शासनाला शिफारशी करण्याचे अधिकार आयोगाला आहेत.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध कायदा २०१३, प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंधक कायदा, महिलांविषयक इतर फौजदारी कायदे अशा कायद्यांशी संबंधित कार्यशाळा आयोग समाजातील विविध घटकांसाठी घेत असतो.

ॲसिड पीडितांसाठी कॉन्फिडन्स वॉक, महिला तस्करी विषयक आंतरराष्ट्रीय परिषद, एनआरआय विवाह, पॉक्सो कायदा, सरोगसी बाबतचा कायदा आदी बाबत परिषद, महिला आयोग आपल्या दारी यासारख्या उपक्रमांमधून जिल्ह्याच्या ठिकाणी महिलांना न्याय मिळवून देणे, महिला कैद्यांसाठी सॅनेटरी पॅड व्हेंडिंग मशिनची सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी उपक्रम राबवण्यात येतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातील महिलांना आयोगाच्या समुपदेशकांशी दूरध्वनीवरच आपल्या अडचणींबाबत मार्गदर्शन घेता यावे यासाठी आयोगाने 'सुहिता' हेल्पलाइन सुरू केली आहे.

## घटना व कर्तव्ये

राज्यघटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषत: कलम ३८, ३९, ३९-ब, ४२-ब मध्ये अंतर्भूत केल्या. राज्याच्या धोरणाची निदेशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक, उपाययोजना करण्यासाठी किंवा सूचवण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरीत्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

## प्रमुख उद्दिष्टे

■ समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे. ■ महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे. ■ राज्य घटना व अन्य कायद्यानुसार महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षण उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे. ■ त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंमलबजावणी संबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्यवेळी शासनास सादर करणे. ■ स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी शिफारसी करणे. ■ संविधान व इतर कायदे यांच्या स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारणात्मक वैधानिक उपाय योजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे. ■ समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी सरकारला योग्य सल्ला देणे.

## अधिकार

■ महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे. ■ आयोगाला खटल्याची न्याय चौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार आहेत. ■ राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे. ■ कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे. ■ शपथपत्रावरील साक्षी पुरावे स्वीकारणे. ■ कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे. ■ साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी आदेश काढणे. ■ महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचा अधिकार.

## उपक्रम

■ महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरवणे. ■ महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे. ■ महिलांविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे. ■ सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबवणे. ■ कायदेविषयक साक्षरता मोहीम राबवणे. ■ राज्यातील कारागृहांची तपासणी करणे. ■ बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे. ■ सुनावणी तसेच जनसुनावणी घेणे. ■ सरकारला महिलांविषयक धोरणांसाठी शिफारस करणे.

**संपर्क** - महाराष्ट्र राज्य महिला आयोग, पोटमाळा, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग) कला नगर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ५१, दूरध्वनी - ०२२-२६५९०७३९ आणि ०२२-२६५९२७०७ सुहिता हेल्पलाइन - ७४७७७२२४२४

ई-मेल - mscwmahilaayog@gmail.com

संकेतस्थळ - www.mscw.org.in

**राज्य महिला आयोग**

# व्रतस्थ

**पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे व डॉ. रवींद्र कोल्हे हे महानगरातील सुखासीन जीवन सोडून मेळघाटमध्ये गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत. त्यांच्या सेवाकार्याने मेळघाटातील अनेकांच्या आयुष्यात स्मित फुलविले आहे.**

**हर्षवर्धन पवार**

महानगरातले सुखासीन जीवन त्यागून निबिड अरण्यातल्या कुठल्याशा पाड्यावर वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टर वराचा प्रस्ताव स्वीकारणे ही गोष्ट कुठल्याही वधू डॉक्टरसाठी कसोटीच आहे. तेही जगावेगळ्या अटी स्वीकारून. मात्र, डॉ. स्मिता यांनी हा प्रस्ताव स्वीकारला आणि मेळघाटातील बैरागडला दुसरा डॉक्टर मिळाला. पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे व डॉ. रवींद्र कोल्हे या अनोख्या दांपत्याच्या सेवामय सहजीवनाने मेळघाटातील अनेकांच्या आयुष्यात स्मित फुलविले आहे.

## सेवापर्वाची सुरुवात

१९८५ च्या दरम्यान जेव्हा रवींद्र कोल्हे एमबीबीएस पूर्ण करून घरी आले, तेव्हा ते शहरात राहून वैद्यकीय पेशा करतील, असे सर्वांना वाटत होते. मात्र, महात्मा गांधीजी, विनोबाजींच्या विचारांनी प्रभावित डॉ. कोल्हेंच्या मनात वेगळा ध्यास होता. जिथे वैद्यकीय सेवा पोहोचू शकली नाही, अशा दुर्गम भागात जाऊन तेथील गरजूंना सेवा द्यायची, असा निर्णय त्यांनी पक्का केला होता. त्यांनी मेळघाटातील बैरागड हे गाव निवडले.

बैरागड या दुर्गम गावात पोहोचण्यासाठी पायी प्रवास करावा लागत होता. सोनोग्राफी, रक्त देणे, एक्स-रे अशा कुठल्याही वैद्यकीय सोयीसुविधा नसलेल्या अशा ठिकाणी रुग्णांवर उपचार करण्यासाठी डॉक्टरांकडे विशेष कसबही असावे लागते. ते प्राप्त करून घेण्यासाठी डॉ. कोल्हे सहा महिने मुंबईला राहिले. त्यानंतर त्यांनी बैरागडला परतून रुग्णसेवेला प्रारंभ केला. त्यानंतर एक घटना अशी घडली की, डॉक्टरांना वाटले आपण अजून शिक्षण मिळवले पाहिजे. त्या वेळी त्यांच्याकडे स्फोटात हात गमावलेला एक माणूस आला होता. मात्र, सर्जरीचे शिक्षण नसल्याने उपचार शक्य नव्हते. मग त्यांनी एम.डी. ही पदवी प्राप्त केली. मेळघाटातील कुपोषणावर त्यांनी प्रबंध लिहिला. त्यामुळे या प्रश्नांचे गांभीर्य सर्वदूर पोहोचले. बीबीसी



पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे व रवींद्र कोल्हे

रेडिओने त्यावर कार्यक्रम प्रसारित केला. या काळात डॉक्टरांना रुग्णसेवेचे काम पुढे नेण्यासाठी जोडीदाराची गरज वाटली. पण अशा ध्येयवेड्या डॉक्टरला वधूही तितकीच संवेदनशील मिळणे आवश्यक होते. त्यात डॉक्टरांच्या चार अटी होत्या. पहिली अशी की चारशे रुपयांत घरसंसार चालला पाहिजे. दुसरी पाच रुपयांत लग्न केले पाहिजे. तिसरी अट बैरागड येथे पोहोचण्यासाठी तालुक्यापासून ४० कि. मी. पायी चालावे लागेल. लोकांच्या कल्याणासाठी हात पसरण्याची तयारी हवी. ही चौथी अट होती.

## समाधानाच्या दिशेने

डॉ. स्मिता कोल्हे यांची तेव्हा नागपूर येथे चांगली प्रॅक्टिस सुरू होती. त्याबद्दल त्या सांगतात की, चारशे रुपयांत घरसंसार चालवावा लागेल, अशी अट होती. खरंतर तेव्हा मी त्या काळच्या चारशे रुपयांची साडी वापरत होते. पण मी डॉक्टरांच्या चारही अटींवर विचार केला आणि माझ्या लक्षात आलं की, पैसा हे सर्वस्व नाही. त्यापलीकडेही अनेक गोष्टींतून समाधान मिळते. त्यांनी डॉक्टर रवींद्र यांचा प्रस्ताव स्वीकारला आणि १९८९ मध्ये बैरागड गावाला दुसरा डॉक्टर मिळाला. गावात गेल्यावर दोघांनीही रुग्णांची सेवा सुरू केली. गावातील लोकांनी डॉक्टरांना स्वीकारले होते. पण स्मिताताईंची सुरुवात होती. त्यांनी सुरुवातीला स्त्री सक्षमीकरणाचे प्रयत्न सुरू केले. हे जोडपे गावातील जीवन, तेथील गावकऱ्यांशी समरस होऊन त्यांचा विश्वास संपादन करण्याचे प्रयत्न करत होतेच. त्या वेळी एक घटना अशी घडली की, डॉक्टर स्मिता यांनी आपले पहिले बाळंतपण डॉक्टर रवींद्र यांच्या साहाय्याने गावात करायचे ठरवले. ज्याप्रमाणे आपल्या दवाखान्यात गावातील महिलांची प्रसूती व उपचार होतात, तेच आपणही स्वीकारायचे, ही उदात्त भावना त्यामागे होती. पण परिस्थिती काही गुंतागुंतीची झाली. प्रसूतीनंतर बाळाला न्यूमोनिया व काही इन्फेक्शन झाले. डॉ. स्मिता व बाळाला अकोल्याच्या मोठ्या दवाखान्यात हलविण्याचा सल्ला गावकऱ्यांनी दिली. मात्र डॉ. स्मिता यांनी गावातच थांबून इतर बाळांप्रमाणेच आपल्याही बाळाचे गावातच उपचार करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांच्याविषयी पंचक्रोशीतील नागरिकांच्या मनात असलेला आदर द्विगुणित झाला.

## कुपोषण निर्मुलनाचा ध्यास

केवळ उपचार नव्हे, तर येथील कुपोषणाचे निर्मूलन करायचा ध्यास या जोडप्याने घेतला. मेळघाटात जन्मणारी मुलं त्या वेळी स्वत:चा पहिला वाढदिवस पाहू शकत नव्हती. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी आरोग्य, शेती आणि मूलभूत सुविधा मिळण्यासाठी प्रयत्नही सुरू केले. त्यांनी एका पशुवैद्यकाकडून पशुवैद्यकीचेही शिक्षण घेतले. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातून शेतीचे ज्ञान मिळवले. तेथील मातीत रुजेल अशा बियाणाच्या वाणाचे संशोधन केले. त्याची स्वत: लागवड करून शेती केली. मेळघाटातील तरुणांना एकत्र आणून निसर्ग संवर्धन केले. या प्रत्येक वेळी डॉ. स्मिता तितक्याच ठामपणे डॉक्टरांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. त्यांच्या पुढच्या पिढीनेही हे व्रत स्वीकारत याच कार्यात पाऊल टाकले आहे. भारत सरकारने पद्मश्री देऊन या जोडप्याचा सार्थ सन्मान केला आहे.

**जिल्हा माहिती अधिकारी, अमरावती**

# समर्थ वारसदार

**सरकारी शाळांमध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढवण्यासाठी राज्य सरकार विविध उपाययोजना करत असते. या शाळांच्या संवर्धनाचे काम आणि शाळा अधिकाधिक समृद्ध करून, वाडीवस्तीवरच्या सरकारी शाळांमध्ये पटसंख्या वाढवण्याबरोबरच शिक्षणाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम शिक्षिका व महिला शिक्षण अधिकारी अतिशय सक्षमपणे करत आहेत. सावित्रीबाई फुले यांचा वारसा या शिक्षिका व महिला शिक्षणाधिकारी समर्थपणे पुढे चालवत आहेत.**

**संतोष मुसळे**

राज्यभरातल्या खेड्यापाड्यांतल्या शाळांकडे चौकस आणि चिकित्सकपणे बघितल्यावर असं दिसतं की, आज खेड्यापाड्यांतल्या अनेक शाळा कात टाकताहेत. मन लावून काम सुरू आहे. मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे अभिनव प्रयोग सुरू आहेत. आश्वासक काम उभे राहताना दिसतेय. शैक्षणिक समृद्धीने कितीतरी शाळा तिकडे फुलल्यात. या नवनिर्माणाच्या शिलेदारांनी सरकारी शाळांवरचे शाब्दिक हल्ले समर्थपणे परतवून लावले. आपल्या शैक्षणिक कामाच्या जोरावर टीकाकारांची तोंडे बंद केलीच; त्याखेरीज पालकांचा-समाजाचा पाठिंबा मिळवत या शाळा अधिकाधिक समृद्ध केल्यात. या 'नवनिर्माणा'त अर्थातच महिलांची संख्या भरपूर मोठी आहे. वाडी-वस्तीवरच्या शाळेत त्या आपले काम नेटाने करताहेत. वेगळे काही करून दाखवण्याची अनिवार ऊर्मी त्यांच्या ठायी आहे. झपाटलेपणातून आलेलं 'जाणतेपण'ही त्यांच्या ठायी आहे. त्यामुळे ते त्यांना अजिबात स्वस्थ बसू देत नाही. बाह्यप्रेरणेपेक्षा अंत:प्रेरणा हाच त्यांचा प्रेरणास्रोत आहे. माध्यमातल्या बातम्या वाचून, ऐकून सरकारी शाळांविषयी मत बनवणाऱ्या शहरी मध्यमवर्गाच्या हे गावी नसणार, हे नक्की.

**डॉ. सुचिता पाटेकर (शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. यवतमाळ) :** प्रशासकीयदृष्ट्या चौदा तालुके असणारा विदर्भातील एक मोठा जिल्हा म्हणजे यवतमाळ. गत तीन वर्षांपासून या ठिकाणी डॉ. सुचिता पाटेकर शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शिक्षकी पेशातून गेल्यामुळे त्यांना विद्यार्थी व शिक्षकांच्या अडचणी व समस्यांची जाण होती. मुलांच्या पाठीवरचे दप्तराचे ओझे कसे कमी करता येईल यासाठी त्यांनी पुस्तकाचे दोन संच हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवला यात जुन्या व नवीन असे पुस्तकांचे दोन संच तयार केले. जुनी पुस्तके घरी तर नवीन पुस्तके शाळेत ठेवली जात. याचा परिणाम असा झाला की मुलांच्या पाठीवरचे ओझे कमी झाल्याने ती आनंदाने अभ्यास करू लागली. दुसरा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला तो म्हणजे जाहिरातीद्वारे पालक व समाज प्रबोधन. या उपक्रमात प्रत्येक जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी स्वतः जाहिरात करून त्या गावाच्या, शहराच्या चौरस्त्यावर लावल्या. ज्यातून गावकऱ्यांना आपल्या शाळेत कुठले नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात याची माहिती मिळाली. तसेच विविध शासकीय योजनेच्या प्राप्त व खर्च अनुदानाची माहिती मिळाली. यातून गावकरी-शाळा-शिक्षक असा शैक्षणिक सेतू तयार झाला.

**सुलभा वठारे (गट शिक्षणाधिकारी पं.स.पंढरपूर) :** पंढरपूर तालुक्यात शैक्षणिक पंढरी उभारण्याचे काम श्रीमती वठारे यांनी उत्कृष्टपणे केले. २०१५ साली 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' अभियानाची सुरुवात झाली. याच अभियानाला पंढरपूर तालुक्यात उभारी देण्यासाठी त्यांनी जागर सभा हा उपक्रम राबवला. यात गावातील नागरिकांच्या सोयीनुसार दवंडी देऊन सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, पोलीस पाटील व इतर



अध्ययन प्रक्रियेत नवनवीन संकल्पना राबवणाऱ्या गटशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे

लोकांना बोलावून रात्रीच्या वेळी तालुक्यातील उल्लेखनीय शाळांचे सादरीकरण तयार करून ते संगणकावर दाखवून गावातील शाळेचा असा कायापालट लोकसहभागातून करावा असे आवाहन करण्यात आले. याला लोकांनी उदंड प्रतिसाद दिला. ज्यात १७५ शाळा डिजिटल, तर एक कोटी ८६ लक्ष ९४ हजार ३० रुपये निधी प्राप्त झाला. ज्याद्वारे शाळेचे बाह्यरंग बदलण्यास योगदान लाभले. दत्तक शाळा या उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक अधिकाऱ्याला एक शाळा दत्तक देण्यात आली. यात संबंधित अधिकाऱ्याने पूर्ण दिवस शाळेवर जाऊन तेथील वैशिष्टे, समस्या, गरजांचा अभ्यास करून त्याचा कृती आराखडा श्रीमती वठारे यांना देणे क्रमप्राप्त होते. या पद्धतीने काम केल्यामुळे थोड्याच कालावधीत सर्व शाळांमध्ये रंगरंगोटी, भौतिक सुविधा, शैक्षणिक साहित्य, पुस्तक भिशी, डिजिटल वर्ग, स्वच्छ शाळा स्वच्छ भारत अभियान, विद्यार्थी काव्यसंग्रह यासह अनेक उपक्रम राबवण्यात आले.

**किरण कुंवर (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, नाशिक) :** आदिवासी भागातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व त्यांना शैक्षणिक प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी श्रीमती कुंवर यांनी मोखाडा तालुक्यात तीन वर्षे भरीव असे काम केले. नाशिक मनपामध्ये काम करताना मनपा क्षेत्रातील शाळेतील मुलांच्या समस्या खूप वेगळ्या होत्या. अनेक शाळांना इमारत नव्हती. या ठिकाणी स्वत: वीटभट्टीवर, झोपडपट्टी, नवीन बांधकामे, रेल्वे स्टेशन व बसस्थानक परिसरात फिरून ५००० मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात त्यांनी आणले. पर्यावरण संवर्धनासाठी नाशिक कुंभमेळ्यादरम्यान 'हरित कुंभ' हा महत्त्वाकांक्षी व पथदर्शी उपक्रम राबवला. यात मुलांच्या माध्यमातून गोदावरीच्या पाण्यातील तीर्थमार्गावरील कापडी पिशव्या ताब्यात घेऊन त्यांना बचत गटाकडून शिवून घेत या पिशव्यांचे वाटप केले. शिक्षकांच्या सहविचार सभा घेऊन त्यांना नवीन शैक्षणिक प्रवाहांची माहिती दिली. त्यांना कृतिप्रवण ठेवले. नव्या शैक्षणिक पद्धतीचा अंगीकार केला. कार्यालयीन कामात पारदर्शकता व गती आणली. मागील पंधरा ते वीस वर्षांपासून खितपत पडलेल्या सर्व फायली निकाली काढून पारदर्शक व स्वच्छ कारभाराची प्रतिमा शिक्षकांसमोर उभी केली.

**ज्योती परिहार (उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, पुणे):** पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात तीन वर्षांपूर्वी ज्योती परिहार या गटशिक्षणाधिकारी म्हणून रुजू झाल्या. मागील तीन वर्षांपासून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवताना भौतिक सुविधा, गुणवत्ता, शिक्षक सक्षमीकरण या बाबींचा समावेश केला. तालुक्यातील २२५ शाळात ११९७५ विद्यार्थी ज्ञानार्जन करतात. यापैकी त्यांनी आतापर्यंत ४० शाळा आयएसओ, 'अ'श्रेणीत ५८ शाळा, माझी समृद्ध शाळा १००, ई–शाळा १५६ केल्या आहेत.

**सकारात्मक मानसिकता :** जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाची सकारात्मक मानसिकता राहावी, यासाठी दरमहा राज्यातील मान्यवर व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित करून शिक्षकांचे उद्बोधन केले. याचा परिणाम असा झाला की, सर्व शिक्षक झपाटून कामाला लागले व गुणवत्ता वाढायला मदत झाली.

**कृतियुक्त अध्यापन पद्धती:** कुठलीही शाळा म्हटली की, वयानुरूप विद्यार्थी वर्गनिहाय इयत्तेत प्रविष्ट केलेले असतात. मात्र श्रीमती परिहार यांनी असे न करता मुलांसाठी वर्गनिहाय ४००० विविध प्रकारची शैक्षणिक कार्ड तयार केली. यापासून एखाद्या दुसरीतील मुलगा सहावीचे कार्ड खडाखडा वाचू लागला तर काही सातवीतील मुले चौथीची कार्ड वाचू लागले यामुळे वर्गाचे बंधन न मानता मनसोक्त शिकू लागली. याचा फायदा काही शाळांना असा झाला की दुसरीतील मुले सातवीपर्यंतचे इंग्रजीचे पुस्तक वाचू लागली.

**आयएसओ शाळा :** शाळा भौतिक सोयीसुविधायुक्त व्हाव्यात यासाठी आयएसओ शाळा मानांकन मिळवणे, यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.



**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नांदूर (ता. दौंड, जि. पुणे) येथील शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप.**

शाळाशाळांत स्पर्धा निर्माण झाली. आयएसओ पथक शाळेवर येणार म्हणून शिक्षकांनी स्वयंप्रणेने नानाविध उपक्रम राबवले. गावागावांत नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले. शाळात सोयीसुविधा वाढल्यामुळे मुले आनंदाने शाळेत येऊ लागली. ४२ शाळांना आयएसओ दर्जा मिळाला.

**तृप्ती अंधारे (गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, लातूर) :** गुणवत्ता विकासासाठी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अध्ययन प्रक्रियेत नवनवीन संकल्पना वापरून अध्ययन व अध्यापन प्रक्रिया दुहेरी बनवण्यासाठी लातूर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे सातत्याने प्रयत्नशील असतात.

**कन्या सुरक्षा कवच :** मुलींच्या शिक्षणाबाबत आजमितीस पालकवर्गात भीतीचे वातावरण आढळून येते. याचा कळत नकळत परिणाम मुलींच्या शिक्षणावर होत आहे. या सामाजिक समस्येचा मुलींच्या शिक्षणावर कुठलाही परिणाम होऊ नये म्हणून श्रीमती अंधारे यांनी संपूर्ण भूम तालुक्यात या उपक्रमाची अंमलबजावणी केली. याअंतर्गत शालेय परिपाठात दररोज मुलींच्या आणि स्त्रियांच्या शौर्यकथा सांगणे सुरू केले, याचा परिणाम थोड्याच दिवसात दिसायला लागला मुलींच्या मनात आत्मविश्वास जागा झाला. त्या आपले म्हणणे निडरपणे व्यक्त करू लागल्या. आज खेडोपाडी प्रत्येक घरात मोबाइल पोहोचला. याचा योग्य वापर या उपक्रमासाठी करण्यात आला. एखादी मुलगी शाळेत गैरहजर असल्यास तत्काळ तिच्या वडिलांच्या मोबाइलवर फोन करून गैरहजर राहण्यामागील कारणमीमांसा विचारून घेणे. व ती सुखरूप आहे की नाही याची नोंद हजेरीपटावर घेणे, वडिलांकडे मोबाइल नसल्यास शेजारच्या व्यक्तींना फोन करणे अथवा दोन मुली घरी पाठवून तिची खातरजमा करणे, असे उपक्रम राबवण्यात आले. त्यामुळे पालकांसोबतच मुलीतही शाळेविषयी आपुलकी निर्माण झाली. मुलींच्या सुरक्षितताविषयक सर्व बाबींचा समावेश यात केला आहे. यामुळे गावागावांत मुलींना सन्मानाची वागणूक समाज द्यायला लागला. कायदे, आरोग्यविषयक बाबी व खेळभावना वाढली.

**तक्रारमुक्त कार्यालय :** भूम येथील गटशिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर कार्यालयात फायलींचा व तक्रारींचा ढिगारा पडलेला होता. अशा वेळी झिरो पेंडेन्सीमधून कामाला सुरुवात केली. वर्षानुवर्षे अपूर्ण राहिलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका १०० टक्के भरून पूर्ण केल्या. यासोबतच वैद्यकीय रजा, प्रसुती रजा व प्रलंबित फाईली तत्काळ निकाली काढल्या. यामुळे कार्यालय तक्रारमुक्त झाले.

**दप्तरातील कविता :** ज्ञानरचनावादी मुले घडवताना शिक्षकाने सुलभकाची भूमिका बजावयाची आहे.

खेड्यातील गरिबांच्या मुलांच्या मनातील अव्यक्त भावना, भविष्यकालीन विचार, स्वप्न कागदावर उतरवून ते पुस्तक रूपात श्रीमती अंधारे यांनी साकार केले. या कवितासंग्रहात मुलांच्या हस्ताक्षरातील कविता छापून राज्यभर मुलांना गुणगौरव मिळवून दिला.



**दप्तराचे ओझे कमी करून विविध उपक्रम राबवणाऱ्या शिक्षणाधिकारी डॉ. सचिता पाटेकर व त्यांचे सहकारी**

**रोहिणी राजेंद्र लोखंडे (सहशिक्षिका प्राथमिक शाळा, नांदूर, ता. दौंड, जि. पुणे) :** शिक्षण हक्क कायद्यानुसार प्रत्येक मूल शाळेत आले पाहिजे आणि टिकले पाहिजे हे जरी खरे असले तरी प्रत्यक्षात परिस्थिती मात्र फार निराळी आहे. तथापि बहुतांशी मुले ही पूर्णतः शाळाबाह्य नाहीत. कोणत्या ना कोणत्या शाळेत ती दाखल झाली आहेत पण स्थलांतरित विद्यार्थी वाढलेले दिसतात. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणप्रवाहात आणण्यासाठी श्रीमती लोखंडे यांनी विशेष प्रयत्न केले.

नांदूर शाळेत नवीनच बदली झाल्यामुळे इथला परिसर श्रीमती लोखंडे यांच्या परिचयाचा नव्हता. नदीकिनारी गाव वसलेले असल्यामुळे बागायती शेती भरपूर. त्यामुळे दिवाळीच्या आधी ऊसतोडीवाल्यांचे जथ्थे जवळपास उतरलेले असतात. त्यातीलच एका जथ्थ्यातील मुले आणि माणसे एकदा शाळेच्या टाकीवर पाणी भरायला आली. जवळच त्यांची तोड चालू होती. ऊसतोडीवाल्यांना शाळेचे, शिक्षणाचे महत्त्व

सांगितले. पण काही उपयोग झाला नाही. दुसऱ्या दिवशी शाळेकडे कोणीही फिरकले नाही. पण श्रीमती लोखंडे यांनी हार मानली नाही. पालकांचा शाळेप्रति दृष्टिकोन बदलणे गरजेचे होते. त्यासाठी त्यांनी वेगवेगळे उपक्रम राबवायचे ठरवले. दिवाळीच्या काळात शाळेतील मुलांतर्फे पणत्या रंगवून, आकाशकंदील तयार करून प्रबोधनासाठी थेट फडात पोहोचल्या. तिथे प्रत्येक कुटुंबात पणत्या, आकाशकंदील तसेच दिवाळीच्या फराळाचे वाटप केले. त्यामुळे शाळेप्रति पालकांना आस्था वाटू लागली. परिणामी शाळा सुरू झाल्यावर पहिल्याच दिवशी एक ६ वर्षाची मुलगी आली. गायत्री तिचे नाव. शाळेतील नवखे वातावरण पाहून ती रडू लागली. तिची समजूत घातली. खाऊ दिल्यावर खूश झाली. शाळेतील मुलींनी तिचे सर्व आवरून दिले. नखे कापली. तिला शालेय साहित्य दिले. दिवसभरात छान रमली. तिचे वडील अनिल मोरे हे टोळीचे प्रमुख. त्यांच्याशी संपर्क साधला आणि इतर मुलांना पाठवण्यासाठी विनंती केली. दुसऱ्या दिवशी गायत्रीबरोबर चार मुली आल्या. आरती, मोहिनी, सुनिता आणि सीता. ८ ते ९ वर्ष वयोगटातील या मुलींचे स्वागत करण्यात आले व त्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. काम एवढ्यावरच थांबले नाही. पुन्हा सर्वेक्षण सुरू केले. दोन जथ्थ्यातील मुली आल्या होत्या. पण एकही मुलगा आला नव्हता. म्हणून एका शनिवारी कडाक्याच्या थंडीत श्रीमती लोखंडे व त्यांचे ७वीचे विद्यार्थी त्यांच्याकडे गेले. मुलांना शाळेत पाठविण्याविषयी सांगितले. पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. याकामी टोळीमालक, गुऱ्हाळमालक यांची मदत घेतली. याची फलश्रुती म्हणजे ६ मुले शाळेत आली. विशेष म्हणजे यामध्ये एक मूकबधिर विद्यार्थीसुद्धा शाळेच्या प्रवाहात आला. आता शाळेत या ११ विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू झाले.

समाजमाध्यमाद्वारे या मुलांच्या शाळांशी संपर्क साधला आणि हमीकार्ड मागवून घेतले. आता शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या १७ झाली. शाळेचे मुख्याध्यापक विजय ठोंबरे, सुरेखा कुंजीर, अरुणा लोहोकरे, नीता कुंजीर, चैत्राली बगाडे, माधुरी वेल्हाळ, मंगल ढव्हळे यांच्या साहाय्याने या मुलांसाठी स्वयंसेविकेची नेमणूक केली.




**बाल साहित्य संमेलन कार्यक्रमात जि.प. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी काढलेली ग्रंथ दिंडी. सोबत प्रयोगशील शिक्षिका अनिता जावळे**

**अनिता महादेव जावळे (प्राथमिक पदवीधर शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोरगाव काळे ता.जि.लातूर.)**

प्राथमिक शाळेतील मुलांसाठी बाल साहित्य संमेलन आयोजित केले. यात नियोजनाप्रमाणे ग्रंथदिंडी थाटामाटात निघाली. मुलांनी आपल्या कल्पनेने पालखी तयार केली होती. त्यातील देखावे सुंदर होते. दिंडित नवचैतन्य भरलेले होते. मुल अगदी फुलासारखी दिसत होती मुलींनी सावित्रीबाई आणि राजमाता जिजाऊंचा पोषाख परिधान केला होता. ग्रंथदिंडीने बोरगावकरांचे मन जिंकली. कविकट्टा मुलांचा हक्काचा. कविकट्ट्यात १ली ते ७वी पर्यंतची मुले सहभागी झाली होती. बाहेरगाव म्हणजे रेणापुरवरून गायत्री सूर्यवंशी ही बालकवयित्री आली होती. तिने कविता सुंदररीत्या सादर केल्या. त्यानंतर इयत्तानिहाय कविता सादर केल्या. त्यातील 'मोहसीनचे माकड' ही कविता मुलांना खूप आवडली. कवितेचे विषय वेगवेगळे होते. आपल्याच भावविश्वातील परिसर, शाळा, आई, झाड, रान, रोपटे, वावर, पुस्तक, जत्रा, शेत, आंबा संमेलन, वारा, घर अशा भन्नाट विषयावर मुलांनी कविता सादर केल्या. या सत्राच्या अध्यक्ष म्हणजे वृषाली ताई खूपच आनंदी झाल्या. तसेच मुलांचे कौतुक केले. आपल्यादेखील कविता सादर केल्या. मुलांना कविता कट्टा खूप आवडला. मुलांनी आपल्याच भावविश्वातील अनुभवलेल्या स्वरचीत कथा अगदी आत्मविश्वासाने सादर केल्या.

रत्नदीप २ रीत शिकतो त्याने बाबा कथा सादर केली तर रितेशने जंगल, वैष्णवीने कावळ्याची शाळा, आसमाची कथा खट्याळ गुलाब, तेजस ची कथा सुपक्या तर महादेवीने आमची टिनू या कथा सादर केल्या. वेगवेगळे विषय आणि भन्नाट मांडणी मुलांनी केली. आयशाची बरसात कथा तर सर्वांना आवडली. तसेच अन् भिंती बोलू लागल्या. लक्ष्मी, भाषादालन, माझं दिवास्वप्न, वासरू अशा सुंदर कथा मुलांनी सादर केल्या.

**प्राथमिक शिक्षक, आवलगाव, जि. जालना**



गडचिरोलीची सुवर्णकन्या एंजल विजय देवकुले

# सुवर्णकन्या

**अवघ्या अकरा वर्षाच्या वयात वयापेक्षाही तिप्पट पदके पटकावणारी एंजल गडचिरोलीची भूषण ठरली आहे. गडचिरोली जिल्हा राज्याच्या आणि देशाच्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत मागास म्हणून ओळखला जातो, मात्र राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तब्बल ४० पदके पटकावणाऱ्या एंजल विजय देवकुलेने गडचिरोलीचे नाव देशाच्या पटलावर कोरले असून हा जिल्हा मागास नाही तर प्रतिभावंताचा जिल्हा असल्याचे दाखवून दिले आहे.**


**अनिल गडेकर**

स्कॉय मार्शल आर्ट या क्रीडा प्रकारात एंजल देवकुलेने मिळवलेले यश नेत्रदीपक आहे. तिच्या याच यशामुळे नुकताच राष्ट्रीय बालशक्ती पुरस्कार देऊन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी तिला सन्मानित केले आहे. राष्ट्रीय बालशक्ती पुरस्कार हा नावीन्य, समाजसेवा, शैक्षणिक, क्रीडा व संस्कृती, शौर्य या प्रकारातील गुणवंतांना दिला जातो. तो मान गडचिरोली येथील स्कूल ऑफ स्कॉलर्स या शाळेत इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या एंजल देवकुलेने पटकावला आहे. तिच्या कामगिरीचे कौतुक करताना तिचे प्रशिक्षक संदीप पेदापल्ली यांनाही विसरून चालणार नाही. जो क्रीडा प्रकार अनेकांना माहीत नाही अशा क्रीडा प्रकारात एंजलला निपुण करण्यात संदीपचेही मोठे योगदान आहे. नुकत्याच २६ जानेवारी रोजी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय परेड कार्यक्रमात एंजलला उपस्थित राहण्याची संधी लाभली. त्या वेळी तिचे प्रशिक्षक तिथे उपस्थित होते. शिष्याचा सन्मान हा गुरूसाठी महत्त्वपूर्ण ठरतो. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागातील मुलीचा हा सन्मान म्हणजे गडचिरोली जिल्ह्याचा सन्मान आहे.

## जिद्द आणि मेहनत

८ मे २००८ रोजी येथील व्यापारी विजय देवकूल यांच्या घरी जन्माला आलेल्या या सुवर्णकन्येची जिद्द आणि मेहनत अनेकांना अवाक करून सोडणारी आहे. अवघ्या ५ वर्षांच्या वयापासूनच एंजलने 'स्कॉय मार्शल आर्ट' या खेळाची सुरुवात केली आणि अल्पावधीतच तिने या खेळात प्रावीण्य प्राप्त केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'स्कॉय मार्शल आर्ट' या खेळात २०१७ मध्ये नेपाळ येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्णपदके पटकावली. त्यानंतर पुन्हा त्याचवर्षी थायलंडमध्ये झालेल्या स्पर्धेतही तिने २ सुवर्णपदके पटकावली. राष्ट्रीय स्तरावर झालेल्या स्पर्धांमध्ये तिने ९ सुवर्णपदके प्राप्त केली. २००५ ते २०१८ दरम्यान राज्यस्तरावर झालेल्या विविध ठिकाणच्या स्पर्धेत एंजलने १० सुवर्णपदके पटकावली आहेत. म्हणूनच या सुवर्णकन्येचा गडचिरोली क्लबने 'गडचिरोली गौरव' पुरस्कार देऊन तिचा गौरव केला आहे. इतक्या कमी वयात आंतरराष्ट्रीय पातळीवर आपले व जिल्ह्याचे नाव कोरणारी एंजल गडचिरोलीच्या गळ्यातील ताईत ठरली आहे.

**जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर**



# माझी 'क्लिक' कविता

मूळच्या लातूरच्या आणि सध्या ठाणे येथे वास्तव्यास असलेल्या ऋता कळमणकर या व्यावसायिक वन्यजीव छायाचित्रकार आहेत. पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या क्षेत्रात त्यांनी आपले स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. वन्यजीव छायाचित्रण हे इतर छायाचित्रणापेक्षा अधिक कष्टाचे, धोक्याचे आणि संयमाची परीक्षा घेणारे असते. त्याचे प्रत्यंतर त्यांनी काढलेल्या विविधांगी छायाचित्रांमधून दिसून येते.



स्पिडी विंग्ज ग्रीन ज्वेल हमिंग बर्ड कोस्टारिका

ऋता कळमणकर

माझा जन्म, शालेय शिक्षण, तसेच सोशल सायन्स पदवीपर्यंतचे शिक्षण मराठवाड्यातील, लातूर येथे झाले. लग्नानंतर काही काळ सोलापूर आणि नंतर ठाणे येथे वास्तव्यास आहे.

घरातील जबाबदाऱ्या पूर्ण करून मी स्वतः छायाचित्रणासाठी झोकून द्यायचे ठरवले. छायाचित्रणाची आवड जोपासायची ठरवले. मला अजूनही आठवते, माझे पहिले जंगल भ्रमण हे ताडोबाचे व्याघ्र प्रकल्प होते. अंगावर शहारे आणणारा तो अनुभव. कारण मला भव्यदिव्य अशा रॉयल बंगाल टायगरचे दर्शन घडले. मला माझ्या परिवाराची व आप्तस्वकीयांची विशेष साथ लाभली. त्या हिमतीवर पुढे मी डिजिटल कॅमेरा व छायाचित्रणाचे तंत्र आत्मसात केले. मी जेव्हा फोटोटूरवर असते तेव्हा मला घरातील प्रत्येक प्रश्नांपासून दूर ठेवले जाते व माझी शांतता भंग न करता मला जे फोटोग्राफ्स मिळाले आहेत त्याच्याबद्दल जास्त चौकशी होते.

मी देशविदेशातील विविध नॅशनल पार्कना भेट दिली. तिथे भेट देण्यापूर्वी तेथील प्राणी, पक्षी त्यांचे जैवचक्र, सवयी इत्यादींचा बारकाईने अभ्यास केला. खरं तर पुरुषांची मक्तेदारी असलेल्या या वन्यजीव फोटोग्राफीच्या छंदात मी उडी मारली होती खरी, पण वाट दिसते तेवढी सोपी नव्हती. कारण संपूर्ण दिवस अगदी पहाटेच्या गारव्यात सफारीला सुरुवात होते. कोवळे ऊन, दुपारचे रखरखते ऊन झेलत प्रवास करावा लागतो. जंगलातील कोणती धोकादायक प्रजाती तुमच्या समोर असेल याचा नेम नाही. या वाटेत तुम्हाला खाणे–पिणे सर्व बेताचेच मिळते. ज्या वातावरणामध्ये तुम्ही असता तिथे सन्सक्रीमसुद्धा काहीच करू शकणार नाही. पण या सगळ्याची जर तुम्हाला आवड असेल तर बाकी गोष्टी गौण वाटू लागतात.

## देशविदेशातील पर्यटन

आतापर्यंत भारतातील रणथंबोर, कान्हा, बांधवगढ, जिम कॉर्बेट, ताडोबा,

पेंच अशा अभयारण्यांना बऱ्याचदा भेटी दिल्या आहेत. परदेशातील केनिया, टांझानिया, बोट्स्वाना, मध्य अमेरिकेतील कोस्टारिका, अलास्का, अमेरिकेचा पूर्व व पश्चिम भाग व समुद्र किनारा, न्युझिलंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण-पूर्व आशिया इ. ठिकाणी भेटी दिल्या आहेत. तेथील प्राण्यांची विशेष माहिती गोळा केली आहे. कोस्टारिकात आढळणाऱ्या सरपटणाऱ्या काही प्रजाती विषारी आहेत. तिथे फोटोग्राफी करणे खूप आव्हानात्मक होते. तो अनुभवदेखील वेगळा होता. बोट्स्वानामध्ये तुम्हाला कुठल्याही संपर्क साधनाशिवाय जंगलात वास्तव्य करावे लागते.

या प्रवासात मला अनेक अनुभव आले आणि विशेष म्हणजे बऱ्याचशा दुर्मीळ



रेअर ग्लेसिंग बटरफ्लाय



ऋता कळमणकर

प्रजातींचे फोटो काढण्यात यश मिळाले. ग्लास विंग बटरफ्लाय हे दुर्मीळ जातीचे फुलपाखरू त्याचप्रमाणे लायनटेल्ड मकाक (सिंहपुच्छ माकड), काझीरंगाचे महाकाय एकशिंगी गेंडे, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेले उत्तर ध्रुवावरील पोलर बेअर, जगभरात फक्त मादागॅसकर या अनोख्या बेटावर आढळणारे लिमूर्स, रेनफॉरेस्टमधील सापांच्या विविध जाती, सेंट्रल अमेरिकेत दिसणारे चिमुकले हमिंग बर्ड असे कितीतरी दुर्मीळ फोटो माझ्या संग्रही जमा आहेत.

## विविध माध्यमांतून लेखन

मला ठाण्यातील ज्येष्ठ छायाचित्रकार धनेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर कॅमेरा सतत हाताळून त्यात जास्तीत जास्त स्वतःच माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. दीड वर्षांपासून वृत्तपत्रांमधून प्राणी आणि पक्षी यांच्याबद्दल माहितीपर लेखन व त्यांच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणाऱ्या संस्थांमध्ये सहभाग दिला. काही देशी व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग आणि बक्षिसे मिळवली. दिवाळी अंकामधून लेखन, प्रथितयश मासिकांच्या मुखपृष्ठावरील फोटोग्राफ, छोट्यांना वर्कशॉपमधून मार्गदर्शन तसेच विविध ठिकाणी स्लाईडशोचे आयोजन व प्रदर्शनचे आयोजन केले.

## प्रभावी माध्यम

फोटोग्राफीने मला माणूस म्हणून समृद्ध केले. मला प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची एक वेगळी नजर दिली. जे खूप शब्द वापरून सांगावे, ते एका छायाचित्रातही व्यक्त करता येते, असे हे प्रभावी माध्यम. निसर्गातील सर्व चल आणि अचल गोष्टींचा आदर करायला मला फोटोग्राफीने शिकवले.

## केल्याने देशाटन

फोटोग्राफीच्या निमित्ताने मला निरनिराळे देश पाहण्याची संधी मिळाली, देवाने बनविलेल्या अप्रतिम सौंदर्याचा साठा पाहता आला. माणूस म्हणून समृद्ध होण्याच्या प्रक्रियेत छायाचित्रीकरणाचा वाटा मोठा आहे.

सीमारेषा न पाळणारे पक्षी, प्राणी, मला माणसाने बनवलेल्या सीमारेषांच्या खुजेपणाची जाणीव देऊन गेले. व्हिक्टोरिया फॉल्स आणि नायगारा पाहताना निसर्गाच्या अतिप्रचंड सुंदर अस्तित्वासमोर माणूस किती छोटा आहे याची जाणीव झाली. नि:शब्द होऊन निसर्ग न्याहाळताना शब्दांशिवाय किती बोलता येतं हे समजलं. आफ्रिकेत एकदा आमच्या सर्वांच्या पाण्याच्या बाटल्यात उरलेलं सर्व पाणी एकत्र करून आमच्या ड्रायव्हरने ते एका स्थानिक मुलाला दिलं. त्याच्या या नबोलता केलेल्या कृतीने मला फार मोठा धडा मिळाला तो पाणी जपून वापरण्याचा.

## कौतुकास्पद

एक स्त्री म्हणून निसर्ग, प्राणी आणि

तंत्रज्ञान काहीच भेद करत नाहीत. तो सर्वसमावेशक आहे. त्यामुळे स्त्री म्हणून फोटोग्राफी करताना, एकटंदुकटं फिरताना उलट माझ्या वाट्याला जास्त कौतुकच आल. कोस्टारिका या मध्य अमेरिकेतील देशामध्ये २०१५ ला तेथील वर्षावनांना अर्थात रेन फॉरेस्टला मी भेटी दिल्या, तेव्हा तेथील लोकांनी मला सांगितले की, भारतातून येणाऱ्या तुम्ही फोटोग्राफीच्या सर्व आयुधांनिशी आलेल्या एकमेव फोटोग्राफर आहात. भारतीय स्त्रीची अजूनही जगभरातील प्रतिमा काही ठिकाणी, फक्त चूल आणि मूल अशीच आहे. मी, त्यांच्या कल्पनेला छेद दिला आणि त्यांना सांगितले की, आज भारतीय स्त्रिया कोणत्याही क्षेत्रामध्ये मागे नाहीत. मादागास्कर या बेटांवरती मला पाच ऑस्ट्रेलियन मैत्रीणींचा ग्रुप भेटला, माझ्याकडून एका संध्याकाळचा वेळ मागून घेऊन, त्यांनी माझे फोटो व त्याबद्दलची माहिती घेतली व भारतातील विविध जंगल सफारीमध्ये आम्हाला तुमच्या मदतीची खूप गरज आहे, कारण जंगल सफारी करणाऱ्या स्त्रिया खूप कमी आहेत, असे सांगून त्यांचे भारतातील यजमानपद त्यांनी स्वत:हूनच मला बहाल केले.

## फोटोग्राफीचे तंत्र


इतर क्षेत्राप्रमाणे याही क्षेत्रात आव्हाने असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या क्षेत्रात तुमच्या फिजिकल फिटनेसचा कस लागतो. खंबीर आणि निर्भय मन आणि खंबीर शरीर या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. बऱ्याच जंगलांमध्ये पायी चालावे लागते. दिवसाचे किमान १६ ते १७ किलो मीटर, १२ ते १३ किलो कॅमेरा आणि लेन्सचे वजन पाठीवरती घेऊन फिरावे लागते. सर्वप्रथम ज्या जंगलाला भेट द्यायची आहे तेथील जैववैविध्यतेची सखोल माहिती, तेथे आढळणारे प्राणी, त्यांची काही खासियत असल्यास त्याची माहिती आधीच गोळा करावी लागते. घनदाट जंगलात दिवसा आणि रात्री लांबचलांब प्रवास करण्याची मानसिक तयारी लागते. काही प्राणी उभयचर, सरपटणारे प्राणी हे फक्त रात्रीच दिसतात. त्यामुळे उशिरापर्यंत जंगलात फिरावे लागते. खरंतर हा अनुभव खूप सुंदर असतो. चंद्राच्या प्रकाशात रातकिड्यांच्या आवाजात बेडकाला त्याच्या आवाजावरून अचूक ओळखणे आणि त्या दिशेने चालत जाणे हे आव्हानात्मक वाटते. रात्रीच्या वेळी पायाखाली साप, विंचू येऊ शकतात.

एक वन्यजीव फोटोग्राफर म्हणून या प्राण्यांना, त्यांच्या घरात कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही याची सावधानता बाळगावी लागते. अनोळखी ठिकाणे, अनोळखी माणसे, वेगळ्या पद्धतीचे जेवण या सर्व गोष्टींशी ॲडजस्ट करणे, त्याचप्रमाणे नुसती फोटोग्राफी करून चालत नाही, तर फोटोप्रोसेसिंगचे तंत्रही शिकून घ्यावे लागते. पक्षी आणि प्राण्यांची सखोल माहिती मिळवणे, आपण फोटो काढला त्यावेळी तो प्राणी काय करीत होता याची नोंद ठेवणे, पक्षी असेल तर त्याची चोच आणि पाय याची रचना काळजीपूर्वक पाहाणे हे गरजेचे आहे. बऱ्याच ठिकाणी राहण्याची सुविधा खूप साधारण असते. अशाही ठिकाणी राहावे लागते. कुटुंबीयांशी संपर्क करता येत नाही कारण जंगलामध्ये नेहमीच नेटवर्कची समस्या असते. सहकारी ही क्वचितच एखादी स्त्री असते, कारण या क्षेत्रामध्ये पुरुषांची संख्या जास्त आहे. या सहफोटोग्राफरसोबत मिळून-मिसळून वागणे गरजेचे आहे.

वन्यजीव फोटोग्राफीतील सगळ्यात मोठे आव्हान म्हणजे हे क्षेत्र खूप अनिश्चित आहे. प्राणी किंवा पक्षी कुठून कसा येईल,


पॅरोट वाइन स्नेक


लिमूर्स



केनियातील मसाईमारा येथील मावळतीचे क्षण

लाईट कुठून असेल, अँगल काय असेल, आपण कॅमेरा हातात घेईस्तोवर पक्षी उडून जाईल का, प्राणी निघून जाईल का, यातील कोणतीच गोष्ट फोटोग्राफरच्या हातात नसते. त्यामुळे मिळणारे दोन-तीन क्षण व त्यामध्ये घेतलेला अचूक शॉट महत्त्वाचा ठरतो. कॅमेऱ्याबाबतचे तुमचे ज्ञान आणि कॅमेऱ्यावरची तुमची पकड या दोन्ही गोष्टी मजबूत हव्यात. लाईट जर मागून येत असेल आणि समोर वाघ असेल तर निराश न होता पटकन रिमलाईट शॉट किंवा छायाआकृती अथवा बॅकलाईट शॉट घ्यावा आणि आपला फोटो युनिक बनवावा. बरेचदा रात्री-बेरात्री गाडी बंद पडू शकते, वादळ येऊ शकतात, एखादा प्राणी आडवा येऊ शकतो, अशा प्रसंगी पॅनिक न होता शांततेने निर्णय घेणे हेही एक प्रकारचे आव्हानच आहे.

या क्षेत्रामध्ये महिलांची संख्या कमी आहे. परंतु, आजकाल बऱ्याच मुली फोटोग्राफीचं रीतसर शिक्षण घेऊन या क्षेत्रात प्रवेश करीत आहेत. या क्षेत्रात टिकून राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुली फोटोग्राफी सुरू करतात, काही छंदापुरतीच मर्यादित ठेवतात. काही व्यवसाय म्हणून स्वीकारतात. परंतु लग्नानंतर जोडीदाराला सोडून एकटे कसे जायचे या मानसिकतेमुळे वन्यजीव फोटोग्राफी करणाऱ्या मुली, लग्नसमारंभाची फोटोग्राफी करतात. इतर नोकरी व्यवसायात जसा वेळ द्यावा लागतो, म्हणजे जशी एखादी डॉक्टर रोज सकाळ-संध्याकाळ क्लिनिकमध्ये जाऊन काही तास बसते, तसेच फोटोग्राफरलाही वन्यजीवांसंबंधी वाचन, फोटोप्रोसेसिंग यासाठी घरी असताना वेळ द्यावा लागतो.

### नैसर्गिक आठवणींचा खजिना

अचूक आणि वेगवान निर्णयक्षमता, धाडसीवृत्ती या माझ्या जन्मजात गुणांना पुष्टी दिली. गजबजलेली शहरे ते निर्मनुष्य पोलाद प्रदेश, हिरवीगार जंगले ते लांबवर पसरलेली गवताळ कुरणे, घनदाट झाडी ते वाळवंटी प्रदेशातील खुरटी झुडपे, उंच बर्फाच्छादित डोंगर ते खोल दऱ्या, पातळ कापडाच्या तंबूत केलेलं जंगलातील वास्तव्य, पक्षांच्या आवाजाने येणारी जाग, डोळे उघडल्यावर समोर दिसणारी हरणे, किलबिलाट करणारे पक्षी, पोलार प्रदेशात जहाजाच्या डेकवर उभं राहून तासन्तास पाहिलेला दूरवर पसरलेला बर्फ, येथे काही जीवन असेल की, नाही अशी शंका येण्याच्या आत, समोरून उडत जाणारे पक्षी, भल्या पहाटे उघड्या जीपमध्ये अंगाला झोंबणारं गार वारं, अतिशय प्रसन्न वातावरणात होणारे सूर्योदय आणि सोनेरी सायंकाळी, अनोळखी प्रदेश, अनोळखी माणसे, त्यात मिळणारी एखादी जिवलग मैत्रीण, जेव्हा मी छोट्या-मोठ्या



प्रवासासाठी बाहेर पडते, तेव्हा दिसणारी प्रत्येक गोष्ट मी माझ्या मनात साठवून ठेवते. आयुष्यभर पुरेल असा हा खजिना आहे. माझ्या या अनमोल खजिन्यात खूप फोटो, त्यामागील आठवणी, त्यामागील प्रसंग, मेहनत, त्या वेळी घडलेल्या प्रसंगाची चित्रे माझ्या मनात जिवंत आहेत, त्या अर्थाने मी खूप श्रीमंत आहे. छायाचित्रीकरणाने मला आयुष्यभर पुरणारा आठवणींचा खजिना दिला.

## वन्यजीव छायाचित्रीकरण

वन्यजीव छायाचित्रकारांना सर्व प्रथम जो मोसम असेल त्याप्रमाणे प्रवासाचे नियोजन करावे लागते. म्हणजे हिवाळ्याची सुरुवात झाली की भारतभर स्थलांतरित पक्षी येऊ लागतात. उतराखंड, नैनिताल, सत्ताल येथे खास पक्षी निरक्षणासाठी भेटी दिल्या जातात. त्याचबरोबर स्थलांतरित पक्ष्याचे थांबे असणारे चिल्का सरोवर, ओरिसा, भरतपूर, राजस्थान, भिगवन, महाराष्ट्र अशा ठिकाणी पक्ष्यांची प्रचंड विविधता पाहावयला मिळते. हिवाळ्यामध्ये उन्हाचा कडका कमी असल्याने बराच वेळ फोटोग्राफी करता येते. जर मोठ्या प्राण्याची फोटोग्राफी करायची असेल तर उदा. उन्हाळ्यामध्ये व्याघ्र प्रकल्पांना भेटी द्याव्या लागतात. उन्हाळ्याच्या काहिलीने त्रस्त झालेली जनावरे पाणवठ्यावरती नक्की येतात. वन्यजीव छायाचित्रकाराला भल्या पहाटे जंगलात प्रवेश करून कोठे प्राण्याची काही हालचाल आहे की, नाही याचा मागोवा घ्यावा लागतो. सकाळी पाणवठ्यावर पक्ष्यांची फोटोग्राफी चांगली होते. साप, बेडूक यांच्या फोटोसाठी शक्यतो रात्री फिरावे लागते.

वन्यजीव छायाचित्रांमध्ये जर तुम्हाला फक्त फुलपाखरू, बेडूक आणि साप याची फोटोग्राफी करावयाची असेल तर मायक्रो लेन्स वापरावे लागते. फक्त पक्षांची फोटोग्राफी करावयाची असेल तर ६०० ते ८०० एमएमची टेलिफोटो लेन्स वापरावी लागते. तुमची आवड जर मोठ्या प्राण्यामध्ये असेल तर साधारण ७०-२०० हे टेलीफोन लेन्स वापरावे लागते. आपल्याला नक्की कुठल्या क्षेत्रात रस आहे हे पाहून कॅमेरा किंवा लेन्स खरेदी करावे लागते. फोटोग्राफी नंतर वन्यजीव छायाचित्रकार म्हणून फोटो प्रोसेसिंगचे तंत्रसुद्धा आत्मसात करावे लागते. प्रत्येक वेळेस प्रवासासाठी लांब जाण्याची गरज नसते. आपल्या आजुबाजूलाही भरपूर प्राणी व पक्षी आपल्याला सतत दर्शन देत असतात. उदा. खंड्या, किंगफिशर हा पक्षी एखाद्या ठिकाणी बसलेला असेल आणि तुम्ही फोटो काढावयाच्या आधी तो निघून गेला तर निराश न होता त्याच जागी थांबावे. या पक्ष्यांला १०-१५ मिनिटांनी परत परत मूळ जागी येण्याची सवय असते. भल्या पहाटे जंगलात प्रवेश करावा म्हणजे साम्राज्याची पाहणी करावयाला निघालेला वाघ हमखास दिसतो. जर फुलपाखरांची फोटोग्राफी करावयाची असेल तर सकाळी बराच वेळ फुलपाखरांना पंख उघडून बसायची सवय असते. त्यांच्या पंखावरील दव वाळल्याशिवाय ते उडू शकत नाहीत. ही वेळ त्यांच्या फोटोग्राफीसाठी अत्यंत योग्य ठरते. ही सर्व माहिती असणे वन्यजीव छायाचित्रकारासाठी महत्त्वाचे आहे.

**वन्यजीव छायाचित्रकार**
**संपर्क: ९८१९९ ०९२९२**



आफ्रिकेतील मदागासकर येथील जंगलातील सुर्यास्त



सर्पमित्र वनितााताई बोराडे

**सर्प संवर्धनाच्या क्षेत्रात पुरुषांचे वर्चस्व आहे. या क्षेत्रात सहसा महिला येत नाहीत. अशा स्थितीत बुलडाणा जिल्ह्यातील बोथा या छोट्या गावच्या वनिता बोराडे यांनी या क्षेत्रात धाडसाने पाऊल टाकले. आज त्या महाराष्ट्रात आणि देशात महिला सर्पमित्र म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या या कार्याची दखल वेगवेगळ्या संस्था आणि संघटनांनी घेतली आहे.**

# डाव्या हाताचा खेळ...

**एस. के बावस्कर**

साप हा शब्द ऐकला, तरी अंगावर शहारे येतात. कुठे आहे.. कुठे आहे. अशी सर्व धावाधाव सुरू होते. मग चालते शोधमोहीम.. मात्र जर साप विषारी असेल,तर पकडणे दूरच सर्व जीव मुठीत घेऊन पळतात. अशा परिस्थितीत सर्पमित्र देवासारखा धावून येतो. सर्पमित्र हा येऊन साप पकडतो.. सुरक्षित ठिकाणी सोडून देतो. मात्र एक महिला सर्पमित्र जेव्हा साप पकडायला, येते तेव्हा सर्वांच्या भुवया उंचावतात. ही सर्पमित्र महिला आहे, बुलडाणा जिल्ह्यातील बोथा येथील वनिता बोराडे.

## नवे साहस

महिला पुरुषांच्या खांद्याला–खांदा लावून समाजातील प्रत्येक क्षेत्रात कार्य करीत आहेत. क्वचितच असे एखादे क्षेत्र स्त्री कर्तृत्वाने वंचित असेल. त्यामध्ये आता सर्प संवर्धनाचे क्षेत्रही सुटले नाही. या क्षेत्रात महिलांनी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. एखाद्या घरात, शेतात किंवा सार्वजनिक ठिकाणी साप निघाला, की सुरू होतो गोंधळ आणि भीतीचे वातावरण. या वातावरणाचा मात्र निर्भयपणे सामना करीत वनिता बोराडे सर्पमित्र असल्याचा सार्थ अनुभव देतात. जंगलाची आवड, सापांच्या जवळीकतेचा अनुभव या सर्व गोष्टींमुळे बोथा, (ता. मेहकर, जि. बुलडाणा) येथे कायमचे वास्तव्य वनिता बोराडे यांनी केले आहे.

## विविध सन्मान

सर्पमित्र वनिताताई ह्या राज्यात पहिल्या महिला सर्पमित्र म्हणून कार्यरत आहेत. पिपल फॉर निमल, नवी दिल्ली या संस्थेच्या त्या आजीव सभासद आहेत.

ज्या राज्यात सर्पमित्र हा शब्द अपरिचित असताना आज त्यांच्या वयाच्या पन्नाशीपर्यंत वनिताताई काम करीत आहेत. त्यांनी जवळपास ५१ हजारांपेक्षा जास्त बिनविषारी व विषारी साप लोकांच्या घरातून, शेतातून अथवा सार्वजनिक ठिकाणांहून पकडून वन विभागामार्फत जंगलात सोडून दिले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये घेण्यात आली आहे. एवढे धोकादायक काम करताना वनिताताईंना कधीही सर्पदंश झाला नाही हे विशेष. एका कॉलवरती त्या सापांपासून जीव वाचवण्यासाठी आणि सापांना जीवदान देण्यासाठी धावतात. केवळ साप पकडून त्यांना वाचवणे एवढेच काम त्या करीत नाहीत, तर सापांविषयीचे अज्ञान शाळा–महाविद्यालयांमधून त्या दूर करतात. वनिता बोराडे यांचे सर्पज्ञानही कमालीचे आहे. त्या सर्पज्ञानांवर शाळा– महाविद्यालयांमधून व्याख्याने देतात. त्यामधून मोठ्या प्रमाणावर सर्पज्ञान पाझरते. साप हा मानवाचा शत्रू नसून मित्र आहे, याचे महत्त्व त्या आपल्या व्याख्यानातून पटवून देतात. सर्पकीर्तन करून त्या सापांविषयीचे ज्ञान समाजाला देतात. कार्यशाळा घेऊन विद्यार्थ्यांना सर्पदंश प्रथमोपचार, सर्पसंरक्षण, सर्पसंवर्धन, सर्पसंशोधन याविषयी त्या मोलाचे मार्गदर्शन करतात.

### प्रथमोपचारासाठी मदत

एवढेच नव्हे, तर सर्पदंश झाल्यानंतर डॉक्टरही प्रथमोपचारासाठी वनिताताईंची मदत घेत असतात. त्यामुळे वनिताताई सर्पमित्र जरी असल्या तरी या क्षेत्रामधील महिलांचे अबलापण त्यांनी नामशेष केले आहे.

**जिल्हा माहिती अधिकारी, बुलडाणा**

**चिखली तालुक्यातील शेलसूर येथील श्री शिवाजी हायस्कूल येथील विज्ञान शिक्षक लक्ष्मण कृष्णा वरपे यांनी स्वत: ला मुलगा नसल्याची कुठलीही खंत न बाळगता आपल्या चारही मुलींना डॉक्टर बनवून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे.**

# एमबीबीएसचा ‘चौकार’

**निलेश तायडे**

समाजाला लागलेला स्त्रीभ्रूण हत्येचा आजार दूर करण्यासाठी अनेक प्रयत्न केले जात आहेत. मुलीच्या जन्माचे स्वागत करण्यासाठी शासन स्तरावरून विविध उपक्रम राबवण्यात येतात. अनेक सामाजिक संस्था, एनजीओ यांच्या माध्यमातून स्त्री जन्माचे स्वागत करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवले जातात. केंद्र शासन बेटी बचाओ – बेटी पढाओ अभियान राबवते. स्त्रीभ्रूण हत्येची समाजाला लागलेली कीड दूर करण्यासाठी एवढे प्रयत्न होत असतानाही समाजात अशा घटना कुठेना कुठे घडतच असतात. अशा विकृतींना चिखली येथील लक्ष्मण कृष्णा वरपे यांनी मात्र सडेतोड उत्तर दिले आहे.

### स्त्री शिक्षणाचा वसा

मुलगा–मुलगी भेद विसरून आधुनिक युगात वावरतांना मुलींना उच्च शिक्षणाची कवाडे उघडून देणारे श्री. वरपे. खऱ्या अर्थाने आज स्त्री शिक्षणाचा वसा सांगून जातात. त्यांनी आपल्या चारही मुलींना एमबीबीएस केले. समाजात स्त्री शिक्षणासाठी झटणारे व्यक्तिमत्त्व म्हणून आपली ओळख सिद्ध केली.

शहरी भागात स्त्री मुक्तीचे वारे वाहत असताना ग्रामीण भागात अजूनही मुलगा वंशाचा दिवा आहे, म्हातारपणाची काठी आहे, अशा सबबीखाली मुलगी नकोशी वाटते. या मानसिकतेला वरपे



स्वाती, साधना, शारदा, वर्षा.

यांचे उदाहरण प्रेरक ठरते. चिखली तालुक्यातील शेलसूर येथील श्री शिवाजी हायस्कूल येथील विज्ञान शिक्षक असणाऱ्या श्री. वरपे यांनी मुलगा नसल्याची खंत न बाळगता आपल्या चारही मुलींना डॉक्टर बनवून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. मुली एमबीबीएस पूर्ण होईपर्यंत घरामध्ये काटकसरीचे जीवन जगणारे श्री. वरपे मुलींना नेहमी साधेपणाचा सल्ला देत असत. त्यांच्या मुलींनीही त्यांचा सल्ला दुर्लक्षित केला नाही, एमबीबीएसला प्रवेश मिळेपर्यंत एकाही मुलीकडे मोबाइल नव्हता.

### यशोशिखराकडे

त्यांची मोठी मुलगी स्वाती वरपे, दुसऱ्या क्रमांकाची साधना वरपे यांनी अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे एमबीबीएस पूर्ण केले. तिसऱ्या क्रमाकांची शारदा वरपे आणि चवथ्या क्रमांकाची वर्षा वरपे यांनी मुंबई येथील लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालय, सायन मुंबई येथे एमबीबीएसची पदवी पूर्ण केली. या मुली केवळ एमबीबीएस शिक्षणावरच समाधानी राहिल्या नाही, तर त्यांनी पदव्युत्तर पदव्याही घेतल्या. मोठी मुलगी मुंबई येथून डिजीओ झाली असून ती पुणे येथे रुग्णालय चालवत आहेत. साधनाने मुंबई येथून पदव्युत्तर पदवी घेतली आहे. ती औरंगाबाद येथे रुग्णालय चालवते. शारदा हिने भूलतज्ज्ञ क्षेत्रात पदव्युत्तर पदवी घेतली आहे. ती औरंगाबाद येथे क्लिनिक चालवत आहे. वर्षा ही एम.डी (स्त्री रोग तज्ज्ञ) शिक्षण घेत आहे. त्या तीन मुलींचे लग्न झाले असून त्यांच्या पतीसमवेत वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत.

लक्ष्मण कृष्णा वरपे सध्या सेवानिवृत्त शिक्षक आहेत. त्यांच्या शिक्षकी पेशात त्यांनी उत्कृष्ट ज्ञानदानाचे कार्य केले. त्यांना वाचनाची खूप आवड असून सरांच्या घरामध्ये लायब्ररी आहे. त्यामध्ये वर्तमानपत्रे, पुस्तके, मासिके यांचे विपुल भांडार आहे. चारही मुलींना डॉक्टर करून श्री. वरपे यांनी मुलांपेक्षा मुलीसुद्धा कुटुंबाला प्रकाशमान करू शकतात ही बाब सिद्ध केली आहे. त्यांनी बेटी बचाओ-बेटी पढाओ हा नारा प्रत्यक्षात उतरविला आहे.

**माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, बुलडाणा**

**स्वत: अनाथ असलेल्या गीता सावंत या तरुणीने आता अनाथ मुलामुलींना सांभाळण्याची जबाबदारी मोठ्या आनंदाने आणि अभिमानाने स्वीकारली आहे. या मुलांच्या पालनपोषणासाठी ती अहोरात्र कष्ट घेत आहे.**

# अनाथांची आक्का...

**सुषमा नेहरकर-शिंदे**

दीड वर्षांची असताना जन्मदात्या आईने रस्त्यावर सोडून दिले. रस्त्यावर पडलेल्या मुलीला लोणावळ्यातील अनाथ आश्रमात आश्रय मिळाला. अत्यंत हुशार व चलाख बुद्धिमत्तेमुळे थोड्याच दिवसात ती आश्रमातील सर्वांची लाडकी झाली. या संस्थेत कामाला येणाऱ्या निर्मला सावंत यांनी दिलेल्या प्रेमामुळे 'हीच आपली खरी आई', असे मुलीला वाटू लागले. निर्मला सावंत यांना देखील मूलबाळ नसल्याने या हुशार मुलीचा स्वीकार त्यांनी आपली मुलगी म्हणून केला. परंतु आजारपणामुळे निर्मला सावंत यांनी लोणावळ्यातील संस्था सोडली. निर्मला सावंत यांचा लळा लागलेल्या 'गीता' ला आईने संस्था सोडल्याने पुन्हा पोरके झाल्या सारखे वाटू लागले. परंतु मुलांवरचे प्रचंड प्रेम व जिव्हाळ्यामुळे निर्मलाताई लवकरच बऱ्या झाल्या. त्यानंतर



**गीता सावंत**

त्यांनी 'गीता' ला आपल्याबरोबर नेऊन तिच्यासह चाकण येथे राहायला सुरुवात केली. परंतु गीतासारख्या इतर अनाथ मुलांचे काय होणार? या विचारामुळे एका मैत्रिणीच्या मदतीने निर्मला सावंत यांनी चाकण येथील ठाकूर पिंपरी येथे तेथील सरपंच व काही दानशूर व्यक्तींच्या नावाने गायरान जागेत अनाथ मुलांसाठी आश्रम सुरू केला. इतर अनाथ मुलांबरोबरच गीतादेखील आईच्या लाडात वाढू लागली...

### कठीण परिस्थितीशी सामना

सध्या वाढलेली महागाई व धावपळीच्या जीवनात एका मुलाला वाढवणे, त्याचे

शिक्षण आणि आवश्यक सोयी-सुविधा पुरवताना पालकांची दमछाक होते. तिथे माझी आई निर्मला सावंत यांनी माझ्यासह २५ मुला-मुलींचे दायित्व स्वीकारले. चाकण येथील ठाकूर पिंपरी गावाच्या गायरान जागेत अनाथ मुलांसाठी छोटे आश्रम... छे... आश्रम नाही, आमचे घरंच होते ते! आईचे आजारपण सुरूच होते. पण आपल्यानंतर आपल्या लेकीचे.. या अनाथ मुलांचे कसे होणार म्हणून जिद्दीने ती लढत होती. समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीने रोजच्या अन्नासाठी, कपड्यांसाठी, शिक्षणासाठी तिला प्रचंड कसरत करावी लागायची. आईची ही कसरत, धावपळ पाहतच मी मोठी झाले. तिच्या पाठीच्या मणक्याचे दुखणे वाढतच गेले. दिवसेंदिवस हा त्रास तिला असह्य होऊ लागला. आश्रमाची जबाबदारी सक्षमपणे पार पाडत असताना माझ्या शिक्षणावर तिचे पूर्ण लक्ष होते. यामुळे बारावीनंतर मी ॲनिमेशनचा डिप्लोमा करून सरकारी नोकरी करू लागले. याच दरम्यान सन २०१२ मध्ये आईचे निधन झाले. यामुळे माझ्यासह आश्रमातील २५ मुले पुन्हा पोरकी झाली. यातून कुणीतरी पुढे येऊन या मुलांची जबाबदारी घेण्याची गरज होती. त्या दृष्टीने आश्रमाच्या काही हितचिंतकांनी प्रयत्न केले. परंतु या अनाथ २५ मुलांची जबाबदारी घेण्यासाठी कोणीही पुढे आले नाही.

### आश्रमाची जबाबदारी

आपली आई निर्मला सावंत यांनी या अनाथ मुलांना वाढवण्यासाठी केलेली धडपड , कष्ट मी पाहिले होते. त्यामुळे आश्रमाची अशी वाताहत पाहणे माझ्यासाठी कठीण होते. यामुळेच नोकरीत लागून जेमतेम एक वर्षच झाले असताना मी नोकरी सोडून आश्रमाची जबाबदारी घेण्याचा व आईचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. गेल्या सात-आठ वर्षांपासून ही जबाबदारी मी माझ्या खांद्यांवर घेतली आहे. सध्या संस्थेत २२ मुलं असून, दोन मुलं आता मोठी झाली आहेत. तर ५ते १६ वर्षांची अन्य मुले संस्थेत आहेत. आईने दिलेले प्रेम मी या मुलांना देण्याचा प्रयत्न करत आहे.

### अडचणींवर मात

गेल्या काही वर्षांत आश्रमाच्या नियमावलीत अनेक बदल झाले आहेत. त्यामुळे केवळ सेवा म्हणून मुलांच्या प्रेमापोटी संस्था चालवणाऱ्या आमच्या सारख्यांना अनेक अडचणी येत आहेत. शासनाची मदत मिळावी, ठाकूर पिंपरी येथील सध्या आश्रम चालू असलेली जागा संस्थेच्या नावावर करून या अनाथ मुलांना हक्काचे घर मिळून द्यावे म्हणून आई प्रयत्न करत होती. परंतु आईच्या प्रयत्नांना यश आले नाही. मीदेखील गेल्या तीन-चार वर्षांपासून शासनाच्या पातळीवर संस्थेला हक्काची जागा मिळावी, मुलांना थोडाफार शासकीय आधार मिळावा म्हणून प्रयत्न करत आहे. समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीमुळे सध्या २२ मुलांचे पालनपोषण करण्याचे काम मी करत आहे. परंतु अनेक वेळा खूप अचडणी येतात.

### अनाथ मुलांची आई

आईनंतर लहान वयातच मीदेखील या अनाथ मुलांची आई होण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु इतर मुलींप्रमाणे आपलेदेखील लग्न व्हावे, असे वाटत होते. पुण्यातील माहेर संस्थेच्या मदतीने खेड तालुक्यातील सचिन सातपुते यांच्यासोबत दीड महिन्यांपूर्वीच माझे लग्न झाले. सचिन व त्यांच्या कुटुंबातील सर्वांच्या पाठिंब्यामुळे मी लग्नानंतर देखील आपले अनाथाश्रमाचे काम सुरू ठेवले आहे. आता अनाथ मुलांना माझ्यासोबत माझ्या घरच्या लोकांचे प्रेम मिळेलच यात शंका नाही. आईचे समाजकार्याचे काम पुढे घेऊन जाण्याचा मी प्रयत्न करत आहे. आईचे स्वप्न पूर्ण करणे हे माझे सर्वांत मोठे स्वप्न असल्याचे गीता सांगते...

**बातमीदार/उपसंपादक, दै. लोकमत, पुणे.**

# कृष्णाईचे भारूड



कृष्णाई प्रभाकर उळेकर

**भारतीय संस्कृतीमध्ये लोककलेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या लोककला जोपासल्या जातात. पारंपरिक लोककला आणि संस्कृती यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यामुळे अनेक लोककला गेल्या काही वर्षांमध्ये माध्यमांच्या सहकार्यामुळे लोकप्रिय झाल्या आहेत. महाराष्ट्रातील 'भारुड' ही लोककला लोकप्रिय करण्यासाठी कृष्णाई उळेकर या तरुणीने स्वत:ला झोकून दिले आहे.**

उस्मानाबाद जिल्ह्यातल्या तुळजापूर तालुक्यातील आरळी बु. गावची भारूडकन्या कृष्णाई प्रभाकर उळेकर. वडील प्रगतशील शेतकरी. मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्था सांभाळत मुलांच्या आवडी जपण्यासाठी सर्वस्व पणाला लावत पूर्ण

वेळ त्यांच्या कला जोपासत पाठबळ देणारे आई वडील कृष्णाईला लाभले. लहान भाऊ आण्णासाहेब हादेखील हुशार. या सर्वांच्या पाठबळावर कृष्णाई संपूर्ण महाराष्ट्रात भारूड ही कला आपल्या पहाडी आवाजात सादर करीत सामाजिक विषयावर जनजागृती करीत आहे. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये कला शाखेच्या शिक्षणाबरोबरच ती भारूड कलाही तन्मयतेने जोपासत आहे.

समाजव्यवस्थेत घडणाऱ्या अघटित घटनांपासून शेतकरी, तरुण पिढी, मुलींच्या शिक्षणापर्यंत अशा सगळ्या विषयांवर कडक शब्दात आणि पहाडी आवाजात कृष्णाई भारुडातून प्रबोधन करते. पाचवीत असताना गावातील शाळेत कृष्णाई नृत्यात भाग घेऊन नृत्याविष्कार सादर करायची. त्या वेळी गावकऱ्यांनाही तिच्या कलेचे कौतुक वाटायचे. पुढे तिने भारूड सादरीकरणासाठी डोक्यावर कपड्यांचे गाठोडे, हातात काठी घेतली. गावागावातील हरिनाम सप्ताह प्रसंगी तसेच विशेष उपक्रमात सादरीकरण केले. एकापेक्षा एक सादरीकरण करत पाहता–पाहता तिने राज्यस्तरीय व्यासपीठावर आपले स्वतंत्र नाव तयार केले आहे अन् ती या कलेच्या माध्यमातून सबंध राज्याला परिचित झाली.

भारूड सादर करतेवेळी कृष्णाई अंगावर दंड घातलेली फाटकी साडी, डोक्यावर गठुडं, हातात काठी व त्याला सुया, पिना, फुगे, काळे मणी, कंगवे बांधून प्रेक्षकांमधून मंचावर प्रवेश करते, लोक अचंबित होतात, 'बयो, तुला बुरगुंडा होईल गं' या भारुडाच्या सादरीकरणाला तर राज्यभर प्रेक्षकांचा अफाट प्रतिसाद मिळतोय.

पारंपरिक भारूड आजच्या पिढीला रुचत नाहीत, त्यामुळे कृष्णाईने समाजातील ज्वलंत प्रश्नावर भारुडाच्या माध्यमातून समाजप्रबोधन सुरू केले. यामध्ये स्त्री भ्रूण हत्या, मुलगी वाचली पाहिजे, मुलगी शिकली पाहिजे, हुंडाबंदी यासह मराठवाड्यातील ज्वलंत प्रश्न असलेला दुष्काळ या विषयांवर ती प्रबोधन करीत आहे. कृष्णाईला या कलेबद्दल शासनाचा युवा पुरस्कारही मिळाला आहे. कृष्णाई उळेकर हिने आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत आपली ओळख बनवली आहे.

या कलेबद्दल बोलताना कृष्णाई म्हणते, इयत्ता दुसरीत असल्यापासून मला सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्यायला मिळाला. वेगवेगळ्या गाण्यावर नृत्य करीत होते. मला नृत्यामध्ये अनेक बक्षिसे मिळाली. वक्तृत्वस्पर्धेत, ३ हजार मीटर धावण्याच्या स्पर्धेतही तालुका, जिल्हा, विभागीय पातळीवर पहिला क्रमांक आला. एकदा वडिलांनी मला सहजपणे 'नाथांचं भारूड कर', असा सल्ला दिला. मग मी भारुडाची वेगवेगळी पुस्तके वाचायला सुरुवात केली. मला नाथांचं 'बुरगुंडा' हे भारूड आवडले. मी शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये ते सादर केले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. तेथेच माझ्या जीवनाला कलाटणी मिळाली. पुढे हेच भारूड घेऊन मी महाराष्ट्रभर फिरत आहे. त्याच भारुडाने प्रेक्षकांच्या मनावर गारूड केलंय.

मराठवाडा समन्वय समिती, पुणे यांचा मराठवाडा भूषण पुरस्कार, मराठवाडा जनविकास संघ, चिंचवड यांचा मराठवाडा भूषण पुरस्कार, पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातर्फे आविष्कार पुरस्कार आणि विविध संघटनांच्या वतीने पुरस्कार देऊन कृष्णाई उळेकर हिला सन्मानित करण्यात आले आहे.

**जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद**

**जन्मत: मतिमंदत्व (डाऊन सिंड्रोम) असलेल्या देवांशी जोशीला, वर्ष २०१६ मध्ये उत्कृष्ट कर्मचारी म्हणून, दिव्यांगजन या गटात राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डाऊन सिंड्रोम हा इतर अपंगत्वापेक्षा वेगळा आहे. हे अपंगत्व मेंदूशी निगडित असल्याने बहुआयामी असते. इतर अपंगत्वात एखादा अवयव जर १०० टक्के निकामी असला तरीही ज्ञानेंद्रिये व मेंदू कार्यक्षम असतो. मानसिक अपंगत्वात मात्र मेंदूच बाधित झालेला असल्यामुळे संपूर्ण प्रगती खुंटते. या सर्वांवर मात करीत समाजाच्या मुख्य प्रवाहात राहून काम करण्याचे आवाहन देवांशीने लीलया पेलले आहे.**

# तिची गोष्टच वेगळी...

**अंजु निमसरकर**

देवांशीला पाहिल्यावर अजिबात हे लक्षात येत नाही की ती मतिमंद आहे. अगदी तुमच्याआमच्यासारखी दिसायला बोलायला आहे ती. जन्मत: डाऊन सिंड्रोम असल्याचे कळल्यानंतर वडील अनिल आणि आई रश्मी यांनी डाऊन सिंड्रोम विषय असणारी जगभरातील माहितीचा शास्त्रीय / सखोल अभ्यास करून देवांशीला घडविण्याचा, संस्कारित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच ती समाजात इतरांचे प्रेरणास्थान ठरत आहे.

मुळची नागपूरची असलेल्या देवांशीचे पहिली ते



देवांशी जोशी हेलन केलर पुरस्कार स्वीकारताना.



'ग्राम भारत' या स्वदेशी विक्री वस्तूंच्या दुकानात काम करताना देवांशी.

आठवीपर्यंतचे शिक्षण धरमपेठ, येथील हिंदू ज्ञानपीठ या सामान्य मुलामुलींच्या शाळेत झाले. पुढे राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्थेतून तिने बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. सध्या देवांशी दिल्लीत वास्तव्यास आहे.

देवांशीला चार भाषा येतात. मराठी, हिंदी, इंग्रजी, भाषा अस्खलीत बोलता, लिहिता, वाचता येतात. गुजराती भाषाही समजते. देवांशीने संगणकाचे प्रशिक्षण घेतले आहे. यासोबतच तिने छायाचित्रकारितेचे, नृत्याचे, संगीत वादनाचे आणि योगाचेही छोटे-छोटे अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. तिला ट्रेकिंगची आवड आहे. सुट्टीच्या दिवशी आईला घरकामात मदत करते. स्वत:चे काम स्वत: आवर्जून करते. समाज माध्यमाचा वापर करते. वर्ष २०१३ पासून 'ग्राम भारत' या स्वदेशी विक्री वस्तूंच्या दुकानात ती काम करते आहे. इथे, तिला जवळपास ३०० वस्तूंचे कोड पाठ आहेत. वस्तूंना टॅगिंग करणे, कोडिंग करणे, खराब वस्तू बाजूला ठेवणे, ग्राहकांशी संवाद साधने, बिलिंग करणे अशी सर्व कामे ती उत्साहाने, आनंदाने करते. त्यामुळे येथे येणाऱ्या ग्राहकांची देवांशी लाडकी झाली आहे.

मतिमंदतेवर मात करीत कुटुंबातील सहकार्याने वेगवेगळ्या क्षेत्रात भरारी घेणाऱ्या भारतातील ३ व ऑस्ट्रेलियातील ३ मतिमंद कुटुंबावर 'रेझिंग द बार' हा लघुपट बनलेला आहे. यामध्ये देवांशीच्या कुटुंबाचा समावेश आहे. या लघुपटाला अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. देवांशीला हेलन केलर अवॉर्ड (२०१७), डाऊन सिंड्रोम फेडेरेशन चा बेस्ट सेल्फ ॲडव्होकेट तसेच दिल्ली राज्य बेस्ट एम्प्लॉयी (२०१८) असे इतर सन्मान प्राप्त झाले आहेत.

देवांशीचा हा प्रवास सोपा नाही. मात्र, आईवडिलांची सजग आणि वैज्ञानिक वृत्ती यामुळे तिचे जगणे सुकर होत आहे. देवांशी आणि तिचे कुटुंबीय थांबलेले नाही, तर देशभरातील मतिमंद मुलामुलींचा व त्यांच्या पालकांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे काम ते करीत आहेत. देवांशी स्वत: सार्वजनिक तसेच खासगी कार्यक्रमांमधून देशातील वेगवेगळ्या ठिकाणी जनजागृती करीत असते. आपल्या प्रवासात सहप्रवासी जोडण्याचे आणि त्यांच्या सोबत हा प्रवास करण्याचे तिने ठरवले आहे.

माहिती अधिकारी, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली

# किमयागार

**उस्मानाबाद जिल्ह्यातील हिंगळजवाडी या छोट्या गावातील कमलताई कुंभार यांनी स्वत:चा व्यवसाय सांभाळत आजवर सुमारे चार हजार महिलांना विविध व्यवसायात प्रशिक्षित करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवले आहे. शून्यातून शेती व त्यानंतर शेतीबरोबर जोडधंदा करत ही किमया त्यांनी केली आहे.**

**मनोज शिवाजी सानप**

हिंगळजवाडी उस्मानाबाद जिल्ह्यातील एक छोटंसं खेडेगाव. या गावातच कमलताई कुंभार यांची ओळख घोडे पाळणारी व लग्नकार्यात घोडे भाड्याने देणारी बाई अशी आहे. मात्र त्यांच्यात नवे काहीतरी करण्याची जबरदस्त इच्छाशक्ती होती. या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी इतरांसाठी प्रेरणादायी काम केले. महिलांमध्ये आत्मसन्मान जागवला.

एका लहान खेड्यातील या महिलेने स्वत:चा व्यवसाय सांभाळत आजवर सुमारे चार हजार महिलांना विविध व्यवसायात प्रशिक्षित करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवले आहे. शून्यातून शेती व त्यानंतर शेतीबरोबर जोडधंदा करण्याची प्रेरणा त्यांनी सोबतच्या महिलांना मिळवून दिली आहे.



कमल विष्णू कुंभार

## शेतीपूरक व्यवसाय

बांगडी व्यवसाय, शेळीपालन, कडकनाथ कोंबडी, हायड्रोफोनिक चारानिर्मित, अझोला उत्पादन अशा व्यवसायातून त्यांनी ही भरारी घेतली आहे. भाड्याने शेती घेऊन त्यांनी विविध उत्पादनांच्या व्यवसायाच्या माध्यमातून वेगळा ठसा उमटविला. त्यांच्याकडे अवघी दीड एकर कोरडवाहू शेती आहे. यातून घरप्रपंच भागविणेही शक्य नव्हते. सुरुवातीला त्यांनी बांगडयांचा व्यवसाय सुरू केला. त्यानंतर दोन घोडे घेऊन लग्नसोहळ्यासाठी ते भाड्याने देण्याचे काम सुरू केले. हे करत असताना शेळीपालनाला सुरुवात केली. शेळ्यांसाठी चाऱ्याचे उत्पादन सुरू केले. त्यासाठी एकरी दहा हजार रुपये वार्षिक दराने पाच एकर शेती भाड्याने घेतली. सध्या त्यांच्याकडे ५० पेक्षा अधिक शेळ्या आहेत. या व्यवसायात जवळपास दीड लाखांची उलाढाल होत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील अनेक गावातून, परजिल्ह्यातूनही कमलताईंकडील कडकनाथ कोंबड्यांना मोठी मागणी आहे. त्यांनी अनेक महिला बचतगटांना कडकनाथ कोंबड्यांचे वाटपही केले, त्याचबरोबर त्याचे प्रशिक्षणही दिले.

शासनाच्या जीवनोन्नती अभियानातल्या पशुसखीच्या माध्यमातून शेळ्या आणि कोंबड्यांच्या आरोग्यासाठी मार्गदर्शन केले जाते, याचा योग्य तो उपयोग कमल कुंभार यांनी करून घेतला.

त्या म्हणतात, 'प्रत्येक व्यवसायाला दुसऱ्या शाश्वत जोड व्यवसायाची जोड दिली. यामुळे या सर्वांतून नियमित उत्पन्नाचे स्रोत सुरू राहतात. या व्यवसायातून चांगले उत्पन्न मिळाल्यानंतर घराला आर्थिक स्थैर्यही मिळते.' कोणताही उद्योग सुरू करताना त्याची इत्थंभूत माहिती त्या करून घेतात. येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करतात. त्या समस्या लक्षात घेऊन संबंधित प्रशिक्षण घेतले तर कोणत्याही व्यवसायात यश हे मिळते, ही बाब त्यांनी स्वानुभवावरून सिद्ध केली आहे.



श्रीमती कुंभार यांच्या या आदर्श कामगिरीमुळे त्यांना २७ एप्रिल २०१७ रोजी तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते यशस्वी उद्योजिका म्हणून गौरवण्यात आले. देशातील ३५० महिलांमधून त्यांची निवड करण्यात आली. असा पुरस्कार मिळवणाऱ्या राज्यातील त्या एकमेव उद्योजिका आहेत.

## थक्क करणारा प्रवास

कमलताईंचा एकूणच उद्योजिका म्हणून प्रवास थक्क करणारा आहे. आईचा बांगड्या भरण्याचा छोटेखानी व्यवसाय, आईसोबत बांगड्या भरण्याची कला त्या शिकल्या. या व्यवसायातील बारकावे लक्षात घेऊन त्यांनी पुढे १०० महिलांना एकत्रित करून बांगड्यांच्या व्यवसायाला सुरुवात केली. या व्यवसायाबरोबरच साडी व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, जनरल स्टोअर, किराणा दुकान असे अनेक लघुउद्योगही उभारले, या सर्व उद्योगांमधून जवळपास चार हजार ग्रामीण महिलांना प्रेरित केले. आज त्या सर्व महिला ग्रामीण उद्योजक म्हणून आत्मनिर्भर बनल्या आहेत.

## पुरस्काराने सन्मानित

भारत सरकारच्या नीती आयोगाकडून २९ ऑगस्ट २०१७ रोजी वुमन ट्रान्सफॉर्मिंग इंडिया-२०१७ हा पुरस्कार दिल्ली येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. ५ एप्रिल २०१८ रोजी फिक्की चा पुरस्कार राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते कमलताईंना प्रदान करण्यात आला. तर ८ मार्च २०१८ रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या रोल मॉडेल या पुरस्काराने कमल कुंभार यांना सन्मानित करण्यात आले. कमल कुंभार यांची घोडदौड यावरच थांबली नाही तर त्यांना न्यूयॉर्क शहरातील एका विशेष कार्यक्रमात स्वयंशिक्षण प्रयोग या स्वयंसेवी अशासकीय संस्थेच्या प्रतिनिधी आणि सेंद्रिय शेती करणाऱ्या 'मंजिरी सखी' प्रोड्यूसर कंपनीच्या संचालिका म्हणून, जवळपास १८० देशातल्या महिलांशी हितगुज साधण्याची संधी त्यांना मिळाली.

## अथक परिश्रम

उस्मानाबादसारख्या जिल्ह्यातील एका छोट्याशा खेड्यातील सर्वसामान्य कुटुंबातील कमल विष्णू कुंभार यांचा हा सगळा प्रवास निश्चितच सुखकारक आणि सहजसोपा नव्हता. अनंत अडीअडचणी-समस्या आल्या परंतु सातत्याने काहीतरी नवीन करण्याची, शिकण्याची आवड आणि जिद्द, प्रामाणिक प्रयत्न, सहनशीलता, संयम, नम्रता, अपार कष्ट करण्याची मानसिक कणखरता, संकटांना हसतमुखाने सामोरे जाण्याची तयारी, नेतृत्व करण्याची क्षमता आणि मुखात साखर अशा गुणांच्या जोरावर कमलताईंनी आलेल्या अडचणींवर मात करत सर्व व्यवसाय यशस्वीपणे हाताळले. आजही हाताळत आहेत. एक यशस्वी उद्योजिका म्हणून त्यांचे नाव सबंध जिल्हाभर, राज्यभरच नव्हे तर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरही गाजले आहे.

**जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद**

विनोद देशमुख

# मार्शल धूनचा मराठी शंखनाद

स्वातंत्र्याच्या ७२ वर्षात यंदा प्रथमच गणराज्य दिनाच्या पथसंचलनात भारतीय लष्कराने स्वदेशी मार्शल ट्यून वाजविली ! हिंदी गीत, रागदारी संगीत आणि परंपरागत मिलिटरी बँड यांचे बेमालूम मिश्रण



स्वदेशी मार्शल धूनला दिल्लीत समारंभपूर्वक मान्यता प्रदान करताना लष्करप्रमुख

असलेल्या या पहिल्या अस्सल भारतीय मार्शल धुनचे बोल आहेत– देशको आँच ना आने दी... गीतकार– महार रेजिमेंटचे ब्रिगेडियर विवेक सोहेल आणि संगीतकार– नागपूरच्या संगीततज्ज्ञ डॉ. तनुजा नाफडे. ब्रिटिशांकडून घेतलेल्या इंग्लिश मार्शल धूनची परंपरा मोडीत काढणारा हा सुवर्णक्षण साजरा झाला, २६ जानेवारी २०१९ च्या सकाळी राजधानी दिल्लीच्या राजपथावर. तेथे प्रत्यक्ष उपस्थित हजारो आणि दूरदर्शनच्या पडद्यावर थेट प्रक्षेपण पाहत असलेले कोट्यवधी भारतीय या ऐतिहासिक परिवर्तनाचे साक्षीदार झाले.

### मान ताठ झाली

महाराष्ट्राची आणि मराठी माणसांची मान तर त्या दिवशी अभिमानाने आणखी ताठ झाली. कारण, ही स्वदेशी मार्शल धून देशाला देण्यात सर्वात मोठा वाटा मराठीजनांचाच आहे.

### बदलाचा प्रारंभ

२०१६ साली महार रेजिमेंटचा अमृत महोत्सव होता. त्यासाठी एखादे स्वदेशी लष्करगीत बसवून पाहावे, असे महार रेजिमेंटचे प्रमुख मेजर जनरल ओक यांना वाटले, हा या बदलाचा प्रारंभबिंदू. ब्रिगेडियर सोहेल यांनी हिंदी गीत लिहिण्याची जबाबदारी घेतली. त्याला आपल्या बँडकडून चाल लावण्याचे प्रयत्न ओकांनी केले. पण त्यांचे समाधान होईना. शेवटी हे काम त्यांनी परिचयाच्या डॉ. तनुजा नाफडे यांच्यावर सोपविले. त्यांनी आपला संपूर्ण सांगीतिक अनुभव पणास लावला आणि पावणेसहा मिनिटांचे हे गाणे तीन रागांच्या मिश्रणाने तयार केले. बिलासखानी तोडी, किरवानी आणि भैरवी या तीन रागांचे स्वर, सोबत पाश्चात्य सुरावटीचा बँड अशा मिश्रणातून बनलेल्या या गाण्याला शीर्षक देण्यात आले– शंखनाद! महार

**स्वातंत्र्याच्या ७२ वर्षात यंदा प्रथमच गणराज्य दिनाच्या पथसंचलनात भारतीय लष्कराने स्वदेशी मार्शल धून वाजवली. ही धून नागपूरच्या संगीततज्ज्ञ डॉ. तनुजा नाफडे यांनी तयार केली आहे. ब्रिटिशांकडून घेतलेल्या इंग्लिश मार्शल धूनची परंपरा मोडीत काढणारा हा सुवर्णक्षण २६ जानेवारी २०१९ च्या सकाळी राजधानी दिल्लीच्या राजपथावर साजरा झाला.**

रेजिमेंटच्या अमृत महोत्सवात ६ नोव्हेंबर २०१६ रोजी हे गीत पहिल्यांदा वाजले आणि स्वदेशी मार्शल धूनचा शंखनाद झाला !

हे गीत मार्शल धूनमध्ये रूपांतरित होऊ शकते, असा विश्वास उच्च लष्करी अधिकारी व्यक्त करू लागले. त्या दृष्टीने लष्करी बँडला प्रशिक्षण देणे गरजेचे होते. कारण, त्यांची वाद्ये आणि वाजवण्याची पद्धत बहुतांश पाश्चात्य. त्यावर भारतीय राग वाजविणे सोपे नव्हते. त्यासाठी सुमारे दोन वर्षे सराव करावा लागला. तेव्हा कुठे पहिली भारतीय मार्शल धून तयार झाली! लष्कराच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर कसून चाचण्या झाल्यानंतर, ७ ऑक्टोबर २०१८ रोजी ही धून दिल्लीत अधिकृतपणे सादर करण्यात आली, तेव्हा अनेक उच्च लष्करी अधिकारी, मार्शल धूनच्या स्वदेशीकरणाच्या या प्रयोगावर खूश झाले. त्या सर्वांनी यावर एकमताने पसंतीची मोहोर उमटविली. त्याच वेळी ठरले की, येत्या गणराज्य दिनी ही पहिली स्वदेशी मार्शल धून भारतीय लष्करात दाखल केली जाईल. त्या दृष्टीने ही धून मुंबईत रेकॉर्ड करून सर्व रेजिमेंट्सना पाठवण्यात आली. त्या आधारे सराव करून ४–५ रेजिमेंट्सच्या बॅण्ड पथकांनी ही मार्शल धून पथसंचलनात वाजवली.

### मोलाचे योगदान

यासाठी मोलाचे योगदान देऊन आगळावेगळा विक्रम नोंदवताना डॉ. तनुजा नाफडे यांनी खूप मेहनत घेतली. पण त्यांनी मेहनताना मात्र घेतला नाही. 'मी हे काम देशासाठी केले. त्याचे मोल नाहीच. लष्कराने माझी धून स्वीकारली, यातच मी भरून पावले,' अशी भावना त्या व्यक्त करतात. स्वत: उत्तम गायिका असलेल्या डॉ. तनुजा नाफडे यांनी संगीत विषयात पीएच.डी. मिळवली आहे. त्या नागपूर येथील धरमपेठ महाविद्यालयाच्या संगीत विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. शास्त्रीय संगीतावर आधारित असलेली ही पहिलीच मार्शल धून आहे. शिवाय, एखाद्या महिला संगीतकाराने आणि लष्कराबाहेरील व्यक्तीने बनविलेली जगातील पहिली मार्शल धून आहे. हे दोन विश्वविक्रम आता त्यांच्या नावावर आहेत. पर्यायाने हे विक्रम महाराष्ट्राच्या आणि मराठीजनांच्या नावावर जमा झाले आहेत.

ज्येष्ठ पत्रकार, नागपूर




मेजर मीनल शिंदे-चव्हाण

# रणरागिणी

**डॉक्टर, इंजिनिअर तसेच प्रशासकीय अधिकारी होण्याऐवजी सैन्य दलात सेवा करण्याची जिद्द जोपासून मीनल शिंदे यांनी सैन्य दलातील भरतीसाठी असलेल्या परीक्षेची जय्यत तयारी केली. त्यासाठी प्रचंड परिश्रम घेतले. या परिश्रमाचे फलित म्हणून २००७ मध्ये मीनल शिंदे यांची आर्मीमध्ये मेजर या पदावर निवड झाली.**

**एस.आर. माने**

सैन्य दलात काम करून देशसेवा करण्याच्या प्रबळ ईच्छाशक्तीच्या जोरावर भारतीय सैन्य दलात मेजर पदापर्यंत पोहोचण्याचा बहुमान कोल्हापूरच्या रणरागिणी मीनल शिंदे-चव्हाण यांनी मिळवला आहे. अथक परिश्रमाद्वारे खडतर सेवा करून सैन्य दलात वेगळा ठसा उमटविणाऱ्या मेजर मीनल शिंदे यांना सैन्य दलातील सर्वोत्कृष्ट सेवेबद्दल मिळालेला आर्मी कमेंडेशन मेडल, हा देशपातळीवरचा मानाचा किताब प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार त्यांच्या सेवेतील कर्तृत्वाची उंची वाढवणारा आहे. आपल्या कार्यकौशल्याने मेजर मीनल शिंदे यांना सैन्य दलाच्या दक्षिण-पश्चिम कमांडमधील भारतीय सेनेच्या सर्व विभाग तसेच बटालियन्संमधून सर्वोत्कृष्ट सेवेबद्दल आर्मी कमेंडेशन मेडल जाहीर झाले. हे मेडल माहेर,सासरसह सर्व देशवासीयांना समर्पित करत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

### आर्मी कमेंडेशन मेडल

सैन्य दलातील सेवेबद्दल दिला जाणारा आर्मी कमेंडेशन मेडल हा बहुमान मिळवणाऱ्या कोल्हापर जिल्ह्यातील त्या एकमेव महिला अधिकारी आहेत. सैन्य दलातील जवळपास ८-९ वर्षांच्या खडतर सेवेनंतर त्यांना कोल्हापुरात ५ एनसीसी बटालियन येथे प्रतिनियुक्तीवर काम करण्याची संधी मिळाली. येथे त्यांनी एनसीसी कमांडरची धुरा यशस्वीपणे सांभाळली. सैन्य दलात आव्हानाबरोबर देशसेवेची संधीही प्राप्त होत असल्याने तरूणांनी सैन्य दलासारख्या क्षेत्राची निवड करावी, असे त्यांचे सांगणे आहे.

### सैन्यात जाण्याचा संकल्प

सातारा जिल्ह्यातील हनुमानवाडी या छोट्याशा गावात शेतकरी कुटुंबात १८ जुलै १९८६ रोजी जन्मलेल्या मीनल शिंदे-चव्हाण यांनी लहानपणी आर्मीमध्ये सेवा करण्याचे पाहिलेले स्वप्न सत्यात उतरवले. माध्यमिक तसेच महाविद्यालयीन शिक्षण रोज साडेतीन किलोमीटर अंतर पायी चालत पार करून पूर्ण केले. बी.ए. (इंग्रजी साहित्य) यात पदवी मिळवली. 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' या उक्तीप्रमाणे त्यांच्याबाबतीतही घडले. महाविद्यालयीन शिक्षण सुरू असतानाच त्यांनी सैन्य दलात सेवा करण्याचा संकल्प करून त्यासाठी आवश्यक अशा स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. २००७ मध्ये त्यांची आर्मीमध्ये निवड झाली व त्यांच्या कार्यकर्तृत्वाला

निश्चित दिशा मिळाली.

### घरच्यांचे पाठबळ

मीनल शिंदे याचे बालपण हनुमानवाडीसारख्या छोट्याशा गावात गेले. प्राथमिक शिक्षणही त्यांनी गावातच पूर्ण केले. आपल्या लेकीने शिकावे. मोठे व्हावे, ही वडील अरुण शिंदे आणि आई सौ. शकुंतला शिंदे यांची प्रबळ इच्छा आणि धडपड होती ! पण गावात माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय नव्हती. आईवडिलांची इच्छा पूर्ण करण्यासाठी मीनल शिंदे यांनी अपार कष्ट घेतले. त्यांचा विवाह १२ नोव्हेंबर २०१२ रोजी सहायक पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांच्याशी झाला. लग्नानंतरही सैन्य दलात सेवा करण्यासाठी त्यांना सासू-सासरे आणि पती यांचे पाठबळ लाभले.

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आणि शेती हा एकमेव व्यवसाय असलेल्या अरुण शिंदे यांचे शिक्षण केवळ ८ वी पर्यंत आहे. पण त्यांच्या विचाराची उंची मात्र मोठी आहे. अल्पशिक्षित असणाऱ्या वडिलांचा मुलीने उच्च शिक्षण घ्यावे हा दृष्टिकोन अन्य पालकांना प्रेरणादायी आणि प्रोत्साहन देणारा आहे. मुलीने सैन्य दलात काम करून देशसेवा करावी असं स्वप्न उराशी बाळगणाऱ्या शकुंतला शिंदे या मीनल शिंदे यांच्या आई आहेत. साधी रहाणी, उच्च विचारसरणी जोपासणाऱ्या शकुंतला शिंदे यांनी मुलीच्या शिक्षणाच्या निर्णयामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

आईवडिलांच्या पाठबळामुळे आणि जिद्दीमुळे उंब्रजच्या महात्मा गांधी महाविद्यालयात ११ वीला प्रवेश घेतला. त्यामुळे शिक्षणाला गती मिळाली. उंब्रजच्या महिला महाविद्यालयातूनच पदवी घेतली. महाविद्यालयीन शिक्षणामध्येच त्यांना देशसेवेसाठीचे धडे मिळाले.

### यश मिळाले

डॉक्टर, इंजिनिअर तसेच प्रशासकीय अधिकारी होण्याऐवजी सैन्यदलात सेवा करण्याची जिद्द जोपासून कॉलेजच्या दुसऱ्या वर्षापासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. रात्रंदिवस अभ्यास करून या परीक्षांमध्ये यश संपादन करण्याचा निर्धार केला. २००७ मध्ये मीनल शिंदे यांची आर्मीमध्ये निवड झाली. २००७ ते मार्च २००८ या कालावधीत ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकेडमी (ओटीए) चेन्नईमध्ये प्रशिक्षण पूर्ण केले. २२ मार्च २००८ रोजी त्या मेजरपदी रुजू झाल्या. तो क्षण आई-वडिलांच्या स्वप्नपूर्तीचा क्षण ठरला. जम्मू-काश्मीर, पंजाब, हिमाचल, लेह-लडाख येथे त्यांनी सेवा बजावली. मेजर मीनल शिंदे सध्या झारखंड येथे सेवा बजावत आहेत.

**जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर**

# नवा तारा, नवा जोश

नाट्य, साहित्य पंढरीचा वारसा असणारी सांगलीची क्रीडा परंपराही मोठ्या दिमाखाने मिरवत आहे. पुरुषांसह अनेक महिला क्रीडापटू आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत. यात अग्रक्रमाने नाव घेतलं जातं ते भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मानधनाचं. मारवाडी समाजाच्या पारंपरिक मानसिकतेला छेद देत मुलीला तिच्या आवडीच्या क्षेत्रात करिअरला वाव देण्याची सकारात्मकता मानधना कुटुंबीयाने दाखवली. या आधुनिक विचार, प्रयत्न आणि प्रेरणेला स्मृतीने तळपत्या बॅटमधून खणखणीत पोचपावती दिली आहे. स्मृतीसारखी मुलगी असल्याचा सार्थ अभिमान आज मानधना कुटुंबीयांना आहे.

मूळचे सांगलीचे असणाऱ्या श्रीनिवास मानधना यांनी कामानिमित्त मुंबई गाठली होती. परिस्थितीनुरूप २००० साली त्यांची पावले पुन्हा सांगलीकडे वळली. ते जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धांमध्ये भाग घ्यायचे. दोन अपत्यांपैकी किमान एकाला तरी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू घडवायचे

**महिलांच्या क्रिकेटमध्ये अल्पावधीत आपल्या गुणवत्ता आणि दर्जामुळे स्मृती मानधना हिने महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाची ती प्रमुख आधारस्तंभ ठरली आहे.**




स्मृती मानधना

स्वप्न वडिलांनी पाहिले होते. त्यामुळे तिचा भाऊ श्रवणमध्ये वडिलांचे हे क्रिकेटवेड रक्तातूनच आले. त्याच्यासोबत सरावाला जाताना, त्याच्याकडूनच प्रेरणा घेत स्मृतीने वयाच्या चौथ्या वर्षी पहिल्यांदा बॅट हाती घेतली. त्या दोघांना मैदानावर घेऊन जाणाऱ्या श्रीनिवास मानधना यांनी स्मृतीचे क्रिकेटचे वेड वेळीच ओळखले आणि तिला उत्तेजन दिले. तिची ही आवड पूर्ण करण्यासाठी कुटुंबीय तिच्या मागे खंबीरपणे उभे राहिले.



स्मृती मानधना जोरदार फटका लगावताना.

## स्वप्नपूर्ती

दुर्दैवाने एका अपघाताने श्रवणचे क्रिकेटपटू होण्याचे स्वप्न हिरावून घेतले. त्यानंतर आपले स्वप्न स्मृतीच्या डोळ्यात वडील आणि भावाने पाहिले. पडद्यामागून गरजेनुरूप फ्रेंड, फिलॉसॉफर, गाईड बनत कुटुंबीयांनी त्या स्वप्नाला पैलू पाडले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटची ओळख व्हावी, यासाठी स्मृती ९ वर्षांची असताना श्रीनिवास मानधना स्मृतीला प्रवरानगर (जि. अहमदनगर) येथे घेऊन गेले. तिथे तिची १५ वर्षांखालील गटात निवड झाली. २०१३ साली तिची भारतीय संघात पहिल्यांदा निवड झाली. त्यानंतर तिने कधीच मागे वळून पाहिले नाही. डावखऱ्या स्मृतीने भारताकडून आतापर्यंत २ कसोटीमध्ये ८१ धावा, ४७ एकदिवसीय सामन्यांमध्ये १७९८ धावा आणि ५२ ट्वेन्टी ट्वेन्टी सामने खेळत १२०० धावांची बरसात करत खणखणीत कामगिरी केली आहे.

## कामगिरीत सातत्य

क्रिकेटचे वेड जपताना तिने शैक्षणिक कामगिरीतही सातत्य राखले. दहावीत ८५ टक्के आणि बारावीत ७५ टक्के गुण घेतले. विज्ञान शाखा की क्रिकेट यामध्ये निवड करताना तिने क्रिकेटला प्राधान्य दिले. तिच्या हा अंतर्मनाचा निर्णय योग्य ठरला. हे तिची कामगिरी दाखवून देते. मोठ्या शहरात क्रीडापटूंना मिळणाऱ्या उत्तमातील उत्तम सोयीसुविधांची अपेक्षा न करता सांगलीतच तिच्यातील क्रिकेटपटूची जडणघडण झाली. ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू हेडन, श्रीलंकेचा कुमार संगकारा हे तिचे क्रिकेटमधील आदर्श आहेत. तर तंत्रशुद्ध फलंदाज राहुल द्रविड यांनी स्वाक्षरी केलेली बॅट तिच्या जीवनातील एक अमीट स्मृती बनली आहे.

## फिटनेसला महत्त्व

स्मृतीसाठी फिटनेस सर्वात महत्त्वाचा आहे. दिवसातील जवळपास १० तास ती व्यायाम आणि फिटनेससाठी देते. व्यावसायिक गरज असल्याने डायटवर ती कटाक्षाने भर देते. त्यासह तिचा कौटुंबिक पाया भक्कम आहे. या दोन्हींच्या बळावरच आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळताना येणाऱ्या मानसिक आणि शारीरिक मर्यादांवर तिने यशस्वीपणे मात केली आहे. सातत्यपूर्ण कामगिरीसाठी या बाबी तिच्यासाठी महत्त्वाच्या ठरल्या आहेत. तिच्यातील सकारात्मक ऊर्जा तिचा प्लस पॉईंट ठरतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकल्यानंतरही तिने साधेपणा जपला आहे.

## विविध पुरस्कार

आंतरराष्ट्रीय क्रिकेट जगतातील भरारीसह स्मृती आज क्रीडा जगतातील मानाचा अर्जुन पुरस्कार, सर्वोत्तम क्रिकेटपटू आणि एकदिवसीय सामन्यातील सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू असे आयसीसीचे मानाचे पुरस्कार, आयसीसी एकदिवसीय मानांकनात अव्वल स्थान, फोर्ब्सच्या ३० अंडर ३० च्या यादीत समावेश अशा किताबांची मानकरी झाली आहे. आपल्यासारखेच ग्रामीण भागातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू घडावेत, यासाठी तिने सांगलीत स्मृती मानधना क्रिकेट ॲकेडमी सुरू केली आहे. एकेकाळी शेफ बनण्याचे स्वप्नही तिने कॅफे सुरू करून पूर्ण केले आहे.

## नवा विचार रुजला...

समस्त मारवाडी समाजाला विचार बदल करायला भाग पाडणारी स्मृतीची वाटचाल आहे. सर्व सांगलीकरांना तिचा अभिमान वाटत आहे. स्मृती मानधनाचं वय अवघं २२ वर्षं आणि काही महिने. तिला अजून खूप मोठी झेप घ्यायची आहे.

**पुरुषांचाच खेळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुस्ती या खेळात आता मुलीसुद्धा आपली कर्तबगारी सिद्ध करून दाखवू लागल्या आहेत. वाशिमपासून ४० किलोमीटर अंतरावरील आडवळणावर असलेल्या जयपूर गावातील कल्याणी गादेकर या १६ वर्षाच्या युवतीने पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या 'खेलो इंडिया' या राष्ट्रीय क्रीडा महोत्सवात १७ वर्षाखालील वयोगटातील कुस्ती स्पर्धेत रजतपदक पटकावले.**

# लय भारी

**विवेक खडसे**

पुरुषांचा खेळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुस्ती या खेळात वाशिमपासून ४० किलोमीटर अंतरावरील आडवळणावर असलेल्या जयपूर गावातील कल्याणी गादेकर या १६ वर्षाच्या युवतीने पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या 'खेलो इंडिया' या राष्ट्रीय क्रीडा महोत्सवात १७ वर्षाखालील वयोगटात रजतपदक पटकावून वाशिम जिल्ह्याचा सन्मान वाढविला आहे.

## घराण्याची परंपरा

वडील पांडुरंग गादेकर यांना बालवयापासूनच कुस्ती खेळण्याची आवड. पांडुरंग यांचे वडील आणि आजोबादेखील कुस्तीचे चांगले खेळाडू होते. जिल्ह्यात व जिल्ह्याच्या बाहेर कुठेही कुस्त्यांची आम दंगल असली की त्यांचा सहभाग हमखास असायचा. रक्तातच कुस्ती हा खेळ असल्याने पांडुरंगसुद्धा कुस्ती स्पर्धेत भाग घ्यायचा. पांडुरंग १० वी नापास असल्यामुळे आपल्याला भविष्यात कुठे नोकरी लागणार नाही, हे लक्षात आल्याने त्याने घरी असलेल्या थोड्याफार शेतीत काबाडकष्ट करण्याचा निर्णय घेतला. लग्नानंतर त्याला कल्याणी, आयुष्या आणि मुलगा अर्जुन ही तीन अपत्ये झाली. पत्नी कांचनसुद्धा चांगली कबड्डी व धावपटू आहे. त्यामुळे मुलांना आई-वडिलांकडूनच खेळाला प्रोत्साहन मिळाले. घरची परिस्थिती जेमतेम असल्यामुळे या खेळात नाव कमवू शकलो नाही, पण तिन्ही मुलांना या खेळात तरबेज करण्याचा चंग त्यांनी बांधला. वयाच्या ८ व्या वर्षापासून कल्याणी ही कुस्ती खेळण्याचा सराव करीत आहे. ती तिसऱ्या वर्गात असताना गावात भरलेल्या आमदंगलीमध्ये तिने सहभाग नोंदवला. या स्पर्धेत तिने प्रतिस्पर्धी मुलाला चीत करून १५०० रुपयांचे रोख बक्षीस जिंकले. तेव्हापासून कल्याणीचा कुस्ती खेळण्याचा उत्साह दांडगा झाला. हिंगोली, पुसद, अकोला, जालना, अहमदपूर, पुणे येथे आयोजित आम दंगलीमध्ये सुद्धा कल्याणीने यश संपादन केले.



## सरावावर भर

कल्याणी ही सर्वात मोठी असल्यामुळे तिला चांगली कुस्तीपटू बनवण्यासाठी आवश्यक आहार नियमित पांडुरंग गादेकर देऊ लागले. पहाटे पाच वाजल्यापासून तिचा धावणे, कुस्तीचा सराव पांडुरंग घेऊ लागले. आपल्या दोन मुली आणि मुलाने कुस्तीत चांगले नाव कमावले पाहिजे, हे स्वप्न पांडुरंग बघत आहेत. तिन्ही मुलांच्या आहारावर महिन्याकाठी जवळपास ४० हजार रुपये खर्च त्यांना येत आहे. पण मुलांना कुस्तीपटू म्हणून घडवताना त्यांच्या आहारात कुठलीही कमतरता राहू नये, त्यासाठी पांडुरंग यांनी घरचा ट्रॅक्टर आणि थोडीफार शेती विकली.



**कल्याणी गादेकर**

गावातील ओंकारेश्वर विद्यालयात इयत्ता १० वीत शिक्षण घेणारी कल्याणी खेळासोबतच शिक्षणाकडेसुद्धा लक्ष देत आहे. जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर भरणाऱ्या आमदंगलीमध्ये सहभागी होऊन ती यश संपादन करीत आहे. २०१७ मध्ये विदर्भ कुस्तीगीर संघाने देवळी (जि. वर्धा) येथे आयोजित कुस्ती स्पर्धेत मुलींच्या ४१ किलो वजनगटात सुवर्णपदक व तीन हजार रुपये रोख, दिल्लीत जानेवारी २०१८ मध्ये झालेल्या १४ वर्षांखालील शालेय राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक, जून २०१८ मध्ये उत्तर प्रदेशातील मेरठ येथे फेडरेशन ऑफ इंडियातर्फे आयोजित १५ वर्षांखालील कुस्तीच्या मॅट स्पर्धेत कांस्यपदक, हरयाणातील सोनिपथ येथे शालेय राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत १७ वर्षांखालील वयोगटात कांस्यपदक, १९ व २० जानेवारी २०१९ रोजी बालेवाडी पुणे येथे आयोजित 'खेलो इंडिया' युथ गेममध्ये १७ वर्षांखालील वयोगटात रजतपदक आणि २८ व ३० जानेवारी २०१९ रोजी तिसऱ्या सबज्युनिअर राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत देवळी येथील ४६ किलो वजनगटात कल्याणीने सुवर्णपदक प्राप्त केले.

**जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम.**

**पुण्यातील वेदांगी कुलकर्णी हिने २९ हजार किलोमीटर्सचे अंतर केवळ १५९ दिवसात पार केले. त्यामुळे सर्वात कमी वेळेत एवढे अंतर पार करणारी जगातील सर्वात तरुण व जगतातील चौथी महिला म्हणून तिची गिनीज बूक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे. आशिया खंडातील पहिली महिला सायकलपटू होण्याचा मान तिने मिळवला आहे.**

# झिप..झॅप..झूम...

**वृषाली मिलिंद पाटील**

पुण्याची जागतिक सायकलपटू वेदांगी कुलकर्णी हिने सायकलिंगच्या क्षेत्रात स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. विवेक कुलकर्णी यांची एकुलती एक मुलगी असणाऱ्या २० वर्षांच्या वेदांगीनं तब्बल २९ हजार किलोमीटरचं अंतर केवळ १५९ दिवसांत पार केले. सर्वात कमी वेळेत एवढं अंतर पार करणारी जगातील सर्वात तरुण व जगतातील चौथी महिला म्हणून तिची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली आहे. आशिया खंडातील पहिली महिला सायकलपटू होण्याचा मान मिळवून आई–वडिलांबरोबरच राज्याचे आणि देशाचे नाव तिनं जगभरात उंचावले आहे.

वेदांगीचे वडील केमिकल इंजिनियर तर आई शिक्षिका.. सध्या दोघांनीही सेवानिवृत्ती घेतली असून वेदांगीच्या सायकल सफरीचं व्यवस्थापन ते करत आहेत. वेदांगीचे शिक्षण पनवेल, आकुर्डी (पुणे) येथे झाले. सध्या ती इंग्लंडमधील बोर्नमथ विद्यापीठात बी.एस.सी. इन स्पोर्टस् मॅनेजमेंटचे शिक्षण घेत आहे.

## मोहिमेची सुरुवात

वेदांगीला सुरुवातीपासूनच सायकलिंगची आवड होती.. एकदा हिमालयामध्ये सायकलिंग करण्याची इच्छा तिने वडिलांजवळ व्यक्त केली, त्यांनीही तिला होकार दर्शवत प्रवासाची तयारी सुरू केली. 'बियासर–कुलू' या मार्गावरील सायकलिंग मोहिमेची सुरुवात झाली. सध्याचे मार्गदर्शक सुमित पाटील यांनी वेदांगीचे इतक्या कमी वयातील सायकलिंगमधील कौशल्य पाहून तिला लेह–लडाखला पाठविण्याचा सल्ला दिला. परंतु यूथ हॉस्टेलच्या सर्व जागा भरल्या होत्या. आपले ध्येय पूर्ण करण्याची जिद्द अंगी असणाऱ्या वेदांगीने मनाली– लेह हे अंतर एकटीने सायकलिंग करून पूर्ण करण्याचे ठरवले. प्रशिक्षक सुमित पाटील यांच्या मार्गदर्शनाने सफरीचा मार्ग निश्चित झाला. या मोहिमेकरिता नव्या सायकलीची खरेदी झाली. जगातील सर्वात खडतर समजल्या जाणाऱ्या मनाली–लेह–खारदुंग ला–द्रास असा साधारण ९०० किलोमीटरचा प्रवास तिने वयाच्या १८ व्या वर्षी म्हणजे १२ ते २६ जुलै २०१६ मध्ये पूर्ण केला. लांब पल्ल्याचा हा तिचा पहिलाच सायकल प्रवास होता.

## परदेशातील यश

यानंतर शिक्षणासाठी ब्रिटनमधील बोर्नमथ विद्यापीठात शिक्षण घेतानादेखील सायकलिंगची आवड तिला स्वस्थ बसू देत नव्हती. ईस्टरच्या सुट्टीमध्ये सायकलिंग करत बोर्नमथ ते जॉन ओ ग्रोटस् हे १८०० किलोमीटरचे अंतर तिने केवळ १७ दिवसांत पूर्ण केले. यामुळे तिचा आत्मविश्वास वाढला.


वेदांगी कुलकर्णी

सुरुवातीला वैद्यकीय तपासण्या झाल्या व सायकलिंगचा सराव सुरू झाला. सहा–सात महिने आठवड्याच्या सुट्टीमध्ये २०० ते ३०० किलोमीटर अंतराचा सराव ती दिवसा व रात्रीही करू लागली. डोंगरातील घाट रस्त्यांचा सराव होण्यासाठी भारतात लेह– लडाख याभागात तसेच सह्याद्री पर्वत भागात सायकलिंग केले. ब्रिटनमध्येही स्कॉटलंड मधील डोंगराळ रस्त्यांवर तसेच बोर्नमथ विद्यापीठातील स्टॅटिक बाईकवर भरपूर सराव केला. वेदांगीच्या या सरावादरम्यान विद्यापीठातील प्राध्यापक, डॉक्टर, मानसोपचार तज्ज्ञ, न्युट्रिशनिस्ट, स्ट्रेंन्थ ॲण्ड कंडिशनिंग अशा आवश्यक व्यक्तींची टीम तिला मार्गदर्शन करावयास

होती. तिने ब्रिटनमध्ये विविध ठिकाणांना सायकलिंगने भेटी दिल्या. लंडन– एडिनबरो– लंडन असा १ हजार ४४० किलोमीटरचा प्रवास तिने जुलै २०१७ मध्ये पूर्ण केला. या स्पर्धेदरम्यान ७५० किमी सायकलिंग झाल्यावर गुडघा दुखावल्यामुळे ती स्पर्धेतून बाद झाली. परंतु तब्येत ठीक झाल्यानंतर वेदांगीने हा प्रवास कोणाच्याही मदतीशिवाय ८४ तासात पूर्ण केला. बोर्नमथ ते ब्रेकॉन – बिकॉन नॅशनल पार्क तसेच स्नोडोनिया नॅशनल पार्क परिसर हा ६०५ किलोमीटरचा प्रवास तिने ४० तासात पूर्ण केला. विद्यापीठ परिसरात ३०० ते ६०० किलोमीटर सायकलिंगचा सराव सहा सात महिने सुरू होता. लेह लडाख या अतिउंच परिसरातही तिने सराव केला.

### विश्वपरिक्रमा

विश्वपरिक्रमेसाठी वेदांगीची तयारी जोमाने झाली. १७ जुलै २०१८ ला विश्वपरिक्रमेची सुरुवात झाली. पहिल्या टप्प्यात ऑस्ट्रेलियामधील पर्थ ते ब्रिस्बेन, न्युझीलंडमधील वेलिंग्टन ते ऑकलंड, दुसऱ्या टप्प्यात कॅनडामधील व्हँकुव्हर ते हॅलीफॅक्स, तिसऱ्या टप्प्यात युरोप खंडातील आइसलंड–पोर्तुगाल–स्पेन, फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी, डेन्मार्क,स्वीडन, फिनलंड, रशिया असा प्रवास झाला. चौथ्या टप्प्यात भारतातील अहमदाबाद ते कोलकता असा १४ देशांचा एकूण २९ हजार किलोमीटरचा प्रवास वेदांगीने १५९ दिवसांत २४ डिसेंबर २०१८ ला पूर्ण केला.

या सफरीदरम्यान स्लिपिंग बॅग सोबत असल्यामुळे गॅस स्टेशनवर ती केवळ दोन ते तीन तासच झोप घेत असे. दात घासणे अथवा फ्रेश होण्यासाठी देखील गॅस स्टेशनवरच थांबत असे. फिल्मिंग टीम सोबत असल्यावर मात्र एखाद्या हॉटेलमध्ये मुक्काम असायचा. या वेळी पहाटे चार वाजता प्रवास सुरू व्हायचा. साधारण चार तासांनी थोडा वेळ थांबून नाश्ता अथवा जेवण होत असे. पाण्याचा साठा सोबतच असायचा.

### विविध पुरस्कार

सायकलिंगशिवाय वेदांगीला फुटबॉलचादेखील छंद आहे. पीडीएफए लिग २०१५ मध्ये तिने 'बेस्ट गोल किपर' हा किताब जिंकला होता. ग्रासरुट ट्रेनिंग सर्टिफिकेट, फिफा गोल किपर कोचिंग सर्टिफिकेट, कोचिंग लायसन्सही मिळवले आहे.

वेदांगी बोर्नमथ स्टुडंट ॲम्बेसिडर असून ती स्टुडंड रिप्रेझेंटेटिव्ह, पार्ट टाईम एज्युकेशन ऑफिसरही आहे. आऊटस्टँडिंग कॉन्ट्रिब्युशनसाठी तिला या विद्यापीठाकडून पुरस्कार मिळाला आहे. वेदांगीला लिखाणाचीदेखील आवड असून तिने प्रख्यात मासिकासाठी ॲडव्हेंचर ॲण्ड आऊटडोअर्स याविषयी लेख लिहिले आहेत. विश्वपरिक्रमेच्या अनुभवावर पुस्तक लिहिण्याची व माहितीपट तयार करण्याची तिची इच्छा असून, हे कामदेखील ती निश्चितच वर्षभरात पूर्ण करेल. बोर्नमथ विद्यापीठाच्या सायकलिंग क्लबची ती अध्यक्ष असून सलग २४ तास सायकलिंग करण्याचा उपक्रमही तिने नुकताच पूर्ण केला आहे.

**सहायक संचालक(माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, पुणे**

---

# गल्लीतील अनोखी शाळा

**मजुरांच्या मुलांसाठी गल्लीत शाळा चालवणाऱ्या कविता शिंदे यांनी या मुलांच्या आयुष्याला नवी दिशा दिली आहे.**

मुंबईतल्या मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या आणि सध्या दिल्लीत स्थायिक झालेल्या कविता नारायणन–शिंदे यांना समाजिक कार्याची आवड असल्यामुळे त्यांनी 'गली–पाठशाला' नावाची एक गैरशासकीय संस्था काढली. सध्या त्यांच्या संस्थेचे कार्यालय मंदिरातच आहे. या संस्थेंतर्गत त्या केर–कचरा उचलणारे, बांधकाम क्षेत्रात मजूर म्हणून काम करणाऱ्यांच्या मुलामुलींना, तसेच घरकाम करणाऱ्या मुलींना–महिलांना शिकवितात. त्यांच्या प्राथमिक गरजाही निःशुल्क पूर्ण करतात. या कार्यासाठी त्यांना देणगीही मिळते. अभ्यासामध्ये मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांना विनाशुल्क शिकवणी देऊन त्यांना शाळेत प्रवेश मिळावा यासाठी त्या धडपडतात. सध्या त्यांच्या संस्थेत १४० मुलं–मुली आहेत. या मुला–मुलींवर चांगले संस्कार व्हावे, यासाठी त्या सदैव प्रयत्नशील असतात. होळी, नाताळ, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिनाचे कार्यक्रम त्या घेतात. भविष्यात या मुलामुलींना आयुष्यातील कोणत्याही परिस्थितीशी लढता यावे, यासाठी त्या दिल्लीतील विविध शासकीय विभागाला भेटी देऊन तेथील कामकाजाचा परिचय करून देतात. सध्याच्या वातावरणात मंनोरजंनाच्या माध्यमातून बरेच सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न करतात. त्या मुलांना देशभक्तीपर सिनेमे दाखविणे, विविध संग्राहलयांना भेटी देण्याचेही कार्यक्रम आयोजित करतात. Gali Pathshala Kavita Narayanan या नावाने त्यांचे फेसबुक पेज असून त्यात केलेल्या कामांची माहिती त्या अद्ययावत करीत असतात.



कविता नारायणन–शिंदे

**माहिती अधिकारी, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली**

**गिर्यारोहणाच्या क्षेत्रात एव्हरेस्ट शिखऱ सर करणे हा अंतिम मानबिंदू समजला जातो. या अतिशय कठीण शिखराला सर करण्याची उत्तुंग कामगिरी मनीषा वाघमारे यांनी केली आहे.**

# एव्हरेस्ट माझा सोबती...

**वंदना आर. थोरात**

सर्व निसर्गप्रेमी व्यक्तींना आपल्या दिमाखदार शुभ्रधवल अस्तित्वाने आकर्षित करणारा हिमालय. गिर्यारोहणाच्या क्षेत्रात एव्हरेस्ट शिखऱ सर करणे हा अंतिम मानबिंदू, त्या ठिकाणी पोहोचण्याचा क्षण हा अदभूत, रोमांचक आणि जगणं सार्थ करण्याची अनुभूती देणारा असतो, अशा आपल्या भावना व्यक्त केल्या त्या नुकत्याच एव्हरेस्ट शिखऱ सर केलेल्या मनीषा वाघमारे यांनी.

हा प्रवास मनीषा वाघमारे यांनी २१ मे २०१८ रोजी २७ तासांमध्ये पूर्ण केला. हे २७ तास नैसर्गिक आव्हानांना आपल्या शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक क्षमतांच्या साथीने खंबीरपणे सामोरे जाण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला भाग पाडणारे असतात. जन्म-मृत्यूच्या हेलकाव्यांना शब्दशः प्रत्यक्ष अनुभवत असतानाही प्रचंड जिद्दीने, हिमतीने एव्हरेस्ट शिखरावर जाऊन सहीसलामत खाली येण्याचे ध्येय आपल्याला प्रचंड वेगाने बदलत जाणाऱ्या निसर्गाच्या सान्निध्यात यशस्वी करायचे असते. या प्रवासात दोनच गोष्टी महत्त्वाच्या आहेत एक तुमचा दुर्दम्य निर्धार आणि त्याला तेवढीच भक्कम अनुभवी साथ देणारे शेर्पा..



एव्हरेस्ट शिखर सर करणाऱ्या मनीषा वाघमारे

## अनपेक्षित वळण

साहसी क्रीडा प्रकारांकडे अपघातानेच वळलेल्या मनीषा वाघमारे या मुळात व्हॉलीबॉल खेळाडू असून शालेय जीवनापासूनच त्यांना खेळामध्ये विशेष आवड आणि प्रावीण्य होते. बारावीमध्ये असताना अचानक उद्‌भवलेल्या अपेंडिक्सच्या आजारामुळे त्यांना डॉक्टरांनी यापुढे व्हॉलीबॉल, लॉगजम्प यासारखे शारीरिक श्रमाचे खेळ शक्यतो खेळू नये असा सल्ला दिला. त्या वेळी आपल्याला मुळात खेळामध्येच करिअर करण्याची इच्छा असल्याने दुसरा पर्याय काय असू शकतो या दृष्टीने विचार केल्यावर साहसी क्रीडा प्रकारात गिर्यारोहण ही गोष्ट आव्हानात्मक आणि आवडणारी होती. त्यामुळे मग या क्षेत्रात रीतसर प्रशिक्षण घेऊन पुढे जाण्याचा निर्णय घेतल्याचे मनीषा यांनी सांगितले. शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमात पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर मनीषा यांनी या विषयात नेट परीक्षा उत्तीर्ण केली. २०१२ पासून त्या इथल्या महिला महाविद्यालयात क्रीडा विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

## रीतसर प्रशिक्षण

एव्हरेस्टवर जाण्याची महत्त्वाकांक्षा मूर्त रूपात येण्यासाठी मनाली येथे रीतसर प्रशिक्षण घेऊन त्यांनी चढाईची तयारी केली. त्यानंतर स्थानिक मार्गदर्शकांच्या सोबतीने औरंगाबादमधील डोंगराची चढाई करायला सुरुवात केली. २०१७ मध्ये पहिल्यांदा एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी काठमांडू येथे प्रयाण केले. पहिल्या प्रयत्नात प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर मनीषा यांनी हिलरी स्टेप इथपर्यंत यशस्वीरीत्या मजल मारली. हिलरी स्टेप हे एव्हरेस्ट शिखराकडे नेणारे सगळ्यात शेवटचे महत्त्वाचे स्थान आहे, त्या ठिकाणाहून पुढे शिखर काही अंतरावर असते पण निसर्गाची साथ या प्रवासात सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आहे,ती केव्हा तुम्हाला हुलकावणी देईल हे सांगणे कठीण असते. त्या वर्षी नेमकं निसर्गाने शिखराच्या इतक्या जवळ जाऊनही खराब हवामानामुळे मनीषा यांना पुढील चढाई करण्यासाठी पाहिजे ती साथ न दिल्याने खडतर अशा वीस तासांच्या चढाईनंतर त्यांना माघारी फिरावे लागले. पण पुन्हा पुढच्या वर्षी शिखऱ सर करायचेच, हा निर्धार अधिक पक्का करूनच मनीषा वाघमारेंनी केलेला प्रवास, या वर्षी २१ मे २०१८ रोजी खऱा ठऱला.

ज्या क्षणाची त्या आतुरतेने काही वर्षांपासून वाट पाहात होत्या, ज्या अद्‌भुत रोमांचक क्षणाचा प्रत्यक्ष थरारक अनुभव घेण्यासाठी त्यांनी दोन वर्षे सातत्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली होती तो क्षण त्यांनी या वर्षी अनुभवला.

## प्रत्यक्ष चढाई

एव्हरेस्ट शिखराच्या प्रत्यक्षातील चढाई मोहिमेसाठी ६५ दिवसांचा कालावधी लागतो. त्यामध्ये त्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी किमान ४० दिवस लागतात. त्यात बेस कॅम्पच्या आसपासची शिखरे पादाक्रांत करावयाची असतात. अशा १४ शिखऱांवर मनीषा यांनी पूर्वतयारीचा भाग

म्हणून चढाई केली. कालापत्थर, माऊंट लोबोवर, माऊंट पुमोरी या शिखरावर चढाई केलेल्या मनीषा यांनी सांगितले, 'माऊंट पुमोरीवर केलेली चढाई माझ्या कायम लक्षात राहील, कारण ही माझी पहिलीच एकटीने केलेली चढाई होती. त्यासाठी रात्री बारा ते दुसऱ्या दिवशीच्या रात्रीच्या आठ वाजेपर्यंत मी चढाई केली. हा अनुभव खूप रोमांचक होता.'

चढाईच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून कॅम्प एक वरून कॅम्प दोनकडे जात असताना त्या खोल दरीत पडल्या होत्या. हा थरारक अनुभव सांगताना मनीषा म्हणाल्या की, 'खुंबू ग्लेशियरचे वातावरण सतत बदलत असते. त्यामुळे तेथील रुट देखील वारंवार बदलत जातात. त्यामुळे या सततच्या बदलत्या रुटवरून पुढे चढाई करणे हे जास्त आव्हानात्मक असते. या ठिकाणी सराव करताना कॅम्प एकवरून कॅम्प दोनकडे जाताना मी खोल दरीत पडले. खाली पाहिल्यावर त्या ठिकाणी काही गिर्यारोहकांचे मृत शरीर पडलेले होते. माझ्या सुदैवाने मी लॅडरला सेफ्टी बेल्ट अडकवलेला असल्याने मी खोल दरीतही लटकलेल्या अवस्थेत खाली डोके वर पाय अशा स्थितीत होते. त्यामुळे मला लगेच उलटी झाली. त्या स्थितीतही मी शिट्टी वाजवून शेर्पाला बोलावण्याचा प्रयत्न केला. शेर्पा तत्काळ माझ्या मदतीस धावून आला. शेर्पाने तत्परतेने २० मिनिटे प्रयत्न केल्यानंतर मला बाहेर काढण्यात त्याला यश आले. हा अनुभव खरोखर जिवाची बाजी लावणारा होता.'

## कठीण आणि कठोर

एव्हरेस्ट शिखरावर चढाई सुरू केल्यानंतर या ठिकाणी कॅम्प दोनपर्यंतच जेवण मिळते. तसेच कॅम्प दोननंतर ऑक्सिजन (प्राणवायू) सिलेंडरचा वापर करणे अनिवार्य ठरते. कॅम्प तीन ते कॅम्प चार हा जवळपास १३ तासांचा प्रवास आहे. यात कॅम्प फोर म्हणजेच डेथ झोन आहे. मनीषा यांनी सांगितले की, 'या ठिकाणी पोहोचताच सात आठ गिर्यारोहकांचे मृतदेह पाहण्यात आले. डेथ झोनमध्ये सर्व गिर्यारोहकांना १२ तास काढावेच लागतात. मनीषा या ठिकाणी थांबलेल्या असताना हिमवर्षाव खूप मोठ्या प्रमाणावर होत होता. त्या परिस्थितीतही मनीषा यांनी चढाई प्रवासातील बाल्कनी या टप्प्यावर प्रवेश केला. या ठिकाणी एकाच वेळी चार पाच गिर्यारोहक थांबू



मनीषा वाघमारे

शकतात. तसेच याच ठिकाणी आपल्याकडील ऑक्सिजन सिलेंडर बदलता येतात.' मनीषा म्हणाल्या की, 'शेर्पाकडे तीन तर माझ्या खांद्यावर दोन सिलेंडर होते. हिलरी स्टेपकडे जाताना जी शिखऱाकडे नेणारी जवळची स्टेप आहे, त्या ठिकाणी मनीषा यांच्या मागच्या वर्षीच्या आठवणी ताज्या झाल्या कारण मागच्या वर्षी त्यांना याच ठिकाणाहून खऱाब हवामानामुळे परत यावे लागले होते.'

## थरारक अनुभव

या वर्षी आपल्या चढाईच्या रोमांचक टप्प्याच्या चढाईचा थरारक अनुभव सांगताना मनीषा म्हणाल्या, 'या वेळेस मला याच ठिकाणी अडचणीला सामोरे जावे लागले. माझ्या सिलेंडरचे रेग्युलेटर खराब झाले पण ते बदलून घेणे शक्य नव्हते त्यामुळे शेर्पाच्या सिलेंडरमधील प्राणवायू शेअर करत माझी चढाई चालूच ठेवली.



शेवटी तो स्वप्नपूर्तीचा क्षण आला. मी एव्हरेस्ट शिखरावर पाऊल ठेवले. शब्दांच्या पलिकडे आतपर्यंत सुखावणारा तो क्षण खरोखर अविस्मरणीय होता. आपल्या सगळ्या कष्टांना जगणं, सार्थ करणारा होता. पण हा आनंद मी फार वेळ घेऊ शकत नव्हते, कारण ऑक्सिजन सिलेंडर शेअरिंगमुळे माझ्याकडे फार कमी वेळ होता. दहा मिनिटे एव्हरेस्टवर थांबून माझा परतीचा प्रवास सुरु झाला. मात्र, एव्हरेस्टच्या चढाईपेक्षा जास्त खडतर ठरतो तो परतीचा प्रवास; कारण या वेळी शारीरिक श्रमामुळे प्रचंड प्रमाणात आलेल्या थकव्यासोबत तुम्हाला निसर्गाच्या बदलत्या प्रचंड शक्तिशाली रूपाला, गुरुत्वाकर्षणाला यशस्वीरीत्या सामोरे जात तोल जाऊ न देता अत्यंत संयमाने, साहसाने, शहाणपणाने पायथ्याशी यायचे आव्हान पेलून दाखवायचे असते. ते तुम्ही यशस्वीरीत्या पेलून दाखवले तर खऱ्या अर्थाने एव्हरेस्ट शिखरावर जाऊन परत आल्याचा आनंद काय असतो ते अनुभवता येते.

या सगळ्या प्रवासात महत्त्वाची असते त्या शेर्पाची साथ. देवदूतांसारखे शेर्पा तुमच्या स्वप्नाला सत्यात उतरवण्यासाठी तुमच्यासोबत तुमच्यापेक्षा जास्त काळजीने, खबरदारीने चढाई करत असतात, त्यामुळेच आपली महत्त्वाकांक्षा कोणताही गिर्यारोहक पूर्ण करू शकतो, अशा शब्दात मनीषा वाघमारे यांनी आपल्या शेर्पाबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली.

**माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद**

**हलाखीच्या परिस्थितीचा बाऊ न करता आपल्या तिन्ही मुलींना महाराष्ट्र पोलीस दलात पाठवून वाशिमच्या नारायण वाघमारे यांनी इतरांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.**



नारायण वाघमारे त्यांच्या पत्नी दुर्गा वाघमारे आणि पोलीस दलात निवड झालेल्या त्यांच्या भाग्यश्री, प्रिया आणि श्रद्धा या तीन मुली.

# आम्ही तिघी 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय'

**तानाजी घोलप**

वाशिम जिल्ह्यातील तऱ्हाळा येथील नारायण प्रल्हाद वाघमारे हे अल्पभूधारक शेतकरी. चार एकर शेतीवर चौघा भावांचे संसार अवलंबून. शेतीतून मिळणारे उत्पन्न कमी. त्यामुळे शेतमजुरी, विहीर खोदण्यासह इतर कामांवर मजुरी करून नारायण यांनी संसाराचा गाडा हाकला. नारायण यांना प्रिया, भाग्यश्री आणि श्रद्धा या तीन मुली. मुलगी हे परक्याचे धन, अशी समजूत अजूनही सुशिक्षित म्हणवल्या जाणाऱ्या समाजातही बाळगली जाते. मात्र गरीब शेतकरी कुटुंबातील नारायण आणि त्यांची पत्नी दुर्गा यांनी आपल्याला मुलगा नसल्याची खंत बाळगली नाही. स्वतः १९८२ चे मॅट्रिक पास असलेल्या नारायणरावांनी कुटुंबांची परिस्थिती हलाखीची असूनही मुलींना चांगले शिक्षण देऊन त्यांना स्वतः च्या पायावर उभे करण्याचा निश्चय केला. आर्थिक परिस्थिती बिकट असतानाही त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी मोलमजुरी आणि शेतीतून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नातून, पोटाला चिमटा घेऊन पै-पै जमवत मुलींचे शिक्षण केले.

### शिक्षणात अव्वल

नारायण यांच्या तऱ्हाळा गावात १० वी पर्यंतची शिक्षणाची सोय आहे. तिन्ही मुलींनी याच ठिकाणी दहावीचे शिक्षण घेतले. वडिलांची आर्थिक परिस्थिती नसतानाही आपल्या शिक्षणसाठी ते घेत

असलेल्या कष्टांची जाणीव तिघींनाही होती. त्यामुळे तिन्ही बहिणी शिक्षणात अव्वल होत्या. तिघीही १० वी मध्ये आपापल्या बॅचमध्ये विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या.

प्रिया ही तीन बहिणीत थोरली. दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणाची सोय शेलूबाजार गावात. पण तिच्या पुढील शिक्षणासाठी घरातून विरोध होऊ लागला. दहावी झाली आता मुलीच्या लग्नाचं बघा, असा सल्ला अनेकांनी द्यायला सुरुवात केली. पण परिस्थितीमुळे आपलं शिक्षण पूर्ण करता आले नसले, तरी आपल्या मुलींना चांगले शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याचा ठाम निश्चय केलेल्या नारायण यांनी प्रियाला पुढील शिक्षणासाठी शेलूबाजारला पाठविण्याचा निर्णय घेतला. शेलूबाजार येथून प्रियाने वाणिज्य शाखेतून अकरावी आणि बारावीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर पदवीच्या शिक्षणासाठी मंगरूळपीर या तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालयात प्रवेश घेतला.

## प्रयत्नांना यश

बँकिंग अथवा अकाऊंटिंगमध्ये करिअर करायचं स्वप्न उराशी बाळगून तिचा अभ्यास सुरू होता. मात्र कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव असल्याने पदवीच्या प्रथम वर्षात असतानाच तिने पोलीस भरतीमध्ये नशीब आजमावून पाहण्याचे ठरवले. त्याकरिता मंगरूळपीर येथे आत्मभान ॲकॅडमीमध्ये प्रवेश घेतला. पुन्हा कुटुंबातून आणि नातेवाईकांमधून विरोध सुरू झाला. आपल्या कुटुंबातील अथवा नातेवाईकांमधील एकाही मुलीने आजपर्यंत पोलीस दलात नोकरी केलेली नाही, पोलिसाची नोकरी फक्त मुलांनी करायची असते, मुलींनी पोलिसाची नोकरी करायला नको, असाच सर्वांचा सूर होता. नारायण यांचीही त्यामुळे द्विधा मन:स्थिती झाली. पण प्रियाने आपला निर्णय ठामपणे वडिलांना सांगितला, तिच्या निर्णयाला नारायण यांनी सर्वांचा विरोध झुगारून पाठिंबा दिला. प्रियाने मन लावून पोलीस भरतीची पूर्वतयारी केली. पहिल्याच प्रयत्नात २०१३ मध्ये ती वाशिम पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून भरती झाली.

## परिस्थिती बदलली

प्रिया पोलीस दलात दाखल झाल्यानंतर नारायण वाघमारे यांच्या कुटुंबाची परिस्थिती बदलण्यास सुरुवात झाली. तिच्या नोकरीमुळे दोन्ही लहान बहिणींच्या शिक्षणाला मदत झाली. भाग्यश्री हिने दहावीनंतर कृषी पदविका पूर्ण केली तर श्रद्धाने वाणिज्य शाखेतून १२ वी पूर्ण करून पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतला. या दोघींनीही नंतर मोठ्या बहिणीच्या, प्रियाच्या पावलावर पाऊल टाकत पोलीस दलात भरती होण्याचा निर्णय घेतला. त्यादृष्टिने तयारी सुरू केली. २०१८ मध्ये झालेल्या पोलीस भरतीमध्ये पहिल्याच प्रयत्नात दोघींची एकाच वेळी अकोला पोलीस दलात कॉन्स्टेबल म्हणून निवड झाली. सध्या त्या दोघीही पोलीस प्रशिक्षण घेत आहेत. एकाच कुटुंबातील तिघी बहिणी पोलीस दलात भरती होण्याची ही वाशिम जिल्ह्यातील पहिलीच घटना आहे.

## दृष्टिकोन बदलला

तिन्ही बहिणी पोलीस दलात भरती झाल्यानंतर आता समाजाचा नारायण यांच्या कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. त्यांना आता समाजात मान–सन्मान मिळू लागला आहे. मुलींना स्वावलंबी बनवायचे असेल तर त्यांना चांगले शिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सक्षम बनविले पाहिजे, हे आता नारायण यांच्या नातेवाइकांनाही पटले आहे. त्यामुळे नारायण यांच्या तिन्ही मुलींचा आदर्श घेऊन आता समाजातील व नातेवाइकांच्या इतर मुलीही शासकीय नोकरी, पोलीस भरतीसाठी तयारी करू लागल्या आहेत.

## कष्टाचे चीज

तिन्ही मुली स्वतःच्या पायावर उभा राहिल्याने वडील नारायण यांना कष्टाचे चीज झाल्याचे समाधान लाभले आहे. आपल्या मुलींविषयी बोलताना त्यांचा ऊर अभिमानाने भरून येतो. ते म्हणतात, ‘मुलींवर माझा विश्वास होता, त्यांना शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी पाठविले. त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले. त्या तिघींनी कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव ठेवून शिक्षण आणि नोकरीसाठी प्रामाणिक कष्ट घेतले. माझा विश्वास सार्थ ठरविला. मुलगा नसल्याची खंत आम्हाला कधीच नव्हती आणि आजही नाही. मुलीलाही मुलांच्या बरोबरीने शिक्षणाची संधी दिली तर त्यासुद्धा आपल्या आईवडिलांची मान समाजात उंचावू शकतात, हे माझ्या मुलींनी समाजाला दाखवून दिले आहे.’

**माहिती साहाय्यक,**
**जिल्हा माहिती कार्यालय, वाशिम.**

**लोकराज्य या प्रकाशनाची मालकी व अन्य माहिती, यासाठी द्यावे लागणारे निवेदन तक्ता – ४ नियम ८ वा**

| | |
|---|---|
| १) प्रकाशन ठिकाण | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई–३२ |
| २) प्रकाशन काल | : मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | : मीनल जोगळेकर |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| ४) प्रकाशकाचे नाव | : मीनल जोगळेकर |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |
| ५) संपादकाचे नाव | : ब्रिजेश सिंह |
| भारताचे नागरिक आहेत का? | : होय |
| पत्ता | : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ३२ |

मी मीनल जोगळेकर असे जाहीर करते की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील पूर्णपणे खरा आहे.

**मीनल जोगळेकर**
**मुद्रक व प्रकाशक**

# बियाणांच्या 'बँकर'

**सह्याद्री पर्वतरांगेच्या कुशीतील कोंभाळणे (ता. अकोले, जि. अहमदनगर) या दुर्गम गावातील राहीबाई पोपेरे या देशी बियाणे संवर्धनाचे आगळेवेगळे काम करीत आहेत. पारंपरिक, दुर्मीळ, कसदार गावरान बियाण्यांची निर्मिती त्यांनी केली आहे. 'सीड क्वीन' (बियाण्याची राणी), 'बीजमाता' अशा अनेक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या राहीबाई पोपेरे यांची कीर्ती महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून सातासमुद्रापारही पोहोचली आहे.**

**गणेश फुंदे**

राहीबाईंना लहानपणापासूनच बियाणे गोळा करण्याचा छंद आहे. पारंपरिक पद्धतीने त्या बियाणे गोळा करायच्या. त्यांचा विवाह त्यांच्याच कोंभाळणे गावातील शेतकरी सोमा पोपेरे यांच्याशी झाला. वडिलांकडून आलेले शेतीचे ज्ञान त्यांनी लग्नानंतर सासरच्या शेतीत जोपासले. गोळा केलेल्या उत्तममोत्तम बियाण्याचा प्रयोग त्या स्वतःच्या शेतात करायच्या. याच छंदातून आज राहीबाईंच्या बियाणे बँकेत ५३ पिकांचे ११४ वाण संकलित आहेत.

घेवडा, वाल, उडीद, वाटाणा, तूर, हरभरा, हुलगा आदी १० कडधान्य पिकांचे ३५ वाण. भात, गहू, नागली आदी सहा तृणधान्य पिकांचे ३४ वाण, तीळ, भुईमूग, सूर्यफूल, जवस, खुरासणी या तेलबिया पिकांचे ११ वाण. विविध प्रकारच्या २६ पालेभाज्यांचे ३२ वाण त्यांच्याकडे आहेत. यासोबतच ६ प्रकारचे कंद, रानभाज्यांचे १२ वाण त्यांनी जतन केले आहेत. या प्रत्येक वाणाची वैशिष्ट्ये, त्यांची उत्पादनपद्धती, उपयोग या सर्वांची बारीकसारीक माहिती त्यांना आहे. वाणाचा उगम, उपयोगीता व संवर्धनाची माहिती त्या ओघवत्या शैलीत सहज सांगतात. घराच्या परिसरातही त्यांनी विविध फळझाडे, भाज्या, वेल याची जोपासना केली आहे. राहीबाईंची शेतजमीन हलक्या प्रतीची असूनही परंपरेने आलेल्या गोष्टी जतन करत त्या ही सर्व शेती सेंद्रिय पद्धतीने करत आहेत.



राहीबाई पोपेरे

### गाडग्या मडक्यातील सोनं

जुनं ते सोनं... हे राहीबाईंच्या कामाचे तत्त्व आहे. त्यानुसार त्यांनी पारंपरिक पद्धतीचे गाडगे, मडके, प्लास्टिकचे टोप, बाटल्या अशी उपलब्ध होतील ती साधने वापरून पारंपरिक पद्धतीने बियाणे जतन केले आहे. या बियाणे बँकेत एकाच पिकाच्या अनेक जातींचा समावेश आहे. काळ्या शिरेचा घेवडा, हिरवा लांब घेवडा, हिरवा आखूड घेवडा, आदी. गावठी भाताच्या १६ जाती, वालाच्या २८ जाती, व अनेक गावरान वाणांचे त्यांनी संवर्धन केले आहे. जुन्याचं मोल सोन्यासारखं आहे. त्यामुळे ते जपायला पाहिजे असे त्या आवर्जून सांगतात. आपले आरोग्य निरोगी



राहीबाईंच्या बियाणे बँकेतील विविध बी-बियाणांचे प्रकार

राखण्यासाठी योग्य व पौष्टिक अन्नाचा आहारात समावेश केला पाहिजे, असे राहीबाईंना वाटते.

## राज्यभरात प्रचार-प्रसार

वेगवेगळ्या पिकांसंदर्भात, बियाण्यासंदर्भात वडिलांकडून मिळालेले व त्यानंतर स्वानुभवातून उमगलेले ज्ञान राहीबाईंनी जपले व जोपासले असून आता त्याच्या प्रसारासाठी त्या झटत आहेत. आरोग्यदायी जीवनासाठी पारंपरिक वाणांचा वापर केला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांच्या बियाणे बँकेतील बियाणे राज्याच्या विविध भागांत पोहोचले आहे. गावरान बियाण्यांचे राहीबाईंनी संवर्धन केले आहे. गावासोबतच राज्यभरात त्यांचा गावरान बियाणे प्रचार प्रसार जोरात सुरू आहे. चंद्रपुरात पहिले भाषण केल्यानंतर राहीबाईंना मिळालेल्या प्रतिसादामुळे त्यांना राज्यात अनेक ठिकाणी मार्गदर्शनासाठी बोलावले जाते.

## हळदी कुंकवाला बियाणे वाण

राहीबाईंनी काही वर्षांपूर्वी हळदीकुंकवाला वाण म्हणून झाडांची रोपे द्यायला सुरुवात केली. आपल्या रोपवाटिकेत तयार केलेली पाचशे ते सहाशे रोपे त्या दरवर्षी हळदीकुंकवाचं लेणं म्हणून वाटत असतात. अकोले तालुक्याचा हा आदिवासी भाग हा पूर्वापार देशी वाणांचे आगर होता. मात्र गेल्या काही दशकांत संकरित बियाणांच्या आक्रमणापुढे हे देशी वाण नामशेष होण्याच्या मार्गावर होते. राहीबाई व त्यांच्या बचतगटाच्या प्रयत्नांमुळे आता या देशी बियाण्याच्या संवर्धनाचे कार्य जोमाने सुरू आहे.

## कळसूबाई परिसर बियाणे संवर्धन

दुर्मीळ किंवा लुप्त होत चाललेल्या पीकवाणांच्या व्यापक पातळीवरील जतन व संवर्धनासाठी अकोले तालुक्यात कळसुबाई परिसर स्थानिक बियाणे संवर्धन समितीची स्थापना करण्यात आली आहे. बायफ या स्वयंसेवी संस्थेच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक बीजसंवर्धक शेतकरी या समितीचा कार्यभार चालवतात. यात महिलांचा सहभाग व योगदान सर्वाधिक आहे. आदिवासी महिला बचतगटाच्या माध्यमातून एकत्र येत सेंद्रिय शेती व देशी बियाणे संवर्धनाची चळवळ त्यांनी सुरू केली आहे. १० गावातील शेतकरी या समितीच्या माध्यमातून काम करतात. वाणांचे स्थानिक नाव, जमीन प्रकार, उपयोग, नावामागचे स्थानिक ज्ञान ही सारी माहिती त्या सांगतात. त्यांनी विविध पिकांच्या अनेक जाती जतन केल्या आहेत. त्याचबरोबर स्थानिक बियाणे साठवणूक पद्धती, स्थानिक बियाणे प्रक्रिया पद्धती, स्थानिक वनस्पतींचा वापर करून, पिकावरील रोग व कीड नियंत्रण अशा पद्धतींचा वापर करून, लोकांना त्याबाबतचे प्रशिक्षण देतात. अशाप्रकारे कळसूबाई शिखराच्या परिसरातील जैवविविधता जतन व संवर्धित केली जात आहे.



## कुटुंबाला आर्थिक हातभार

कौलारू घरात राहून बियाणे बँक सुरू करून राहीबाई कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी सात्त्विक धान्य पुरविण्याचे काम करतात. त्यांच्याकडे शेतमाल वा बियाणे खरेदी करण्यासाठी सातत्याने लोकांचा ओघ सुरू असतो. भीमथडी किंवा अन्य प्रदर्शनातही त्या सहभागी होतात. त्यांनी काळभाताचेही मोठ्या प्रमाणावर बीजोत्पादन केले आहे. त्यातून त्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आहेत. अकोले तालुक्यातील दहा गावांमध्ये महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प सुरू आहे. 'सीड क्वीन' (बियाण्याची राणी), बीजमाता अशा अनेक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या राहीबाई पोपेरे यांची कीर्ती महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून सातासमुद्रापारही पोचली आहे.

**माहिती सहायक, उप माहिती कार्यालय, शिर्डी, जि. अहमदनगर**



अपर्णा देशमुख

**स्वतःची अडचण बाजूला ठेऊन जीवन जगण्याचा एकाकी संघर्ष सुरू असताना संगमनेर तालुक्यातील अर्पणा देशमुख यांनी इतर महिलांना दिलासा देण्याचे काम केले आहे. यामुळे अनेक महिला स्वबळावर उभ्या राहिल्या आहेत.**

# स्वबळाच्या दिशेने...

संगमनेर तालुक्यातील अपर्णा देशमुख यांनी दुर्गम भागातील शेकडो आदिवासी, विधवा, निराधार व प्रगतीच्या वाटेवर चालू पाहणाऱ्या महिलांच्या आयुष्यात प्रगतीचा उषःकाल घडवला आहे. त्यांचा प्रवास राज्यभरातील महिलांना प्रेरणादायी असा आहे.

२००१ ते २०१८ या प्रवासात प्रामुख्याने शाळाबाह्य विद्यार्थी, विडी कामगारांच्या मुली, आदिवासी महिला, विधवा, शालेय मुली यांना विविध विभागाच्या महिलांसाठीच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात आणि त्यातून महिलांना स्वावलंबी, सक्षम व यशस्वी व्यवसायिक बनवण्यात अपर्णाताई यशस्वी झाल्या आहेत.

## घरातून प्रेरणा

अपर्णा देशमुख यांचे आजोबा स्व. के. बी. दादा देशमुख यांचा स्वातंत्र्योत्तर काळात संगमनेर-अकोले तालुक्यात सामाजिक कार्यात मोठा सहभाग होता. वडील वायुसेनेत (एअर फोर्स) होते. सामाजिक विकासाच्या याच चळवळीत अपर्णाताई लहानाच्या मोठ्या झाल्या. वयाच्या १८ व्या वर्षीच त्यांचा विवाह झाला. शिक्षण फक्त १२ वी होते. विवाहानंतर ब्युटीपार्लरचा कोर्स करून १९९२ मध्ये त्यांनी स्वतःचे ब्युटीपार्लर सुरू केले. मात्र १९९६ मध्ये कौटुंबिक कारणामुळे त्या आपल्या दोन लहान मुलांसह आईवडिलांकडे राहायला आल्या.

मुलांचे भविष्य घडवण्याची जबाबदारी व काही कर्जाचा बोजा यामुळे त्यांना स्वतः च्या पायावर ठामपणे उभे राहत काहीतरी मोठे केल्याशिवाय गत्यंतर नाही, ही जाणीव झाली. अपूर्ण असलेले शिक्षण पूर्ण करून पात्रता वाढवणे हे पहिले आव्हान होते. त्यानुसार त्यांनी बी.ए. पदवी पूर्ण करत कॉम्प्युटर कोर्स केला. त्या एक लहान नोकरी मिळवली. मात्र नोकरीतील अल्प उत्पन्न व मुलांच्या जबाबदाऱ्यांची सांगड बसत नव्हती. शेवटी २००१ साली त्यांनी नोकरी सोडून पुन्हा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला.

## निरजा विकास वर्धिनी

व्यवसाय पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला, मात्र या वेळी त्यांना काहीतरी वेगळे करावेसे वाटत होते. वैयक्तिक व्यवसायाबरोबरच समाजातील गरजू स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी त्यांनी 'निरजा विकास वर्धिनी' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. या संस्थेंतर्गत ब्युटीपार्लर व नर्सरी स्कूल सुरू केले. ब्युटीपार्लर सुरू झाल्यानंतर महिलांकडून ब्युटी पार्लर, शिवणकाम अशा अभ्यासक्रमांची विचारणा होऊ लागली. त्यानुसार अभ्यासक्रम सुरू केले.

## आधारवड

संस्थेच्या २००१ ते २०१८ च्या प्रवासात प्रामुख्याने शाळाबाह्य विद्यार्थी, विडी कामगारांच्या मुली, आदिवासी महिला, विधवा, शालेय मुली यांना महिलांसाठीच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात आणि त्यातून महिलांना स्वावलंबी, सक्षम व यशस्वी व्यवसायिक बनवण्यात संस्था मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली आहे. आदिवासी महिलांना बांबुक्राफ्ट, मेणबत्ती, अगरबत्ती, वनउपज, मसाले, पापड, लोणचे प्रशिक्षण, शोभेच्या वस्तू बनवणे व वारली पेंटिंग असे प्रशिक्षण देत अनेक महिलांना आधार देण्याचे काम अपर्णाताईंनी केले आहे. तब्बल ८५० हून अधिक मुलींना कराटे प्रशिक्षणही देण्यात आले आहे. संगमनेर तालुक्यातील धांदरफळ येथील वडिलोपार्जित व मिळालेली शेती आईसोबत पाहत त्यांची ही व्यवसायिक व सेवाभावी वाटचाल सुरू आहे. त्यांचा मुलगा सॉफ्टवेअर इंजिनिअर असून मुलगी पुण्यात सी.ए. करत आहे.

**उप माहिती कार्यालय, शिर्डी**



सायबर महागुरू

**डिजिटल आणि इंटरनेट माध्यमातील तंत्रज्ञान वापरून नेटवर्किंग, व्यावसायिक कामकाज, मत–प्रदर्शन यांसारख्या अनेक गोष्टींचा स्त्रिया लाभ घेताना दिसत असल्या तरी, त्यांच्या या उत्साही सायबर सहभागामुळे त्या सायबर पीडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. सायबर गुन्हे आणि त्याद्वारे महिलांची केली जाणारी छळवणूक तसेच त्यासंबंधीचे कायदे व अधिकार हा सायबर गुन्हे शाखेतील आव्हानात्मक असा विषय बनला आहे. महिलांच्या बाबतीत सायबर स्टॉकिंग, हॅकिंग, ऑनलाइन बदनामी, इलेक्ट्रॉनिक ब्लॅकमेलिंग, मॉर्फ्ड पोर्नोग्राफिक इमेजेस, रिवेंज पोर्न आणि इतर अनेक गुन्हे घडू लागले आहेत. इतरही अनेक युक्त्या वापरून एखाद्या स्त्रीला दमदाटी करणे, तिच्या वैयक्तिक आयुष्यावर नियंत्रण ठेवणे व तत्सम अनेक शारीरिक आणि भावनिक इजा पोहोचवणारे गुन्हे राजरोसपणे आजूबाजूला घडत आहेत. संबंधित गुन्हेगार आपली ओळख लपवून हे गुन्हे करतात आणि लपलेल्या ओळखीमुळे त्यांना शिक्षादेखील होत नाही.**

# महिलांनो सावधान

**ॲड. प्रशांत माळी**

भारतामध्ये आंतरराष्ट्रीय डेटिंग ॲप्स, भारतीय डेटिंग वेबसाईट्स आणि मोबाईल ॲप्लिकेशन्स या साऱ्यांनी अल्पावधीतच भरपूर लोकप्रियता मिळवलेली दिसून येते. देशभरातील बदलत्या चालीरीती, आचार–विचार यांचा अचूक मागोवा घेऊन परदेशी कंपन्यांनी आपले पाय भारतामध्ये घट्ट रोवायला सुरुवात केली आहे. आपल्या देशाची निम्म्याहून अधिक लोकसंख्या ही युवा पिढीमध्ये मोडत असल्या कारणाने साहजिकच डेटिंग ॲप्सची लोकप्रियता अतिशय जास्त आहे. नेमक्या याच कारणामुळे डेटिंग ॲप्सद्वारे घडणारे गुन्हे वाढत चालले आहेत. या गुन्ह्यांना बळी पडणाऱ्या व्यक्तींमध्ये महिलावर्ग प्रकर्षाने दिसून येतो. यामध्ये उच्चशिक्षित महिलांचाही समावेश असतो. त्यांची आर्थिक परिस्थितीदेखील सुदृढ असते. या महिला तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. साधारणपणे, घटस्फोटित किंवा एकट्या राहणाऱ्या महिला अशा प्रकारच्या फ्रॉड्सना सहजपणे बळी पडतात. या फ्रॉडमधील स्कॅमर्स निरागसपणे फसवणुकीची सुरुवात करतात. सोशल मीडिया साईट्स, ई–मेलद्वारे एखाद्या मुलीसोबत संपर्क करायचा. मग हळूहळू आपल्या माहितीची देवाणघेवाण करून त्यातून एकमेकांच्या वागण्याचे किंवा बोलण्याचे साम्य काढायचे. कधीकधी उगीच कोणत्या तरी समारंभाचा संदर्भ देऊन आपली ओळख कशी जवळची आहे, असे भासवायचे. असे अनेकविध मार्ग अवलंबवून कोणत्या ना कोणत्या प्रकारे स्कॅमर्स आपले सावज गाठतात. काही स्कॅमर्स आपली खोटी प्रोफाइल सोशल मीडियावर, जितक्या आकर्षक पद्धतीने मांडता येईल, तितक्या पद्धतीने तयार करतात आणि आपले सावज आपणहून जाळ्यात फसेल याची वाट पाहतात आणि एकदा का एखादी मुलगी वा स्त्री त्या जाळ्यात आली, की लागलीच आपले प्रेम व्यक्त करतात. बऱ्याच प्रकरणांमध्ये हे प्रेमवीर परदेशात राहत असल्याचे सांगतात. आपल्याला कोणत्या तरी वेगळ्या देशी स्थित व्हायचे आहे





## फसवणुकीचे ऑनलाइन स्वरूप

विविध सोशल नेटवर्किंग साईट्सने सामाजिकीकरणाचे नवीन रिंगण दृढ केलेले सर्वज्ञात आहे. या रिंगणातील प्रवेश सर्वांसाठी खुला असल्या कारणाने समाजातील स्त्रिया या मुक्तीचा पुरेपूर व मनसोक्त फायदा घेताना दिसतात. ऑनलाइन शॉपिंगपासून ते नेट बँकिंगपर्यंत, ऑनलाइन तिकिटांपासून ते ऑनलाइन टॅक्स-फायलिंगपर्यंत या सोशल नेटवर्किंगच्या व्यासपीठाने भारतीय महिलांचे जीवन अगदी सुखकर केले आहे. ऑनलाइन जगात स्त्रिया त्यांचा अनुभव पूर्ण जगासोबत वाटू शकतात आणि सोशल नेटवर्किंगच्या या फायद्यामुळे अनेक महिला त्यांच्या यशोगाथा, त्यांच्या आयुष्यातील अडचणी किंवा गाऱ्हाणी या व्यासपीठाद्वारे मांडतात. बऱ्याच महिला या नवीन सामाजिकीकरणाच्या मार्गाचा, 'तणाव-मुक्ती' चे माध्यम म्हणून वापर करतात. नेटवर्किंग करून समदुःखी मित्र-मैत्रिणी बनवल्या जातात. एकसारख्या विचारसरणीच्या व्यक्तींची ओळख वाढवून त्यांच्यासोबत एकेमकांच्या आयुष्यातील आनंदी तसेच दुःखी क्षणांची देवाणघेवाण केली जाते. इतकेच नाही तर, वैयक्तिक किंवा सामाजिक आयुष्यातील संघर्षांनासुद्धा इथे वाचा फोडली जाते.

प्रेमाचे नाटक करून केली जाणारी फसवणूक फार पूर्वीपासून प्रचलित आहे. प्रेमाचे, लग्नाचे वचन देऊन, विविध आमिषे दाखवून निरागस महिलांना जाळ्यात ओढायचे आणि त्यांच्याकडून आर्थिक तसेच शारीरिक वासना पूर्ण करायच्या, हे या फसवणुकीचे मूळ स्वरूप. आजही हे फसवणुकीचे प्रकार सर्रास चालू आहेत. मात्र आधुनिक तंत्रज्ञानाच्या या युगात फसवणुकीचे तंत्रदेखील बदलले आहे. प्रेमाच्या फसवणुकीने ऑनलाइन रूप धारण केले आहे. नुसतेच रूप धारण केले नसून, संबंधित फसवणुकीने व्हर्चुअल जगतात. मोठा धोका निर्माण झाला आहे. ऑनलाइन डेटिंग आणि ऑनलाइन मॅट्रिमोनिअल फ्रॉडचे प्रमाण अवाजवी वाढले आहे.

किंवा ती मुलगी जिथे वास्तव्य करते तिथे कायमस्वरूपी राहावयास यायचे आहे, असे सांगतात. त्याकरिता तिच्याजवळ पैशांची मागणी करतात. खरं तर ते कधीच कुठे येत नाहीत अगर जात नाहीत, परंतु आपणाला काही वैद्यकीय अडचण आल्याचे किंवा सध्या राहत असलेल्या देशातून निघण्यासाठी काही तांत्रिक अडचणी आल्याचे बहाणे सांगून मुलीकडून आणखी पैसे मागतात. पैसे मागताना सहसा बँकेतून व्यवहार करण्याकडे त्यांचा जास्त कल असतो. कारण बँकेतून एकदा व्यवहार झाला की मग पैसे परत जाण्याचा काही मार्गच उरत नाही. याशिवाय काही प्रकरणांमध्ये असे देखील होते की, स्कॅमर्स संबंधित मुलीला त्यांच्याकरवी पैसे पाठवतात आणि ते पैसे दुसऱ्या व्यक्तीला हस्तांतरित करण्यास सांगतात. अशा प्रकरणांमध्ये पैशांची ही अफरातफर अवैध स्वरूपाची असते. या अवैध अफरातफरीमध्ये त्या मुलीचा 'मोहरा' म्हणून वापर करून नाहक बळी दिला जातो.

असे अनेकविध पर्याय स्कॅमर्सकडे उपलब्ध असतात, समोरच्या मुलीला फसवण्याचे आणि त्याकरवी आपला आर्थिक अथवा शारीरिक फायदा करून घेण्याचे.

## जिव्हाळ्यारूपी केलेली फसवणूक

या बाबतीत सोशल मीडिया साईट्सद्वारे मैत्री केली जाते. स्कॅमर्स कोणत्या तरी दूर देशी स्थित असतो आणि मग त्या मैत्रीचे थोड्या दिवसांतच जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये रूपांतर होते. मग वेबकॅम वरून 'चॅटिंग' सुरु असताना अचानक स्कॅमरच्या वेबकॅम मध्ये काहीतरी अडचण येऊन तो पुन्हा पूर्ववत चालू केला जातो. मग भावनेच्या भरात त्या मुलीकडून तिच्या गोपनीयतेचा भंग होईल अशी, तिच्या नकळत, अश्लील कृत्ये घेऊन आणली जातात. असे सगळे झाल्यावर स्कॅमर्स आपले खरे रूप दाखवतात.

दुसऱ्या दिवशी किंवा काही वेळातच त्या मुलीला असे सांगितले जाते की जे काही कृत्य तिने वेबकॅमसमोर केले ते सर्व रेकॉर्ड करण्यात आले असून तो व्हिडीओ जर सगळीकडे पसरू नये असे वाटत असेल तर त्वरित स्कॅमरच्या खात्यामध्ये अमूक एक रक्कम जमा करावी. मुलीने एकदा का पैसे देणे सुरु केले की मग पैशांची चलती स्कॅमर्स साठी सुरूच होऊन जाते आणि जोवर मुलगी नकार देत नाही तोवर पैशांची मागणी वाढतच जाते.

## मॅट्रिमोनियल फ्रॉड वेबसाईट्स

आज गुन्हेगार फक्त डेटिंग साईट्स संदर्भातील गुन्हे करण्यापर्यंत मर्यादित राहिले नसून त्यांचा धोका मॅट्रिमोनियल साईट्सवर देखील मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो. या ठिकाणी स्कॅमर्स सहसा घटस्फोटित आणि एकट्या राहणाऱ्या महिलांना आपली शिकार बनवतात. त्यांना लग्नाचे वचन देऊन, त्यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून मोठी रक्कम मागतात. एकदा का ही मोठी रक्कम त्यांच्या खात्यात जमा झाली की, हे

सायबर महागुरू

स्कॅमर्स त्या महिलेला तिची झालेली फसवणूक समजण्याआधीच गायब होतात. या गुन्ह्यामध्ये स्कॅमर्स आपली ओळख लपवूनच ठेवतो, पैसेदेखील कोणातरी तिऱ्हाईत व्यक्तीच्या खात्यात जमा करण्यात येतात, जेणेकरून खऱ्या गुन्हेगाराची ओळख कोणासमोर येणार नाही. खोटा प्रोफाइल तयार करणे ही एक अत्यंत सोपी बाब आहे. शिवाय, सर्वांच्या सोयीसाठी बँकांनी खाते उघडणीच्या पद्धतीदेखील साध्या आणि सुखकर करून ठेवल्या आहेत. या सगळ्यांमुळे सायबर गुन्हेगार साध्यासरळ सोयींमध्ये दडलेल्या पळवाटा शोधून आपला फायदा करून घेतात आणि त्याद्वारे राजरोसपणे निरपराध लोकांना छळतात.

ज्या वेळी अशा वेबसाईट्सचा वापर करतात त्या वेळी त्यांनी स्वतःच जबाबदारीने वागणे अपेक्षित आहे. ज्या व्यक्तीसोबत आपण बोलत आहोत त्यावर आंधळा विश्वास न ठेवता त्याने सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीची खातरजमा करून घेणे हे त्यांचे प्रथम कर्तव्य आहे. बऱ्याचदा हे स्कॅमर्स मुलींना फसवून त्यांच्याकडून पैसे उकळतात. त्याच पैशांनी त्या मुलींसाठी भेटवस्तू खरेदी करून त्यांना आनंदी करतात. त्यामुळे जर एखादा मुलगा तुम्हाला सतत भेटवस्तू देत असेल, तुमच्याकडे पैशांची मागणी करीत असेल तर मुलींनो सावध व्हा!!

## लक्षात ठेवायच्या बाबी

■ मॅट्रिमोनियल साईटवर प्रोफाइल बनविताना महिलांनी स्वतंत्र असे इ-मेल बनवावे जे फक्त त्या साईटकरिताच वापरले जाईल. कारण बहुतेकदा नेहमीच्या इ-मेल आय. डी.वर इतर महत्त्वाची माहिती लिंक करून ठेवलेली असते आणि त्या माहितीच्या सुरक्षेखातर नवीन इ-मेल आय. डी. बनवणे केव्हाही चांगलेच.

■ चांगला उद्देश ठेवून राहणारी माणसे नेहमी समोरच्या व्यक्तीला तिच्या कलेने बोलण्याचे किंवा वागण्याचे स्वातंत्र्य देतात. त्यामुळे तुम्हाला तुमची वैयक्तिक माहिती सांगण्यासाठी कोणीही जबरदस्ती तर करीत नाहीत ना, तसेच एकसारखे तुमच्या दैनंदिन जीवनावर कोणी लक्ष तर ठेवून नाही ना, याची काळजी घ्यावी.

■ मॅट्रिमोनियल साईट्सवर संवाद साधत असताना असे काही प्रश्न विचारा ज्यावरून समोरचा माणूस तुमच्या योग्यतेचा आहे की नाही याची कल्पना तुम्हाला येईल. काही प्रश्न पुन्हापुन्हा विचारावेत, यावरून ती व्यक्ती काही लपवीत तर नाही ना किंवा खोटे तर बोलत नाही ना, याचा अंदाज येईल.

■ जर तुम्ही ऑनलाइन बोलत असताना जी व्यक्ती केवळ तुमच्या जवळ असलेल्या मालमत्तेची, पैशांची किंवा तुमच्या पगाराबाबतची विचारणा करत असेल, तर ताबडतोब अशा व्यक्तीशी संपर्क संपवा.

■ तुमच्या ऑनलाइन प्रोफाइल संबंधित माहिती, म्हणजेच तुमचे युजरनेम, पासवर्ड कधीही कोणालाही सांगू नका. कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका. तुमच्याबद्दलची कोणतीही संवेदनशील माहिती उघड करू नका.

या सर्व फ्रॉड्ससंदर्भात महिलावर्गास इतकाच सल्ला राहील की, मॅट्रिमोनियल साईट्सद्वारे किंवा ऑनलाइन डेटिंग ॲपद्वारे कोणतेही नाते निर्माण करण्यापूर्वी त्या व्यक्तीला प्रत्यक्ष भेटा. त्याच्या बाबतीत योग्य ती शहानिशा केल्याविना त्याच्या कोणत्याही आमिषांना बळी पडू नका आणि तुमचे आनंदी जीवन या सायबर बंडखोरांच्या हवाली करू नका.

**सायबर कायदा आणि सुरक्षा तज्ज्ञ**

## खोट्या डेटिंग वेबसाईट्स

सगळ्याच डेटिंग साईट्सवर काही अंशी तरी खोट्या प्रोफाईल्स बनवल्या जातातच. स्कॅमर्स त्यांच्या काही ना काही क्लुप्त्या वापरून लोकांना फसवण्यासाठी सज्ज होतातच. त्यामुळे प्रत्येक स्त्रीने डेटिंग साईट्सचा वापर करताना दक्षता घेणे गरजेचे आहे. यासाठी, मुलाची वैयक्तिक माहिती पडताळण्याऐवजी त्याच्या प्रश्नांमध्ये आर्थिक बाबींशी निगडित असे किती प्रश्न येत आहेत याकडे बारीक लक्ष द्यावे. त्यानंतर आपण आपली प्रोफाइल अतिशय साधी, कमी शब्दांची आणि आपल्या फोटोविरहित ठेवलेली असताना जर एकसारखे मेसेज येत असतील, तर तुम्ही एखाद्या फेक किंवा खोट्या साईटचे शिकारी होत आहात, असे समजण्यास काही हरकत नाही.



काही वेळा, अस्सल असणाऱ्या साईट्सद्वारे सुद्धा तुम्ही फसले जाऊ शकता. ही फसवणूक आपल्या बाबतीत होऊ नये यासाठी ऑनलाइन डेटिंग साईट्सद्वारे आपण कोणासोबत कशा प्रकारचा संवाद साधला पाहिजे, संवाद साधत असताना समोरची व्यक्ती कशी उत्तर देत आहे, त्या व्यक्तीच्या लिहिण्यामध्ये कशा आणि किती चुका आढळत आहेत, अशा अनेक बाबींचा अतिशय बारकाईने अंदाज घेणे खूप महत्त्वाचे आहे.

# गहाणखताची प्रक्रिया झाली सुलभ...

**संतोष हिंगाणे**

मालमत्ता हस्तांतरण कायदा (ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी अ‍ॅक्ट) या कायद्यामध्ये स्थावर मिळकतीच्या हस्तांतरणाचे अभिहस्तांतरण (कनव्हेयन्स), बक्षीस (गिफ्ट), भाडेपट्टा (लिज) व गहाण (मॉर्टगेज) इत्यादी वेगवेगळे प्रकार व त्यांची रीत (पद्धत) या सबंधीच्या तरतुदी आहेत.

कलम ५८ मध्ये ‘गहाण’ व्यवहाराचे वेगवेगळे प्रकार व त्यांच्या पद्धती स्पष्ट करण्यात आल्या आहेत. सर्वसाधारणपणे सर्व प्रकारच्या गहाणांमध्ये ‘गहाणखत (मॉर्टगेज डीड)’ लिहून ठेवून त्याची नोंदणी करणे अनिवार्य आहे, तथापी खंड ‘एफ’मध्ये मॉर्टगेज बाय वे ऑफ डिपॉझिट ऑफ टायटल डीड या प्रकारच्या गहाण व्यवहाराची तरतूद आहे, त्याचा आशय असा आहे की, कर्ज घेणाऱ्याने, कर्जाची प्रतिभूती म्हणून, त्याच्या स्थावर मिळकतीच्या मालकी हक्कांची कागदपत्रे (टायटल डीड्स) कर्ज देणाऱ्याचे ताब्यात दिल्यास/निक्षेपित केल्यास (डिपॉझिट) तो गहाण व्यवहार कायदेशीर ठरतो. हक्कांची कागदपत्रे किंवा हक्कलेख ताब्यात देण्याची ही कृती मुंबई, चेन्नई, कोलकता किंवा संबंधित राज्य शासनाने या हेतुने अधिसूचित केलेल्या शहरांमध्ये करता येते. महाराष्ट्रामध्ये जिल्हा मुख्यालयांची शहरे अधिसूचित केली आहेत.

या पद्धतीने कर्ज व्यवहार होण्यासाठी, स्थावर मिळकतींचे हक्कलेख ताब्यात देण्याची (निक्षेपित करण्याची) कृती, अधिसूचित शहरामध्ये होणे गरजेचे आहे, हक्क लेखांचा विषय असलेली मिळकत त्या शहरामधील किंवा शहरांबाहेरील कोणत्याही ठिकाणी असू शकते.

या प्रकारच्या कर्जव्यवहाराला कायद्यामध्ये (मॉर्टगेज बाय वे ऑफ डिपॉझिट ऑफ टायटल डीड) (हक्क-लेख निक्षेप गहाणखत) असे संबोधले असले तरी, बोलीभाषेत ह्यास इक्विटेबल मॉर्टगेज (समानतेचे गहाणखत) असे संबोधले जाते.

**नवे सदर**

**नोंदणी व मुद्रांक शुल्क**

**नोंदणी व मुद्रांक विभागाशी संबंधित कायदे, नियम व विविध ई-उपक्रमांची माहिती देण्यासाठी हे सदर सुरू करण्यात आले आहे. नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांना यात प्राधान्य देण्यात येईल.**

## निष्पादित होणारे दस्तऐवज

या कर्ज प्रकारामध्ये ‘कर्जाची प्रतिभूती म्हणून हक्कलेख निक्षेपित करणे’ ह्या कृतीला महत्त्व आहे. यासाठी कर्जदारांने कोणतेही ‘गहाणखत’ लिहून देणे अभिप्रत नाही, असे असले तरी, काही बँकामध्ये हक्क लेख निक्षेपित करण्याच्या कृतीचे/ घटनेचे टिपण (मेमोरँडम) लिहून ठेवण्याची तर काही बँकामध्ये नोंदवहीमध्ये नोंद करून ठेवण्याची पद्धत आहे. काही ठिकाणी बँक व कर्ज घेणार या दोघांच्या स्वाक्षरीने करार (अ‍ॅग्रिमेंट) लिहून ठेवले जातात.

## मुद्रांक शुल्क

हक्कलेख निक्षेप पद्धतीच्या कर्जव्यवहारामध्ये तयार होणाऱ्या टिपण (मेमोरँडम) किंवा करार (अ‍ॅग्रीमेंट) किंवा इतर कोणत्याही नावाच्या दस्तावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची १ च्या अनुच्छेद ६(१) नुसार, कर्जाची रक्कम जर पाच लाख किंवा त्यापेक्षा कमी असेल तर कर्ज रक्कमेच्या ०.१% व जर कर्ज रक्कम पाच लाखांपेक्षा जास्त असेल तर कर्ज रक्कमेच्या ०.२% दराने, मात्र जास्तीत जास्त रु. १० लाख इतके मुद्रांक शुल्क आकारले जाते. या प्रकारे द्याव्या लागणाऱ्या मुद्रांक



**मालमत्ता हस्तांतरण कायदा (ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी अ‍ॅक्ट) या कायद्यामध्ये कलम ५८ मध्ये ‘गहाण’ व्यवहाराचे वेगवेगळे प्रकार व त्यांच्या पद्धती स्पष्ट करण्यात आल्या आहेत. सर्वसाधारणपणे सर्व प्रकारच्या गहाणांमध्ये ‘गहाणखत (मॉर्टगेज डीड)’ लिहून ठेवून त्याची नोंदणी करणे अनिवार्य आहे. कर्ज घेणाऱ्याने, कर्जाची प्रतिभूती म्हणून, त्याच्या स्थावर मिळकतीच्या मालकी हक्कांची कागदपत्रे (टायटल डीड्स) कर्ज देणाऱ्याच्या ताब्यात दिल्यास/निक्षेपित (डिपॉझिट) केल्यास तो गहाण व्यवहार कायदेशीर ठरतो.**




शुल्काचा खर्च सोसण्याची जबाबदारी कर्ज घेणाऱ्याची असते. अर्थात कर्ज देणाराने ती स्वतःहून स्वीकारली असेल तर तो भाग वेगळा.

## नोंदणी

हक्कलेख निक्षेप पद्धतीच्या कर्जव्यवहारामध्ये, जर दस्तऐवज तयार करण्यात आले असतील तर त्याची नोंदणी करण्याविषयी कोणतेही बंधन २०१३ पर्यंत नव्हते. ती बाब सर्वस्वी बँक व कर्ज घेणार यांच्या स्वेच्छेवर अवलंबून होती. सर्वसाधारणपणे असे दस्त नोंदणीसाठी येत नव्हते. त्यामुळे या कर्ज व्यवहाराची माहिती इतरांना मिळण्याची शक्यता नव्हती. याचा गैरफायदा घेऊन, एखाद्या मिळकतीचे हक्कलेख निक्षेपित करून एखाद्या बँकेकडून कर्ज घेतल्यानंतर, ती मिळकत अन्य बँकेकडे तारण ठेवून पुन्हा कर्ज उचलण्याचे किंवा ती मिळकत अन्य व्यक्तीला मिळण्याचे प्रकार घडू शकत होते. या सर्व बाबींचा विचार करून, विधी आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार, नोंदणी अधिनियम १९०८ मध्ये १ एप्रिल २०१३ पासून महाराष्ट्रापुरत्या काही सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणांनुसार, जर ईक्विटेबल मॉर्टगेज व्यवहारामध्ये बँक व कर्ज घेणार यांच्यादरम्यान करारनामा झाला असेल, तर त्याची नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

असा उभयपक्षी करार झाला नसेल तर, कर्ज घेणाऱ्याने या कर्ज व्यवहाराची माहिती नमूद असलेले सूचनापत्र (नोटिस ऑफ इन्टिमेशन) कर्ज घेतल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत दुय्यम निबंधक कार्यालयात फाईल करणे, नवीन कलम ८९ब नुसार बंधनकारक करण्यात आले आहे.

## नोटीस ऑफ इंटिमेशन फाईलिंग

या विषयाच्या संबधाने, शासनाने 'महाराष्ट्र नोटिसांचे आणि न्यायालयीन आदेशांच्या प्रतींचे फाईलिंग नियम २०१३' तयार केले आहेत. त्यामध्ये नोटिसीचा नमुना आणि फाईलिंगची कार्यपद्धती नमूद आहे. यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन नोटीस फाईल करणे (फिजिकल फायलिंग) व दुय्यम निबंधक कार्यालयात समक्ष न जाता, संबंधित बँकेच्या शाखेमधूनच ऑनलाइन फाईलिंग करणे (ई–फायलिंग) असे दोन पर्याय कर्ज घेणाऱ्यांसाठी उपलब्ध आहेत.

## प्रत्यक्ष फाईलिंग

या पद्धतीमध्ये कर्ज घेणाऱ्याचा साधारण २ दिवसांचा वेळ जातो तसेच त्यांना बँक व दुय्यम निबंधक कार्यालय यांच्याकडे प्रत्यक्षात जावे लागते.

**सहायक नोंदणी महानिरीक्षक, पुणे**

## ऑनलाइन फाईलिंग (ई–फायलिंग)

कर्ज घेणाऱ्यास सर्व प्रक्रिया दुय्यम निबंधक कार्यालयात प्रत्यक्ष न जाता, बँकेच्या शाखेमधूनच एकाच वेळी करता यावी, त्यांच्या वेळेची व पैशाची बचत व्हावी म्हणून विभागाने ही सुविधा बँका व वित्तीय संस्था यांना igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली आहे.

या प्रणालीमुळे कर्ज घेणाऱ्यांना नोटीस ऑफ इंटिमेशन देण्याचे कायदेशीर बंधन ३० दिवसाच्या विहित मुदतीत पूर्ण करणे सहज शक्य होते, शिवाय कर्जविषयक प्रक्रिया गतिमानतेंने पूर्ण होऊन संबंधितांना व्यवसाय सुलभतेचा अनुभव येतो.

प्रत्यक्ष फाईलिंगसाठी आकारले जाणारे ३०० रुपये दस्त हाताळणी शुल्क, ऑनलाइन फाईलिंगमध्ये आकारले जात नाही हा या प्रणालीचा अजून एक फायदा आहे.

दुय्यम निबंधक कार्यालयात प्रत्यक्ष फाईलिंगसाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या कमी झाल्यामुळे दुय्यम निबंधक कार्यालयावरील ताण कमी होऊन या निबंधकाना नागरिकांच्या इतर कामकाजासाठी जास्त वेळ देणे शक्य होत आहे.

अशा रीतीने इक्विटेबल मॉर्टगेज व्यवहारामध्ये, कर्ज घेणाऱ्याने दुय्यम निबंधक कार्यालयास नोटीस ऑफ इंटिमेशन सादर



करण्यासाठी विभागाने उपलब्ध करून दिलेला ऑनलाइन फाईलिंग हा पर्याय संबंधित कर्ज घेणार, बँक व विभाग या सर्वांच्या सोयीचा व हिताचा आहे. त्यामुळे जास्तीत जास्त बँक व त्यांचे ग्राहक यांनी या प्रणालीचा वापर करावा असे विभागाचे आवाहन आहे. या संदर्भातील कायदे, नियम व अधिक माहिती विभागाच्या igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर व ८८८८ ०० ७७७७ या क्रमांकावर उपलब्ध आहे.

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने राज्यसेवा मुख्य परीक्षा २०१८ घेण्यात आली. त्याचा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला. एकूण १३६ पदांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत महिला संवर्गातून पुणे जिल्ह्यातील स्वाती किसन दाभाडे हिने प्रथम क्रमांक मिळवला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत तिने हे यश संपादन केले आहे.**

# यशाला गवसणी

**स्वाती दाभाडे**

जिद्द आणि चिकाटी असेल तर प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते. मात्र ध्येय समोर ठेऊन मेहनत करावी लागते. माझे आई-वडील शेतकरी... तीन भावंडामध्ये मी सर्वात लहान... आर्थिक परिस्थितीमुळे भावडांना शिक्षण पूर्ण करता आले नाही. मी १२ वी (विज्ञान) परीक्षेत चांगले गूण मिळवून उत्तीर्ण झाले; परंतु भावंडांप्रमाणेच माझेही शिक्षण थांबले. मात्र जेव्हा मी गावातच मुलांची शिकवणी घेऊ लागले, तेव्हा वाटले, आपण का बरे मागे राहावे. ही मुले आपल्या डोळ्यांसमोर मोठी स्वप्ने पाहून चांगली नोकरी मिळवत आहेत. मग मी पुन्हा तळेगांवातच वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला. बी. कॉम. व एम.कॉम. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. स्पर्धा परीक्षेची जिद्दीने तयारी करू लागले. पाहता पाहता एकापाठोपाठ एक यश मिळू लागले. आणि या वर्षी राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परीक्षेत मुलींमध्ये राज्यात पहिली आले!



**स्वाती दाभाडे**

## अभिनंदनाचा वर्षाव

निकाल जाहीर झाला. एका सामान्य कुटुंबातील मुलगी राज्यात मुलींमध्ये पहिली आल्याची बातमी समजताच अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला. आपल्या गावातील मुलगी पहिली आल्याचा आनंद ग्रामस्थांना तर झालाच, पण पंचक्रोशीतील नागरिक, नातेवाईक सर्वांनाच झाला. आपल्या समोर शिकवणी घेणारी मुलगी चक्क उपजिल्हाधिकारी झाली; याचे कौतुक सर्वत्र सुरू झाले.

## काहीच अशक्य नाही

कुठलीही गोष्ट अशक्य नसते. अंगी जिद्द आणि चिकाटी असेल तर अशक्य ते शक्य करता येते. घरच्या परिस्थितीमुळे माझ्या शैक्षणिक वर्षातील चार वर्षे वाया गेल्याची खंत वडिलांना आहे. मात्र या यशाबद्दल आईवडिलांना खूप आनंद झाला आहे.

## आर्थिक परिस्थितीवर मात

स्वातीच्या घरात कोणीही पदवीपर्यंतही शिकलेले नाही... आर्थिक परिस्थिती ठीक नसल्याने माझ्या बहिणीचे शिक्षण बारावी नंतर थांबविण्यात आले. तसेच माझेसुद्धा शिक्षण थांबविण्यात आले. मात्र चार वर्षे शिकवण्या घेऊन मी पैसे साठवत होते. त्या वेळी वाटले की, आपण मागे पडतोय... म्हणून घरच्यांचा विरोध पत्करून राज्य सेवा परीक्षेची तयारी सुरू केली. गेल्या वर्षी नायब तहसीलदार म्हणून तर आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले.

मी २०१५ मध्ये इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे येथून बी.कॉमचे शिक्षण पूर्ण केले. घरात पदवीपर्यंत शिक्षण घेणारी तशी मी पहिलीच.. बी.कॉमचे शिक्षण चालू असताना दरम्यानच्या काळात आमच्या महाविद्यालयात विक्रीकर विभागातील अधिकारी सुनील काशिद यांचे स्पर्धा परीक्षेवर आधारित मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे स्पर्धा परीक्षेद्वारे करिअर करावे, असा पहिला विचार माझ्या मनात आला. त्याला जोड म्हणून घराशेजारी राहणारे विनोद साबळे यांनी पूर्वीपासून मी स्पर्धा परीक्षेची तयारी करावी, अशी वातावरण निर्मिती आईवडिलांजवळ केली होती.

## शासन सेवेचे कुतूहल

तसं माझं प्रेरणास्थान म्हणून कोणीही नाही. परंतु शासकीय सेवेत प्रवेश करून लोककल्याण होत असल्याबाबतची जाणीव विविध माध्यमातून मला कळाली. त्यामुळे माझे आईवडील आणि माझ्या घरच्या परिस्थितीला प्रेरणास्थान मानून यशाकडे वाटचाल केली. त्यात मला यश मिळत गेले. पुण्यामध्ये माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी आणि साखर आयुक्त शेखर गायकवाड यांचे व्याख्यान ऐकून मनात शासनाच्या सेवेविषयी कुतूहल निर्माण झाले.

## अभ्यासामध्ये सातत्य

मी तळेगाव दाभाडे-पुणे रेल्वेने दररोज ये-जा करत होते. परीक्षेची तयारी करताना दररोज ८ ते ९ तास अभ्यास करत असे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा पूर्व परीक्षेच्या वेळी दररोज १० ते १२ तास आणि मुख्य परीक्षेच्या वेळी दररोज १३ ते १४ तास अभ्यास




## यशाची सूत्रे

● प्रचंड मेहनत करण्याची तयारी असली पाहिजे. ● अधिकाधिक अवांतर वाचन करायला हवे. ● अधिकाधिक सराव चाचण्या द्यायला हव्यात. ● किचकट विषयाला जास्तीत जास्त वेळ द्यायला हवा. ● अद्ययावत संदर्भ पुस्तकांचे वाचन करून स्वत:च्या नोट्स तयार कराव्यात. ● अभ्यासाबरोबरच आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. ● अपयशाने खचून न जाता प्रयत्नात सातत्य ठेवल्यास आणि मनापासून परिश्रम घेतल्यास यशप्राप्ती निश्चितच होते. त्यासाठी कणखर मनाची आवश्यकता आहे. तशी मनाची मशागत करायला हवी. ● स्पर्धा परीक्षेची तयारी करताना स्वत:च्या तब्येतीकडेसुद्धा लक्ष देणे आवश्यक आहे. त्यासाठी नियमितपणे व्यायामासाठी वेळ काढायला हवा. ● सदैव सकारात्मक राहिले पाहिजे.

करत होते. अभ्यास करताना मनावर नियंत्रण ठेवून परीक्षेबाबतच्या नकारात्मक अफवांवर विश्वास न ठेवता सातत्याने अभ्यास करुन यश संपादन केले. पुण्यातील युनिक ॲकेडमी, स्टडी सर्कल, ज्ञानदीप ॲकेडमी तसेच पृथ्वी ॲकेडमी या स्पर्धापरीक्षा केंद्रांचे मुलाखती विषयी मार्गदर्शन मिळाले. नायब तहसीलदारपदी निवड झाल्यानंतर मावळच्या नायब तहसीलदार श्रीमती रंजना भोसले यांच्याकडून महसूल प्रशासनाची माहिती दिली.


## उणिवांचा शोध


वर्ग-१ किंवा वर्ग-२ चे पद मिळवण्यासाठी मी २०१६ मध्ये पहिल्याच वेळेस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्यसेवा पूर्व परीक्षा दिली. परंतु अभ्यासाची माहिती अपूर्ण असल्यामुळे मनात थोडीशी भीती होतीच. त्यामुळे मला त्या परीक्षेत यश मिळाले नाही. परंतु त्या वेळेस मी खचून न जाता मला कळले की, परिपूर्ण अभ्यास करण्याबरोबरच आपल्यातील उणिवांचा शोध घेऊनच परीक्षेला सामोरे जावे लागेल, अशी मनात पक्की गाठ बांधली. त्यानंतर पुढे २०१७ मध्ये दिलेल्या विविध परीक्षांचे निकाल २०१८ मध्ये लागले. त्या वेळी लिपिक नि टंकलेखक, विक्रीकर निरीक्षक, सहायक कक्ष अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क उपनिरीक्षक, नायब तहसीलदार या परीक्षेत मी उत्तीर्ण झाले. २०१८ मध्ये दिलेल्या परीक्षेचा निकाल लागला आणि मी राज्यसेवा परीक्षेत मुलींमधून प्रथम क्रमांक मिळवल्याने माझे उपजिल्हाधिकारी हे पद निश्चित झाले.


**शब्दांकन : संदीप राठोड**
विभागीय माहिती कार्यालय, पुणे


## अवांतर वाचन


अवांतर वाचनाची सवय मला लहानपणापासूनच होती. लहानपणी मी विविध वृत्तपत्रांचे वाचन करीत असे. परीक्षेच्या काळात व त्यापूर्वी तयारीच्या अनुषंगाने वृत्तपत्रातील विविध संपादकीय लेख, अग्रलेख आणि विशेषत: रविवारच्या दिवशी




प्रकाशित होणाऱ्या पुरवण्या या वाचनाचा माझ्या यशात मोलाचा वाटा आहे. पुस्तकांविषयी सांगायचे झाले तर संदीप वासलेकर यांचे 'एका दिशेचा शोध,' माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे 'इंडिया २०२०' ही पुस्तके मी वाचलेली आहेत. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत दरमहा प्रकाशित होणारे 'लोकराज्य' मासिक, तसेच केंद्र सरकारच्या घडामोडींची माहिती असणारे 'योजना' मासिकाचे वाचन करीत होते. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या अधिकृत व अद्ययावत माहितीचा वापर करणे गरजेचे आहे. त्यामध्ये राज्याचे आर्थिक पाहणी अहवाल, केंद्र व राज्य सरकारचा अर्थसंकल्प विविध विभागांमार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती घेऊन तयारी करणे गरजेचे आहे.


विविध वृत्तपत्रांचे वाचन करत होते. हे वाचन करताना परीक्षेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करून कमी वेळेत जास्तीत जास्त माहिती संकलन करण्याचा सराव करणे गरजेचे आहे.

**कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वाचा अनेकांनी अनेक प्रकारे परिचय करून दिलेला आहे. कुणी त्यांना महात्मा फुले यांचे निष्ठावंत वारकरी म्हटले. कुणी त्यांना आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करणारा आधुनिक भगीरथ म्हटले. रचनात्मक कार्याचे प्रतीक, जिद्द आणि धडाडीचे मूर्तिमंत प्रतीक, राष्ट्रीय एकात्मतेचा पुरुष आणि पुस्तकात न मावणारा माणूस असेही काहींनी म्हटले आहे. त्यांनी ग्रामीण मुलांच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्थेची ४ ऑक्टोबर १९१९ रोजी स्थापना केली. यंदा या संस्थेची शताब्दी साजरी होत आहे.**

# पुस्तकात न मावणारे कर्मवीर

**डॉ. द. ता. भोसले**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा विचार करताना न कळत मला वंदनीय अशा शिवछत्रपतींचे स्मरण होते. या दोन महापुरुषांच्या काळामध्ये तीनशे वर्षाचे अंतर असले तरी दोघांच्या जीवनकार्यात बऱ्याच प्रमाणात मला साम्य जाणवते. या दोघांच्याही कामामध्ये सामान्य माणूस (रयत) केंद्रस्थानी होता. या दोघांचेही ध्येय होते सामान्य माणसाला मुक्त करणे. महाराजांनी रयतेला पारतंत्र्यातून मुक्त केले. कर्मवीरांनी रयतेला अज्ञानातून मुक्त केले. महाराजांनी रयतेला नानाप्रकारची बंधने, गुलामगिरीतून मुक्त केले. तर कर्मवीरांनी आर्थिक विषमता, वर्णवर्चस्व, जातिश्रेष्ठता आणि धार्मिक विषमता यांच्या गुलामगिरीतून रयतेला मुक्त करण्याचा ध्यास घेतला.


कर्मवीर भाऊराव पाटील

शिवछत्रपतींनी रयतेचा गारठून गेलेला पराक्रम जागृत केला. कर्मवीरांनी रयतेचे झोपी गेलेले आत्मबळ जागृत केले. शिवछत्रपतींनी एकाच वेळी चार शत्रूंशी झुंज दिली. कर्मवीर भाऊरावांना सुद्धा चार शत्रूंशी झुंज द्यावी लागली. धर्मसत्ता, ज्ञानसत्ता, अर्थसत्ता आणि अधिकार सत्ता असलेल्या वरिष्ठ वर्गातील मंडळीशी लढावे लागले. अज्ञान, दैववाद, शोषण आणि कर्मकांड याविरुद्ध 'एल्गार' पुकारावा लागला. दारिद्र्य नावाच्या अदृश्य शत्रूविरुद्ध त्यांना दोन हात करावे लागले. दोघांतील हे साम्य इथेच संपत नाही. शिवप्रभूंनी इथल्या निरक्षर शेतकऱ्यांच्या एका हातात नांगर दिला व दुसऱ्या हातात तलवार दिली. त्याचप्रमाणे कर्मवीरांनीसुद्धा ग्रामीण विद्यार्थ्यांच्या एका हातात नांगर – पामर दिली. खडी फोडण्यासाठी हातोडा दिला आणि दुसऱ्या हातात लेखणी दिली. शिवछत्रपतींनी पूजाअर्चा आणि कर्मकांडात अडकलेल्या धर्माचे राष्ट्रधर्मात रूपांतर केले तर कर्मवीरांनी स्वधर्माचे मानवता धर्मात रूपांतर केले. महाराजांनी सामान्य माणसाच्या जगण्याला अर्थ प्राप्त करून दिला. त्यांच्या जगण्याला आधार दिला, दिशा दिली. कर्मवीरांनीदेखील सामान्यांच्या विस्कटलेल्या आणि काजळलेल्या जगण्याला प्रकाशाच्या वाटेवर आणले. मरणाचे खाद्य म्हणजे आपले जीवन नव्हे हे रयतेला दाखवून दिले. भूक, भय आणि भोग यांचे समाधान म्हणजे आयुष्य नव्हे तर श्रम, सेवा आणि सर्मपणात आयुष्याची श्रीमंती असते हे या दोघांनीही दाखवून दिले.

शिवछत्रपतींनी गडकिल्ल्यांच्या रूपाने स्वराज्याची शक्तिकेंद्रे उभी केली तर कर्मवीरांनी वसतिगृहे आणि शाळांच्या रूपाने व्यक्तीच्या आत्मसामर्थ्याची आणि आत्मविकासाची ऊर्जाकेंद्रे निर्माण केली या साऱ्यांतून महाराजांनी नवा माणूस घडवला. त्याला त्याच्या आत्मशक्तीची जाणीव करून दिली. त्याचप्रमाणे कर्मवीरांनीदेखील एक नवा माणूस घडवला व त्याला त्याच्या आत्मविकासाची जाणीव करून दिली. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की, महाराजांच्या महानिर्वाणानंतर इथल्या रयतेने २७ वर्षे बलाढ्य मोगलाशी झुंज दिली. त्याचप्रमाणे कर्मवीरांच्या निर्वाणानंतर त्यांच्या सुसंस्कारी सेवाभावी शिष्यांनी या संस्थेला भारताच्या शैक्षणिक नकाशावर वलयांकित केले आहे. संस्थेचा निर्माता स्वर्गवासी झाल्यावर संस्थेलाही लवकरच स्वर्गवास घडतो, अशी अनेक उदाहरणे आपण नेहमी पाहतो. या पार्श्वभूमीवर संस्थेचे हे कार्य आणि कर्मवीरांची थोरवी अद्वितीय म्हणावी लागेल.

### व्यक्तिमत्त्व

कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वाचा अनेकांनी अनेक प्रकार परिचय करून दिला आहे. कुणी त्यांना महात्मा फुल्यांचा निष्ठावंत वारकरी म्हटले. कुणी

त्यांना आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करणारा आधुनिक भगीरथ म्हटले. रचनात्मक कार्याचे प्रतीक, जिद्द आणि धडाडीचे मूर्तिमंत प्रतीक, राष्ट्रीय एकात्मतेचा पुरुष आणि पुस्तकात न मावणारा माणूस असेही काहींनी म्हटले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कार्याचे केलेले हे वर्णन मर्मग्राही आणि उचित असले तरी भाऊरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी काही पैलू सांगणे आवश्यक आहे. मी यामध्ये भर घालताना असे म्हणेन की, गांधीजींचा कृतिशील अनुयायी, लालमातीतील बलदंड पैलवान, गारठलेल्या अस्पृश्याला अंगावरचे वस्त्र देणारा दाता, उपाशी मुलांना घास भरविणारा प्रेमळ पिता, स्वतःची धनसंपदा उपेक्षितांसाठी उधळणारा सेवक, ताक–कण्यावर समाधान मानणारा अतिथी आणि खाऊ म्हणून मुलांना पुस्तके देणारा पालक यामधूनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अधिक चांगले दर्शन घडते. एवढेच नव्हे तर स्वकमाईची सारी संपत्ती व आपल्या पत्नीला माहेराहून मिळालेले दागिने वसतिगृहातील मुलांसाठी खर्च करण्याचे त्यांचे दातृत्व अतुलनीय होते. शिक्षणसंस्था म्हणजे कधीही न आटणारी दुभती गाय अशी धारणा असलेल्या आजच्या काळात संस्थेच्या शेतातील मूठभर भाजी आणि ओंजळभर धान्यालाही हात न लावणारे ते निःस्पृह व्यक्तिमत्त्व होते. नावापुरते संसारात राहूनही संसाराची अनासक्ती असणारे ते संसारी संत होते. स्वतःचा संसार पायाखाली तुडवून समाजाचा संसार माथी घेऊन त्याला आकार देणारे ते शिल्पकार होते. स्वतःच्या मुलाला आपल्या संस्थेत नोकरी न देणारे ते तत्त्वनिष्ठ आणि आदर्श चारित्र्याचे प्रतीक होते. दोन धोतरे, दोन पैरणी, एक घोंगडी आणि एक काठी अशा साध्या आणि संन्यस्त राहणीचा आदर्श घालून देणारे ते अनासक्त योगी होते. देणग्या मिळवताना एसटीने प्रवास करणारे, लॉजच्या निवासाचा खर्च वाचवावा म्हणून तालमीत झोपणारे, अर्थशून्य धर्माचा त्याग करून मानवता धर्माचा स्वीकार करणारे ते धर्मसुधारक होते. मुलांच्या बरोबर खडी फोडणारे, स्वच्छता करणारे व त्यातून श्रमाची थोरवी सांगणारे ते कर्मयोगी होते. अनेकदा असे वाटते की, बुद्धाची करुणा, महावीरांची अहिंसा, ख्रिस्ताचे प्रेम, फुल्यांची बंडखोर वृत्ती, सावित्रीबाईचे समर्पण, शिवछत्रपतींचे रयतप्रेम, राजर्षी शाहूंचा प्रागतिक विचार आणि सयाजी राजे यांचे विद्याप्रेम या साऱ्या अपवादात्मक गुणांचा सुंदर मिलाफ कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आपणास दिसून येतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला व्रताचे तेज आहे. कृतीचा सुंगध आहे. सेवासमर्पणाचा ओलावा आहे आणि चारित्र्याचे आभूषण आहे. हे सारे एकाच व्यक्तिमत्त्वात सहसा दिसत नाही.

कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेतल्यानंतर त्यांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य आणि त्यातून साधलेल्या गोष्टी याच्यावर एखादा दीर्घ लेख लिहिता येण्यासारखा असला तरी आपणाला सूत्ररूपानेच त्यांच्या कार्याचा परिचय करून घेणे योग्य होईल.

## शिक्षणाचे महत्त्व

कर्मवीरांच्या मते साऱ्या दुःखावरचा एकमेव उपाय म्हणजे शिक्षण. साऱ्या प्रश्नांचे उत्तर मिळते शिक्षणातून. समाजातल्या साऱ्या विकृतींचे निराकरण करण्याचा एकमेव उपाय म्हणजे शिक्षण. मानवी जगण्याला अर्थ देणारी गोष्ट म्हणजे शिक्षण. म्हणून त्यांनी फक्त एका शिक्षणावर भर दिला आणि त्यातून सामाजिक सुधारणा केल्या. व्यक्तीचा सर्वांगीण विकास, समाजाची निकोप प्रगती आणि राष्ट्राचा अभ्युदय यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कुठलाही पर्याय आढळत नाही. आत्मबळ, आत्मतेज आणि आत्मविकास यांना ऊर्जा पुरवण्याचे काम शिक्षण करीत असते. समाजात नांदणारी विषमता, शोषण,




**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

गुलामगिरी, दारिद्र्य यांना झुंज देण्याची ताकद शिक्षणातूनच मिळत असते. शिक्षण हे माणसाला पशुत्वाकडून देवत्वाकडे नेते. जीवनाची पूर्णता कशामध्ये आहे हे सांगते. शिक्षण हे आपल्या जगण्याला अर्थ पुरवते. जीवनावर प्रेम करायला शिकवते आणि आपल्या जीवन प्रवासात आपल्या पावलापुढे प्रकाश अंथरते. एवढेच नव्हे तर ते माणसाला माणसाशी जोडते आणि समाजाची नवी जडणघडण करण्याचे कार्यही शिक्षणच करीत असते. म्हणूनच कर्मवीरांनी धुळीने माखलेल्या आणि अज्ञानाने पिचलेल्या सामान्यातून सामान्य माणसाला शिक्षण मिळावे यासाठी (ता.कराड) येथे वसतिगृहयुक्त शाळेचा प्रारंभ केल्यानंतर तो साताऱ्यामध्ये खोलवर रुजवला. त्यांच्या कार्याची एका वाक्यात माहिती द्यायची झाली तर असे म्हणता येईल की, त्यांनी मूठभर शहरापुरता असलेला शिक्षणप्रवाह खेड्यापर्यंत नेला. नव्हे शेतकऱ्याच्या झोपडीपर्यंत नेला. आपल्याप्रमाणे त्यांनी इतरांना शिक्षण प्रसाराची प्रेरणा दिली आणि शैक्षणिक क्रांतीला वाहून घेणारे अनेक कार्यकर्ते तयार केले. शाळेनेच

गावाचे नेतृत्व करण्याचा प्रयोग यशस्वी करून दाखवला. केवळ अक्षरओळख म्हणजे शिक्षण नव्हे तर जीवनाला श्रीमंत करण्याऱ्या चिरंतन मूल्यांचे संस्कार म्हणजे शिक्षण हे स्वप्न समोर ठेवून त्यांनी ग्रामीण मुलांना घडवले. राजर्षी शाहू महाराजांनी एकेका जातीसाठी स्वतंत्र वसतिगृह सुरू केले आणि त्यातून राष्ट्रीय एकात्मता साधली. हे त्यांचे कार्य खरोखर लोकोत्तर म्हणावे लागेल.

माणसाला जन्मत:च चिटकलेली जात कायद्याने नाहीशी होत नाही. धनाच्या श्रीमंतीने ती कमी होत नाही. कारण धनाची श्रीमंती देहाचे सौंदर्य वाढवते. पण मनाचे सौंदर्य वाढवत नाही. माणसाला चिटकलेली जात अधिकाराने कमी होत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मिळालेली वागणूक या ठिकाणी आठवते. माणसाची जात तेव्हा जाते, जेव्हा सर्व जातिजमातींची मुले एकाच ठिकाणी राहतात. एकाच चुलीवर शिजवलेले अन्न एकाच पंगतीला ताटाला ताट लावून, एकाच प्रकारचे अन्न एकाच वेळेला खातात आणि एकाच आडाचे पाणी एकाच भांड्याने पितात तेव्हा जात नाहीशी होते. कारण ते अन्न मनाला समता आणि सहजीवनाचा घास भरवत असते. भाऊरावांची ही वसतिगृहे म्हणजे प्राचीन काळच्या ऋषिमुनींच्या आश्रमाची आठवण करून देणारा प्रयोग आहे. थोडक्यात मी असे म्हणेन की, कर्मवीरांनी समाजाला मूल्यांच्या जवळ आणले. मूल्यांना चारित्र्याच्या जवळ आणले. चारित्र्याला समाजाच्या मांगल्याशी जोडले.



**समाजाच्या उद्धारासाठी अथक परिश्रम करणारे महाराष्ट्राचे थोर महापुरुष**
**कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

## शिक्षणाला संस्कारांची जोड


याबरोबरच कर्मवीरांनी आणखी काही प्रयोग केले. कोणते प्रयोग होते ते? या प्रश्नाचे उत्तर असे की, सहजीवन, सहभोजन, सहअध्ययन आणि स्वावलंबन यांचा अवलंब करणारे वसतिगृह त्यांनी शाळेला जोडून घेतले. मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. श्रमाच्या मोबदल्यात शिक्षणाची सोय करून शिक्षणाचा पैशाशी असणारा संबंध तोडला. शासनाच्या मदतीपेक्षाही रयतेच्या मदतीवर शाळा स्थापन केल्या. गावच्या शाळेचे पालकत्व तिथल्या गावकऱ्यांकडे सोपवले. भूमीशी नाते सांगणारे शिक्षणाचे स्वरूप ठेवले. विद्यार्थ्यांचे हस्तक व मस्तक यांचा एकाच वेळी सर्वांगीण विकास होईल, यावर लक्ष केंद्रित केले. शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची व संस्कारांची जोड दिली. वसतिगृहातल्या वरच्या वर्गातील मुलाने खालच्या वर्गातील मुलांचा अभ्यास घेण्याचा प्रयोग केला. रोजच्या सांडपाण्यावर आपल्यापुरती भाजी पिकवता येते, याचा आदर्श समाजासमोर ठेवला. या साऱ्या प्रयोगांमुळे ग्रामीण भागातील मुलांना बाहेरच्या जगात लढण्याचे बळ मिळाले. आत्मशक्ती आणि आत्मविश्वास त्यांना प्राप्त झाला. त्यामुळे पढिक पांडित्याला सर्जक ज्ञानाची आणि अनुभवांची जोड मिळाली. त्यातूनच स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागातून नेतृत्व उदयाला आले. कर्मवीरांच्या या शैक्षणिक प्रयोगामुळेच राष्ट्रीय एकात्मता साधली गेली. त्यांनी दिलेल्या शिक्षणामुळेच अज्ञान, शोषण आणि गुलामगिरी, दु:ख नि दारिद्र्य पूर्वजन्माच्या पापाचे फळ नसून आपल्या अज्ञानात त्याचे मूळ आहे याची प्रखर जाणीव सामान्य रयतेला झाली.

थोडक्यात, कर्मवीरांनी माणूस शब्दांशी जोडला, माणूस भूमीशी जोडला, माणूस श्रमाशी जोडला, माणूस माणसाशी जोडला. माणूस समाजाशी जोडला आणि माणूस शाश्वत मूल्यांशी जोडला. या साऱ्या गोष्टींमुळे त्यांच्या शिक्षणाला अंधार गिळून टाकणाऱ्या सूर्यप्रकाशाचे रूप प्राप्त झाले, यात शंका नाही. शिक्षणक्षेत्रातील त्यांचे हे प्रयोग देशपातळीवर राबवले गेले असते तर आजच्या शिक्षणाला आलेल्या मर्यादा खूप कमी झाल्या असल्या, असा विचार मनात येतो. शिक्षणाचे एक व्यवहारी व नवे तत्त्वज्ञान निर्माण करून त्याचा वापर करणारे ते एक थोर तत्त्ववेत्ते होते.

**सेवानिवृत्त प्राचार्य**


# ग्रंथसंपदा

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची दर्जेदार व संग्रहणीय ग्रंथसंपदा





## स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त प्रकाशने


विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ग्रंथसंपदा
ही पुस्तके
सर्व जिल्हा माहिती कार्यालयांमध्ये उपलब्ध




**महाराष्ट्र आणि महात्मा गांधी**
किंमत रु. २००




**महामानव**
किंमत रु. १००




**Magnificent Maharashtra**
किंमत रु. २००

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह